सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. ०६ नोव्हेंबर २०२५ | वर्ष - तिसरे | अंक २११ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | ınbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### लाडक्या बहिणींसाठी दिलासादायक बातमी ; ई-केवायसीची मुदत वाढवली




मुंबई : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांसाठी सरकारकडून एक मोठा दिलासा देण्यात आला आहे. योजनेचा लाभ मिळवण्यासाठी ई-केवायसी करणं अनिवार्य ठरवण्यात आलं आहे. साधारण दोन महिन्यांपूर्वी महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी महिलांना ई-केवायसी पूर्ण करण्याचं आवाहन केलं होतं. मात्र, अद्याप अनेक महिलांनी ही प्रक्रिया पूर्ण केलेली नव्हती. काहींना तांत्रिक अडचणींमुळे हे शक्य झालं नव्हतं. या पार्श्वभूमीवर सरकारने ई-केवायसीसाठीची मुदत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. आता लाभार्थींना १८ नोव्हेंबरपर्यंत ई-केवायसी पूर्ण करता येणार आहे. २८ ऑक्टोबर रोजी झालेल्या एका महत्त्वाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे लाडक्या बहिणींना आणखी काही दिवसांची मुभा मिळाली आहे.

### शरद पवारांना धक्का; अतुल देशमुखसह अनेक जण शिवसेनेत दाखल

पुणे : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पहिल्या टप्प्यातील निवडणुकीचा कार्यक्रम काल जाहीर होताच राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाला खिंडार पडले आहे. खेड तालुक्यातील माजी जिल्हा परिषद सदस्य अतुल देशमुख यांनी अनेक कार्यकर्त्यांसह शिवसेनेत (शिंदे गट) प्रवेश केला आहे. त्यांच्या पक्षप्रवेशाचा कार्यक्रम उद्या (६ नोव्हें) चाकण येथे होणार आहे. अतुल देशमुख यांनी पक्षांतर्गत मतभेद आणि स्थानिक राजकीय समीकरणांमुळे हा निर्णय घेतला असल्याचे कळते. देशमुख यांची खेड तालुक्यात चांगली पकड असून, स्थानिक पातळीवर अनेक कार्यकर्ते जोडले आहेत. त्यांचा जनसंपर्कही दांडगा आहे. ते एका वर्षापूर्वीच भाजपचा राजीनामा देत राष्ट्रवादीत दाखल झाले होते. देशमुख यांच्यासह चाकण, राजगुरुनगर आणि आळंदी नगरपालिकांतील नगरसेवक, पंचायत समिती सदस्यांसह अनेक कार्यकर्तेही शिंवसेनेत दाखल होणार आहेत.

### पान मसाल्याच्या जाहिरातीमुळे सलमान खान विरोधात गुन्हा दाखल



मुंबई, ५ नोव्हेंबर : पान मसाल्याच्या जाहिरातीमुळे सलमान खान अडचणीत आला आहे. भाजप नेते आणि राजस्थान उच्च न्यायालयाचे वकील इंदर मोहन सिंग हनी यांनी सलमान विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सलमान खानने माउथ फ्रेशनर ब्रँडची जाहिरात अशा प्रकारे केली आहे की ज्यामुळे तरुणांची दिशाभूल होईल, असा आरोप या तक्रारीत करण्यात आला आहे. अद्याप या प्रकरणात सलमान खानची प्रतिक्रिया समोर आली नसून या प्रकरणाची सुनावणी २७ नोव्हेंबर रोजी होणार आहे. तक्रारदार इंदर मोहन सिंग हनी यांनी आपल्या तक्रारीत सांगितले की, सलमान खान हा अनेक लोकांसाठी एक आदर्श आहे. आम्ही त्याच्याविरुद्ध कोटा ग्राहक न्यायालयात तक्रार दाखल केली आहे. इतर देशांमध्ये, सेलिब्रिटी किंवा चित्रपट तारे कोल्ड्रिंक्सचे समर्थनही करत नाहीत, परंतु येथे ते तंबाखू आणि पान मसाला सारख्या उत्पादनांचा प्रचार करतात.

### निसार उपग्रह ७ नोव्हेंबरपासून कार्यरत होणार - व्ही. नारायणन

बंगळुरू, ०५ नोव्हेंबर : नासा आणि इस्रो यांच्या संयुक्त सहकार्याने विकसित करण्यात आलेला 'निसार' उपग्रह शुक्रवारपासून अधिकृतरीत्या कार्यरत (ऑपरेशनल) होणार असल्याची माहिती भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे (इस्रो) प्रमुख व्ही. नारायणन यांनी आज, बुधवारी सांगितले. 'एमर्जिंग सायन्स, टेक्नॉलॉजी अँड इनोव्हेशन कॉन्क्लेव्ह (इएसटीआयसी)' या कार्यक्रमात बोलतांना त्यांनी ही माहिती दिली. यासंदर्भात इस्रो प्रमुख म्हणाले की, नासा-इस्रो सिंथेटिक अ‍ॅपर्चर रडार (निसार) हा आजवरचा सर्वात महागडा पृथ्वी निरीक्षण उपग्रह मानला जातो. या उपग्रहात अशी क्षमता आहे की तो दर १२ दिवसांत २ वेळा पृथ्वीवरील बहुतेक भूभाग आणि बर्फाच्छादित प्रदेशांचे निरीक्षण करू शकतो. २४०० किलोग्रॅम वजनाचा निसार उपग्रह ३० जुलै रोजी आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून (एसडीएससी) जीएसएलव्ही रॉकेटद्वारे अवकाशात प्रक्षेपित करण्यात आला होता. या उपग्रहाच्या सर्व डेटाची सखोल पडताळणी पूर्ण झाली आहे. शुक्रवारी ७ नोव्हेंबर रोजी आम्ही या उपग्रहाला औपचारिकरित्या 'ऑपरेशनल' घोषित केले जाणार आहे. निसार मोहिमेची विशेषता म्हणजे ती दोन स्वतंत्र रडार प्रणाली (एल-बँड आणि एस-बँड सेन्सर) एकाचवेळी वापरणारी जगातील पहिली मोहिम आहे.

## पगारवाढीऐवजी आता 'कामकाजावर' वेतन! : केंद्राचा मोठा निर्णय

### सरकारी नोकऱ्या अधिक आकर्षक आणि स्पर्धात्मक बनवण्यासाठी हा आयोग काम करणार

नवी दिल्ली : देशभरातील लाखो केंद्र सरकारी कर्मचारी आणि पेन्शनधारकांसाठी केंद्र सरकारने अखेर ८ व्या वेतन आयोगाच्या स्थापनेला औपचारिक मंजुरी दिली. यासंदर्भात अधिकृत अधिसूचनाही जारी केली. हा आयोग पुढील १८ महिन्यांत सध्याची वेतन रचना, भत्ते आणि आर्थिक सुविधांचा सखोल आढावा घेऊन नवीन शिफारसी सादर करणार आहे, ज्यामुळे कर्मचाऱ्यांच्या पगारात मोठी 'उलथापालथ' होण्याची शक्यता आहे.

या महत्त्वाच्या आयोगाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्ती रंजन प्रकाश देसाई यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. त्यांच्यासोबत पुलक घोष आणि पंकज जैन हे सदस्य सचिव म्हणून काम पाहतील. नवी दिल्ली येथे आयोगाचे मुख्यालय असेल. ही तीन सदस्यांची टीम पुढील दीड वर्ष केंद्र कर्मचाऱ्यांच्या वेतनाचे भविष्य निश्चित करणार आहे. जो कर्मचारी उत्कृष्ट कामगिरी करेल, त्याला इतरांपेक्षा अधिक वेतनवाढ मिळण्याची शक्यता आहे. सरकारी नोकऱ्या अधिक आकर्षक आणि स्पर्धात्मक बनवण्यासाठी हा आयोग काम करणार असल्याचे अधिसूचनेत स्पष्ट नमूद केले आहे.

या आयोगाच्या कक्षेत केवळ केंद्र सरकारी कर्मचारीच नाही, तर संरक्षण दलाचे सदस्य, अखिल भारतीय सेवा अधिकारी, केंद्रशासित प्रदेशांचे कर्मचारी, लेखापरीक्षण विभागाचे अधिकारी, तसेच सर्वोच्च आणि उच्च न्यायालयातील कर्मचारी यांचाही समावेश असणार आहे. आयोग जुने आणि कालबाह्य झालेले भत्ते रद्द करण्याच्या शिफारसीदेखील करू शकतो. या आयोगाच्या शिफारसी देशाची आर्थिक स्थिती आणि राज्यांच्या वित्तीय क्षमतेचा विचार करून केल्या जातील, ज्यामुळे लाखो कर्मचाऱ्यांचे पगार आणि पेन्शनमध्ये मोठा फरक पडू शकतो.

#### 'परफॉर्मन्स बेस्ड' वेतनावर मुख्य भर

या वेतन आयोगाचा सर्वात मोठा आणि महत्त्वाचा बदल म्हणजे परफॉर्मन्स बेस्ड वेतन या संकल्पनेवर असणार आहे. याचा स्पष्ट अर्थ असा की, यापुढे कर्मचाऱ्याला केवळ सेवाज्येष्ठतेनुसार नाही, तर त्यांच्या 'कामकाजाच्या' आधारावर आर्थिक लाभ मिळू शकतो.

#### पेन्शन आणि ग्रॅच्युटीमध्ये बदल?

नवीन वेतन आयोगाकडून पेन्शन आणि ग्रॅच्युटीच्या नियमांविषयीही सविस्तर शिफारसी अपेक्षित आहेत. विशेषतः, नवीन पेन्शन योजने अंतर्गत येणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी 'डेथ-कम-रिटायरमेंट ग्रॅच्युटी'च्या तरतुदींचा आढावा घेतला जाणार आहे. तसेच, जुनी पेन्शन योजना अंतर्गत येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नियमांमधील आवश्यक सुधारणा सुचवण्याची शक्यता आहे.

## लष्कराला राजकारणात ओढू नका

### राजनाथ सिंह यांची राहुल गांधी यांच्यावर टीका



नवी दिल्ली : आरक्षण असले पाहिजे. आरक्षणाच्या बाजूने आम्ही देखील आहोत. आमचा पक्षानेही जेवढे गरीब आहेत, त्या सर्वांना आरक्षण दिले. पण लष्करात जाती-पातीच्या आधारावर आरक्षण? मला वाटते की, याची चर्चा देखील झाली नाही पाहिजे. आपल्या सैन्याच्या जवानांचा एकच धर्म असतो आणि तो म्हणजे 'सैन्य धर्म', त्याव्यतिरिक्त इतर कोणताही धर्म नसतो. राहुल गांधी हे संरक्षण दलांमध्ये आरक्षणाची मागणी करून देशात अराजकता निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. मी काँग्रेसला सांगू इच्छितो की किमान आपल्या लष्कराला राजकारणात ओढू नका, असे सांगत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर सडकून टीका केली.

उद्या बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदान होणार आहे. यादरम्यान प्रचार सभेत बोलताना सिंह यांनी राहुल गांधी यांच्यावर लष्कराला राजकारणात ओढण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप केला आणि लष्करात विविध समाजांसाठी आरक्षणाची मागणी केल्याबद्दल त्यांच्यावर टीका देखील केली.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भारतीय लष्करावर केवळ १० टक्के लोकांचे नियंत्रण असल्याचे वक्तव्य केले आहे , यावरून देशाचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी बुधवारी त्यांच्यावर टीका केली. संरक्षण मंत्र्यांनी काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांच्यावर भारतीय लष्कराला विभागण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप केला. यावेळी त्यांनी , सैन्याला कोणताही धर्म किंवा जात नसते, असेही स्पष्ट केले आहे.

## हर्षवर्धन पाटील भाजपच्या वाटेवर?



भिगवण : माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या भाजप प्रवेशाच्या बातम्या येत आहेत. तशी चर्चा भोर तालुक्यात जोर धरत आहे. अलीकडेच तालुक्यातील नेते यशवंत माने आणि प्रवीण माने यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. दरम्यान, भिगवण-शेटफळगढे जिल्हा परिषद गटात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या राजकीय हालचालींना वेग आला असल्याची चर्चा आहे. स्थानिक स्तरावर अनेक सरपंच, उपसरपंच, माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच मातब्बर नेते हे अपक्ष स्वरूपात कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याशी संपर्कात असल्याची चर्चा रंगली आहे.

या चर्चेनंतर भरणे गटात जाण्याच्या तयारीत असणाऱ्या काही स्थानिक नेत्यांनी 'वेट अँड वॉच ' असा पवित्रा घेतला आहे. ते मंत्री पाटील काय निर्णय घेतात यावर लक्ष ठेऊन आहेत. मंत्री पाटील यांचा प्रभाव इंदापूर तालुक्यात आजही आहे. त्यांच्या कोणत्याही निर्णयाचा परिणाम ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकांवर होऊ शकतो, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, हर्षवर्धन पाटील यांच्या संभाव्य निर्णयाने इंदापूरच्या सत्तासमीकरणात मोठा बदल घडू शकतो. त्यांच्या अनुभव आणि संघटन कौशल्यामुळे भाजपला बळकटी मिळेल, राष्ट्रवादीत अस्वस्थता वाढेल, अशी चर्चा तालुक्यात रंगत आहे.

## फडणवीसांनी युतीचा पेच सोडवला! जागा वाटपावर मतभेद असले तरी 'पोस्ट पोल युती' निश्चित

कोल्हापूर : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची घोषणा होताच, महायुतीमधील तीन घटक पक्ष (भाजप, शिंदे शिवसेना, अजित पवार राष्ट्रवादी) एकत्र लढणार की नाही, याबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली होती. मात्र, भाजप नेते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोल्हापूर दौऱ्यावर असताना माध्यमांशी संवाद साधत याबद्दलची अंतिम भूमिका स्पष्ट केली.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसंबंधी तिन्ही पक्ष आपापल्या स्तरावर युतीच्या संदर्भात निर्णय घेतील. पण, कुठल्याही परिस्थितीत आम्ही तिघे एकत्रच आहोत. कुठे युती झाली नाही तरी, 'पोस्ट पोल' (निवडणुकीनंतर) युती होईल, असे स्पष्ट संकेत त्यांनी दिले.

म्हणजेच, काही ठिकाणी जागावाटपात एकमत न झाल्यास तिन्ही पक्ष स्वतंत्रपणे लढले तरी, निवडणुकीच्या निकालानंतर ते एकत्र येतील, हे त्यांनी निश्चित केले. महाराष्ट्रातील जनता महायुतीलाच कौल देईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. आज कोल्हापूरमध्ये मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार एकाच मंचावर उपस्थित होते.

#### ठाकरेंवर जोरदार टीका

दरम्यान, शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मराठवाडा दौऱ्यावरही मुख्यमंत्री फडणवीस यांनी टीकास्त्र सोडले. अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना एकरी ५० हजार आणि खरवडून गेलेल्या जमिनीसाठी एकरी साडेतीन लाख रुपये मदत देण्याची उद्धव ठाकरेंची मागणी आहे. यावर बोलताना फडणवीस म्हणाले, उद्धव ठाकरे हे घराबाहेर पडले ही चांगली गोष्ट आहे. त्यांना टोमणे मारण्याशिवाय काहीही जमत नाही. त्यांनी विकासावर केलेले एक भाषण दाखवा आणि हजार रुपये मिळवा, असे मी आधीच म्हटलेलो आहे.

## संजय गायकवाड-विजयराज शिंदे यांच्यात 'सिटिंग-गेटिंग'वरून जुंपली!

बुलढाणा : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर होताच महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये जागा वाटपावरून रस्सीखेच सुरू झाली आहे. बुलढाणा जिल्ह्यात मात्र महायुतीतील घटकपक्ष असलेल्या भाजप आणि शिंदे गटाच्या शिवसेनेमध्ये थेट खडाजंगी सुरू झाल्याचे चित्र आहे. चिखलीचे 'दबंग' आमदार संजय गायकवाड यांनी थेट बुलढाणा भाजपला 'ऑफर' दिली, पण जिल्हाध्यक्षांनी ती धुडकावून लावली.

चिखलीचे आमदार संजय गायकवाड यांनी जाहीरपणे मागणी केली की, 'चिखलीचे महापौरपद शिवसेनेला द्यावे, त्या बदल्यात बुलढाणा तुम्ही घ्या'. ही ऑफर भाजपच्या जिल्हाध्यक्षांनी ताबडतोब धुडकावून लावली, कारण मागील वेळी चिखली पालिकेवर भाजपचाच महापौर होता.

आमदार गायकवाड यांनी भाजपच्या नेत्यांना स्पष्ट सुनावले की, 'बुलडाणा जिल्ह्यात कोणाचीही



मक्तेदारी खपवून घेतली जाणार नाही. महायुती करायची असेल, तर सन्मानजनक जागा सोडव्या लागतील.' संजय गायकवाड यांचा स्वभाव बघता, बुलढाण्यात महायुती होणे कठीण असल्याचे संकेत मिळत आहेत.

गायकवाड यांच्या ऑफरवर भाजपचे जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांनी थेट सवाल केला, बुलढाणा कोणाला सोडायचे, याचा अधिकार आमदार गायकवाड यांना कोणी दिला? शिंदे यांनी महायुतीचा ठरलेला फॉर्म्युला सांगितला. 'सिटिंग-गेटिंग' (म्हणजे ज्या पक्षाकडे मागील निवडणुकीत पद होते, ते त्यालाच मिळणार). चिखली पालिकेत भाजपचा महापौर होता, त्यामुळे चिखली मागण्याचा अधिकार शिवसेनेला नाही आणि ती जागा भाजपच लढणार आहे. 'बुलढाणा कोणाला सोडायचे यावर चर्चा होऊ शकते, कारण तेथे दोघांचाही (भाजप-शिवसेना) महापौर नव्हता,' असे शिंदे यांनी स्पष्ट केले.

विजयराज शिंदे यांनी सांगितले की, 'आम्ही महायुतीत लढण्यास तयार आहोत, पण शिंदे सेनेचे आमदार अवाजवी मागणी करत आहेत आणि आधीपासूनच दावे करीत आहेत. यामुळे महायुतीत अडचण निर्माण झाली आहे.' आमदार गायकवाड हे आपल्या दबंग स्वभावामुळे नेहमीच चर्चेत असतात.

## मेहली मिस्त्री यांची धर्मादाय आयुक्तांकडे धाव

### हकालपट्टीवर कॅव्हेट दाखल करत दिला 'इशारा'

मुंबई : टाटा समुहातील वरिष्ठ संचालक व शापोरजी पालोनजी समूहाचे सर्वेसर्वा मेहली मिस्त्री यांनी आता आपल्या हकालपट्टीला आव्हान देण्याचे ठरवले आहे. टाटा समुहाने संचालक मंडळातून मिस्त्रींची बहुमताने हकालपट्टी केली होती. त्यालाच आव्हान देण्यासाठी त्यांनी महाराष्ट्र धर्मादाय आयुक्तांकडे कॅव्हेट दाखल केला आहे. मेहली मिस्त्री यांनी आपल्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी मिळावी यासाठी त्यांनी आपली तक्रार आयोगाकडे दाखल केली. यापूर्वी शुक्रवारी टाटा सन्स संचालक मंडळाने मेहंदी मिस्त्रींची हकालपट्टी घोषित केली.

प्रामुख्याने मेहली मिस्त्री यांच्याकडे कंपनीचे १८% भागभांडवल आहे. इतके प्रभावी भांडवल असताना टाटा समुहातील आणखी तीन प्रभावशाली संचालक स्वतः टाटा सन्स अध्यक्षपदी विराजमान झालेले नोएल टाटा, उद्योगपती वेणू श्रीनिवासन, माजी संरक्षण सचिव विजय सिंह यांनी मिस्त्री यांच्या पुनर्नियुक्तीला विरोध केला होता. दुसरीकडे मात्र रतन टाटांची सावत्र बहीण शिरीन व देना जेजीभॉय यांनी मात्र मेहली मिस्त्री यांना पाठिंबा दर्शविला आहे.

## सहकारी गृहनिर्माण संस्थाना न्यायालयाचा दिलासा!

## आता खासगी विकासकाची निवड केल्यास 'एनओसी'ची गरज भासणार नाही

मुंबई: इमारतीच्या पुनर्विकास प्रकल्पाविषयी अनेक सहकारी गृहनिर्माण संस्थांनी बहुमताने खासगी विकासकाची निवड केली होती. मात्र पुर्नविकासासाठी ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) मिळवणे बंधनकारक करून विनाकारण अडवणूक केली जात असल्याच्या तक्रारी उच्च न्यायालयात येत होत्या. याबाबत उच्च न्यायालयाने १७ ऑक्टोबर रोजी अडवणूक करणाऱ्यांविरोधात निकाला दिला होता. तर ४ नोव्हेंबर रोजी याबद्दल परिपत्रकही जारी केले आहे.

सहकार आयुक्त व निबंधक दीपक तावरे यांनी या परिपत्रकाद्वारे राज्यभरातील सर्व निबंधकांना सोसायटीच्या पुनर्विकासासाठी 'एनओसी' करिता कोणत्याही प्रस्ताव अथवा अर्जाची मागणी करू नये असे स्पष्ट निर्देश दिले आहेत. तसेच परिपत्रकातील नमूद निर्दे शांचे उल्लंघन करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई होईल, असा इशाराही तावरे यांनी दिला आहे.

राज्य सरकारने ४ जुलै २०१९ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे पुनर्विकासासाठी सहकार कायद्यातील कलम ७९ अ अन्वये मार्गदर्शक तत्त्वे



जारी करून कार्यपद्धती निश्चित करून दिली होती. त्याअंतर्गत 'एनओसी' आवश्यक असल्याचे उपनिबंधक कार्यालयांतून सोसायट्यांना सांगण्यात आले होते. यामुळे पुनर्विकासाच्या प्रक्रियेत असलेल्या सोसायट्यांना अडथळा येत होता.

या पार्श्वभूमीवर, उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अमित बोरकर यांनी ऑक्टोबर महिन्यात महत्त्वाचा निकाल दिला. ज्यात पुनर्विकासासाठी निबंधकाची एनओसी घेण्याबाबत कोणतीही तरतूद नसल्याचे त्यांनी सांगितले. तसेच निबंधकाला सोसायटीच्या पुनर्विकासाला मान्यता अथवा परवानगी देण्याचे अधिकार नसून पुनर्विकासाच्या प्रक्रियेत सोसायटीची सर्वसाधारण सभा हीच निर्णय घेणारी सर्वोच्च संस्था आहे, असे न्यायमूर्तींनी स्पष्ट केले आहे.

#### पुनर्विकासाविषयी सहकार आयुक्तांचे निर्देश

- निबंधकाने पुनर्विकासाच्या विशेष सर्वसाधारण सभेसाठी प्राधिकृत अधिकारी नेमण्याचा प्रस्ताव येताच १४ दिवसांत अधिकारी नेमावा. अन्यथा शिस्तभंगाची कारवाई होईल.
- प्राधिकृत अधिकाऱ्याने सभेसाठी आवश्यक कोरम, सभेचे कामकाज, चित्रीकरण, इतिवृत्त, मतदान व ठरावाची नोंद योग्यरीत्या झाल्याची खात्री करावी.
- सभेची नोटीस, विषयसूची, सभासदांचे संमती पत्र, सभेचे इतिवृत्त, व्हीडिओ चित्रीकरण इत्यादीच्या प्रती संस्थेने १५ दिवसांत निबंधक कार्यालयात सादर कराव्यात आणि निबंधक कार्यालयाने त्या जतन कराव्यात.
- सर्वसाधारण सभेतील पुनर्विकासाच्या निर्णयावर निबंधकांनी पुनरीक्षण, बदल किंवा नकाराधिकाराचे निर्णय घेऊ नयेत.
- सभेतील पुनर्विकासाविषयी निर्णयाबाबत सभासदास आक्षेप असल्यास त्याला सहकार न्यायालयात दाद मागण्यास सांगावे.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## बुलढाणा अर्बन तर्फे विभाग सिल्लोड कडून अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.करमसिंग राजपूत यांचा सत्कार



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.५ नोव्हेंबर

प्रा.डॉ.करमसिंग राजपूत यांचा बुलढाणा अर्बन परिवार विभाग सिल्लोड तर्फे सत्कार अर्थशास्त्र विभाग प्रमुख, लोकमान्य टिळक महाविद्यालय वणी जिल्हा यवतमाळ यांची महाराष्ट्रातील नामवंत अशा शिवाजी शिक्षण संस्था अमरावती या संस्थेत प्राचार्य म्हणून निवड झाली आहे. प्रा. राजपूत यांची तब्बल ३० वर्षे वणी येथील लोकमान्य टिळक महाविद्यालयात सेवा झाली असून आतापर्यंत त्यांचे अभ्यासक्रमावर आधारित अर्थशास्त्र विषयावरील एकूण १३ पुस्तके प्रकाशित झाली असून निरनिराळ्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्स मध्ये तब्बल १०५ संशोधन पेपर्स प्रकाशित झालेले आहेत.याशिवाय त्यांनी शेतकऱ्यांसाठी अनेक कार्यशाळांचे आयोजन केलेले असून बेरोजगार युवकांना रोजगार मिळावा यासाठी महाविद्यालयात रोजगार मेळाव्यांचेही आयोजन केलेले आहे.त्यांची अमरावती येथील नामांकित शिवाजी शिक्षण संस्थेत प्राचार्यपदी झालेली निवड ही त्यांच्या कामाची पावतीच आहे.प्राचार्य पदी निवड झाल्याबद्दल बुलढाणा अर्बन शाखा सिल्लोडचे संजय दळवी विभागीय व्यवस्थापक विभाग यांच्या सर्व बुलढाणा अर्बन टीमने त्यांचे खूप खूप अभिनंदन केले व त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## 'जाने अनजाने हम मिले' ला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद

संभाजीनगर प्रतिनिधी : झी टीव्ही वरील 'जाने अनजाने हम मिले' या मालिकेला तिच्या मनाला स्पर्श करणाऱ्या कथेसाठी आणि रीत (आयुषी खुराणा) व राघव (भरत अहलावत) यांच्यातील सुंदर केमिस्ट्रीसाठी प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. आगामी भागात प्रेक्षकांना राघव रीतला तिच्या मनातील भावनांबद्दल विचारताना दिसेल. हा क्षण कदाचित त्यांच्या नात्यात मोठा बदल घडवू शकतो.

आयुषी खुराणा म्हणाली, कलाकार म्हणून आम्ही आमच्या व्यक्तिरेखांमधून खूप गहन भावना जगत असतो त्यामुळे कॅमेरा बंद झाल्यावर सगळ्यांनाच थोडे हलके-फुलके, खरे क्षण हवे असतात. कदाचित हीच आमच्या टीम ची खासियत आहे. आम्हांला कधी कामातून बाहेर पडायचे आणि स्वतःसारखे राहायचे हे चांगले माहित आहे. शूट संपल्यावर भरत आणि मी नेहमी एका पिझ्झा प्लेस ला जातो. तिथे आम्ही चिल करतो, एकत्र खातो आणि दिवसभरात घडलेल्या गंमतीदार गोष्टींची मजा लुटतो. 'जाने अनजाने हम मिले' पहा दररोज रात्री ८ वाजता फक्त झी टीव्हीवर

## वेड्स विथ शॉपर्स स्टॉप' अंतर्गत भव्य विवाह संग्रहाचे लाँचिंग

छत्रपती संभाजीनगर, ५ नोव्हेंबर २०२५: भारतातील आघाडीचे फॅशन, सौंदर्य आणि भेटवस्तूंचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेले शॉपर्स स्टॉप आपल्या नवीन 'इंडिया वेड्स विथ शॉपर्स स्टॉप' मोहिमेअंतर्गत आकर्षक विवाह संग्रह घेऊन आले आहे. भारतीय विवाहसोहळ्यांची भव्यता आणि आधुनिक अभिजाततेचा संगम दर्शवणाऱ्या या संग्रहात विवाहासाठी आवश्यक असलेली प्रत्येक गोष्ट उपलब्ध आहे.

या मोहिमेद्वारे ग्राहकांना पर्सनल शॉपर वेडिंग कन्सिर्ज सर्व्हिस च्या माध्यमातून तज्ज्ञ स्टाईलिंग मार्गदर्शन मिळेल. शॉपर्स स्टॉपकडे ५०० हून अधिक प्रीमियम ब्रँड्स असून, लग्नाच्या खरेदीसाठी हे एकाच ठिकाणी सर्व सुविधा देणारे परिपूर्ण ठिकाण आहे.

ग्राहकांसाठी खास ऑफर्स: सर्वाधिक खर्च करणाऱ्या टॉप स्पेंडर्सना ५ रात्री ६ दिवसांची युरोप ट्रिप. टॉप १० स्पेंडर्सना १ लाख किमतीचे सॉलिटारिओ डायमंड ज्वेलरी. ६०,००० पेक्षा जास्त खरेदीवर १६,००० किंमतीचे ई-गिफ्ट वाऊचर्स. ४० हून अधिक प्रसिद्ध ब्रँड्सकडून विशेष सवलती. शॉपर्स स्टॉपचे मॅनेजिंग डायरेक्टर आणि सीईओ कवींद्र मिश्रा म्हणाले, भारतीय विवाह समारंभ रंग, संस्कृती आणि भावना यांचा उत्सव आहेत. आमच्या ऑफर्समुळे ग्राहकांना या हंगामात सर्वोत्तम अनुभव मिळेल. या लग्नसराईत प्रेम, शैली आणि परंपरा साजरी करण्यासाठी जवळच्या शॉपर्स स्टॉप स्टोअरला भेट द्या.

## 'एकेन बाबू' आता सोनी सब आणणार हिंदीमध्ये

हलक्याफुलक्या आणि कुटुंबाभिमुख कथांसाठी प्रसिद्ध असलेले हिंदी जीईसी चॅनल सोनी सब आता आपल्या प्रेक्षकांना 'एकेन बाबू' च्या एका वेगळ्या, विनोदी आणि मोहमयी दुनियेत घेऊन जाणार आहे. आठ यशस्वी वेब सिझन्स आणि तीन सुपरहिट चित्रपटांनंतर हा हटके बंगाली गुप्तहेर आता आपल्या विनोदी, बुद्धिमान आणि गुन्हे उलगडण्याच्या चतुर शैलीने प्रेक्षकांचे मनोरंजन करायला सोनी सब टीव्हीवर मोठ्या प्रेक्षकवर्गासमोर पदार्पण करत आहे. 'एकेन बाबू' ही कथा एकेंद्र सेन (ज्याची भूमिका प्रसिद्ध बंगाली अभिनेता अनिर्बाण चक्रवर्ती यांनी साकारली आहे) याची आहे. त्याला सगळे प्रेमाने एकेन बाबू म्हणून ओळखतात. हा थोडा विचित्र, मूडी आणि खवय्या गुप्तहेर आहे. त्याच्या साध्या सवयी आणि वेगळ्या वागण्यामुळे गुन्हेगारांपासून ते त्याच्या साथीदारांपर्यंत सगळेच गोंधळून जातात. परंपरागत गंभीर गुन्हेगारी ड्रामांपासून वेगळी दिशा घेत हा शो प्रेक्षकांना हलक्याफुलक्या आणि मजेशीर गुप्तहेर कथांचा अनुभव देतो. त्यातून एक साधा माणूसही असामान्य रहस्यं सोडवू शकतो हे सिद्ध होतं.

## आर्थिक समावेशकतेला दिली गती

नांदेड -भारतातील सर्वात मोठी खाजगी क्षेत्रातील, नॉन-बँकिंग कर्जदाता कंपनी आणि बजाज फिनसर्व्हचा भाग असलेल्या बजाज फायनॅन्स लिमिटेडने आज सांगितले की, यंदाच्या सणासुदीच्या मोसमात त्यांना ग्राहकोपयोगी वस्तूंच्या कर्जांमध्ये वाढ झाल्याचे दिसून आले आहे. त्यांनी यावेळी विक्रमी उपभोक्ता कर्जे वितरित केली, जी गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत प्रमाणात २७% आणि मूल्यात २९% जास्त होती. ग्राहकोपयोगी वस्तूंसाठी घेतल्या जाणाऱ्या कर्जांमधील या वाढीतून सरकारच्या नेक्स्ट जनरेशन जीएसटी सुधारणांचा तसेच वैयक्तिक आयकरात केलेल्या बदलांचा सकारात्मक परिणाम स्पष्ट दिसतो. उपभोक्त्याची खरेदी करण्याची क्षमता वाढविणे हेच या सुधारणांचे लक्ष्य होते. २२ सप्टेंबर ते २६ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत बजाज फायनॅन्सने अंदाजे ६३ लाख कर्जे वितरित केली. या कालावधीत कंपनीने २३ लाख नवीन ग्राहक मिळवले, त्यापैकी ५२% ग्राहक हे पहिल्यांदाच कर्ज घेत होते. अशाप्रकारे आर्थिक समावेशकतेत कंपनीने लक्षणीय प्रगती केली आहे.

## 'आयडिएशनएक्स २.०' चा ग्रँड फिनाले नुकताच यशस्वीरित्या संपन्न

मुंबई : भारतातील सर्वात विश्वासार्ह खासगी जीवन विमा कंपन्यांपैकी एक असलेल्या एसबीआय लाईफ इन्शुरन्सने भारतीय जीवन विमा उद्योगासाठी नावीन्यपूर्ण उपाय शोधण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर एका उपक्रमाचे आयोजन केले होते. 'आयडिएशनएक्स २.०' चा ग्रँड फिनाले नुकताच यशस्वीरित्या संपन्न झाला. मुंबईतील एस. पी. जैन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च (एसपीजेआयएमआर) येथील प्रीतिश वाधवा, स्तुती राजेश शाह आणि एशान शर्मा या दुसऱ्या वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी यात बाजी मारली आणि ते आयडिएशनएक्स २.० चे विजेते ठरले. भारतातील टॉप १०० बी-स्कूलमधील ३१,०००+ विद्यार्थ्यांचा या उपक्रमात सहभाग होता. जीवन विम्याचे भविष्य पुन्हा परिभाषित करू शकतील अशा कल्पनांचे एकत्रीकरण व्हावे यासाठी या उपक्रमाचे आयोजन केले होते.

# सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आ. प्रदीप जैस्वाल यांचे पालकमंत्र्यांना निवेदन

छत्रपती संभाजीनगर- छत्रपती संभाजीनगर मध्य मतदारसंघाचे आमदार प्रदीप शिवनारायण जैस्वाल यांनी अलीकडेच जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांना निवेदन सादर करून शहरातील प्रस्तावित विकास आराखड्यातील विविध प्रकल्पांना गती देण्याची मागणी केली आहे.

या निवेदनात त्यांनी येत्या सिंहस्थ कुंभमेळा - २०२७, नाशिक या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर येथे मोठ्या प्रमाणावर देश-विदेशातील भाविक व पर्यटक येणार असल्याने, त्यांच्या सोयीसाठी शहरातील पर्यटनस्थळे, रस्ते, वाहतूक आणि सार्वजनिक सुविधा यांचे सर्वांगीण उन्नतीकरण करण्यावर भर देण्यात यावा, असे नमूद केले आहे.

आमदार जैस्वाल यांनी प्रस्तावित केलेल्या विकास कामांमध्ये खालील महत्त्वाचे मुद्दे अधोरेखित करण्यात आले आहेत:

१. बाबा पेट्रोल पंप ते दिल्ली गेट ते हर्सूल टि पॉईंट रस्त्याची सर्वकष सुधारणा करणे. २. हर्सूल टि पॉईंट ते जटवाडा रामा २१७ रस्त्यावरील स्मृती वन ते अंबरहिल पर्यंत रस्त्याची सर्वकष सुधारणा करणे. ३. शहरातील हरिसध्दी माता मंदिर, श्री.गोगानाथ बाबा टेकडी, श्री निपटनिरंजन मंदिर, श्री हनुमान टेकडी, बीबी का मकबरा, पाणचक्कीकडे जाणा-या रस्त्यावरील मकाई गेट व महेमुद गेट जवळील पुलाच्या शेजारी नविन पुल बांधणे. ४. उज्जैन येथील चक्रवर्ती सम्राट विक्रमादित्य यांनी भारतातील दुसरे श्री हरसिध्दी माता मंदिर हर्सल येथे बांधले आहे. त्यामुळे या मंदिराचे विशेष महत्व आहे. करिता या मंदिराचे संवर्धन व परिसराचा विकास करणे. ५. शहरात विविध ठिकाणी स्वच्छता गृह बांधणे. मोबाईल टॉयलेट, वाहतूक बेटाचे सौंदर्यकरण करणे, तीर्थक्षेत्र व पर्यटन स्थळांकडे जाणा-या रस्त्यांवर पथदिवे बसविणे तसेच दिशा दर्शक फलक आदि. कामे करणे गरजेचे आहे. ६. तिर्थक्षेत्र व पर्यटन स्थळ येथे प्रथमोपचार केंद्रे उभारणे, रुग्णवाहिकेची व्यवस्था करणे. ७. सद्यस्थितीत असलेले मध्यवर्ती बसस्थानकाचे नुतनीकरण करणे व रस्त्याचे डांबरीकरण व सिमेंट कॉक्रीटीकरण करणे. ८. तिर्थक्षेत्र व पर्यटन स्थळाकडे येण्या-जाण्यासाठी परीवहन महामंडळाची जास्तीच्या बसेसची व्यवस्था करणे. ९. मध्यवर्ती बसस्थानकाची नविन इमारतीची उभारणी करणे. १०. नविन शासकिय विश्रामगृह बांधणे तसेच हिमायतबागेच्या मागील बाजूस असलेल्या शासकिय जमीनीवर नविन अद्यावत विश्रामगृह / भक्त निवास बांधणे. ११. परिवहन महामंडळाच्या बसस्थानकावर, रेल्वेस्थानकावर प्रथोमोपचार केंद्रे उभारणे. १२. शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय व जिल्हा शासकिय रुग्णालय येथे अद्यावत ट्रॉमा केअर सेंटर, वार्ड, उभारणे व मुबलक प्रमाणात औषधीचा साठा उपलब्ध करणे. १३. नाशिक ते छत्रपती संभाजीनगर रेल्वेच्या फे-या वाढविणे तसेच नविन रेल्वे सुरु करणे. १४. छत्रपती संभाजीनगर शहरात अनेक पर्यटक येण्याची शक्यता असल्याने छत्रपती संभाजीनगर शहरातील सकाळी ०५ वाजेपर्यंत खानावळीचे हॉटेल सुरु ठेवण्यास परवानगी देणे. १५. भाविकांसाठी मल्टीलेव्हल पार्किंगची व्यवस्था करणे. १६. मुख्य मार्गावर असलेल्या पार्किंग मध्ये ई.व्ही. चार्जिंग स्टेशन उभारणे. १७. शहरातील मुख्य रस्त्यावरील महावितरण कंपनीच्या उच्चदाब / लघुदाब / रोहीत्र व पोल स्थलांतरीत करणे. १८. मुख्य रस्त्यावर सौर ऊर्जा पथदिवे बसविणे. १९. नव्याने विकसीत होणा-या रस्त्यावर स्मार्ट वाहतूक साकेतांक, दिशादर्शक फलक, कमान उभारणी करणे. २०. महावितरणचे शहरातील सिडको हडको भाग, जिल्हापरिषद मैदान औरंगपुरा, हर्सुल, जाधववाडी येथे नविन सबस्टेशन उभारणे. आमदार प्रदीप जैस्वाल यांनी निवेदनाद्वारे स्पष्ट केले की, छत्रपती संभाजीनगर हे ऐतिहासिक व धार्मिक महत्त्वाचे ठिकाण असून, आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर हे शहर पर्यटन केंद्र म्हणून उदयास यावे, यासाठी समन्वयित विकास आराखडा आवश्यक आहे.

# कन्नड शहरात शॉर्टसर्किटमुळे घर भस्मसात

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि. ०५ नोव्हेंबर- शहरातील श्रीराम कॉलनीत सोमवारी रात्री घडलेली आग संपूर्ण परिसराला हादरवून गेली. रात्री सुमारे अकरा वाजेच्या सुमारास घुगे कुटुंबाच्या घरात शॉर्टसर्किट झाल्याने लागलेल्या आगीने क्षणात भीषण रूप धारण केले.



धुराचे लोट उठू लागले, आगीतून जळणाऱ्या वस्तूंचा वास हवेत दरवळू लागला. त्यावेळी घरात वृद्ध वाणाबाई गोविंद घुगे (वय ६०) या एकट्याच होत्या. आग झपाट्याने पसरत असल्याने घरात शिरणे अशक्य झाले होते. पण स्थानिक नागरिकांनी जीवाची पर्वा न करता घराच्या मागील बाजूने दार फोडून आत प्रवेश केला आणि वृद्ध आजींना सुरक्षित बाहेर काढले. दरम्यान, अग्निशमन दलाला तात्काळ पाचारण करण्यात आले. दलाने अर्धा ते पाऊण तास शर्थीचे प्रयत्न करून अखेर ही आग नियंत्रणात आणली. मात्र तोपर्यंत घरातील जीवनावश्यक वस्तू, कपडे, धान्य, फर्निचर, कागदपत्रे व विद्युत साहित्य सर्व जळून खाक झाले होते.या आगीत गोविंद काळू घुगे (६५), वाणाबाई गोविंद घुगे (६०), राजेंद्र गोविंद घुगे (४०), संतोष गोविंद घुगे (३२) आणि कुंतीका संतोष घुगे (२५) या पाच सदस्यांच्या कुटुंबाचे प्रचंड नुकसान झाले आहे. हे कुटुंब भाजीपाला विक्री करून उदरनिर्वाह करणारे असून आगीत सर्वस्व गमावल्याने त्यांच्यावर मोठे संकट कोसळले आहे. परिसरातील नागरिकांनी प्रशासनाने या कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत करावी, अशी मागणी केली आहे.

# औद्योगिक उद्योगांबरोबर हॉटेल उद्योगांची छत्रपती संभाजीनगर मध्ये गुंतवणूक

(नारायण गायकवाड)

छत्रपती संभाजीनगर- येथे मोठमोठ्या औद्योगिक उद्योगांनी आपल्या कंपन्या स्थापन करण्यास सुरुवात केली आहे. उद्योगाबरोबरच आता छत्रपती संभाजीनगर मध्ये हॉटेल इंडस्ट्रीने आपले पाय रोवण्यास सुरुवात केली आहे. प्राईड हॉटेल ग्रुपने पुणे नाशिक पाठोपाठ आता छत्रपती संभाजीनगर येथे हॉटेल उभारले असून आज अधिकृत उद्घाटन करण्यात आले. हे हॉटेल शहराच्या विमानतळापासून अवघे ३०० मीटर अंतरावर असून व्यावसायिक व पर्यटन प्रवाशांसाठी अत्यंत सोयीचे ठरणार आहे.



हॉटेल रिचमंड ट्रेडिंग कंपनी यांच्या सहकायनि उभारण्यात आली आहे. प्राइड इलाइट छत्रपती संभाजीनगर' हे प्राइड ग्रुपचे महाराष्ट्रातील चौथे आणि 'प्राइड इलाइट' ब्रँडखालील सातवे हॉटेल आहे.हॉटेलमध्ये एकूण ६० आधुनिक खोल्या असून काही खोल्यांमधून विमानतळाच्या रनवेचे सुंदर दृश्य दिसते. याशिवाय, ३,५०० चौरस फूट क्षेत्रफळाचा विशाल बैंक्वेट हॉल कॉर्पोरेट कॉन्फरन्स, सामाजिक समारंभ आणि लग्न सोहळ्यांसाठी उपलब्ध आहे.तसेच, छोट्या व्यवसायिक बैठकींसाठी सुसज्ज बोर्डरूमची सुविधाही हॉटेलमध्ये आहे.रिचमंड ट्रेडिंग कंपनीचे मालक राजू मनकानी यांनी सांगितले,प्राइड इलाइट छत्रपती संभाजीनगरचे आर्किटेक्चर आम्ही आधुनिकतेसोबत छत्रपती संभाजीनगरच्या वाढत्या ऊर्जेशी सुसंगत ठेवले आहे.प्राइड हॉटेल्स ग्रुपचे कार्यकारी संचालक अतुल उपाध्याय म्हणाले,आमच्या इलाइट ब्रँड अंतर्गत हे नवीन हॉटेल आमच्या विस्ताराच्या दृष्टिकोनाला बळकटी देणारे आहे. छत्रपती संभाजीनगर हे व्यवसायिक तसेच पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचे ठिकाण असल्याने हे हॉटेल दोन्ही प्रकारच्या पाहुण्यांना आकर्षित करेल.हॉटेलचे जनरल मॅनेजर श्री. मानस मोहंती यांनी सांगितले,आमच्या तीनही डाइनिंग आऊटलेट्समधून पाहुण्यांना वेगवेगळ्या प्रसंगांसाठी योग्य अनुभव देण्याचा आमचा प्रयत्न आहे. उरीरलश्ररपलर सर्व वेळ खुले असलेले फाईन डायनिंग, -ींश्ररपींळी तरुणाईसाठी ऊर्जा-पूर्ण स्पेस तर -शीलळीं खदण हे आरामदायी आणि प्रीमियम रूफटॉप लाउंज आहे.

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही. डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि.अर्ज क्र.५३७/२०२५ पु. ता. ०२/१२/२०५५

अर्जदार १) गणेश रामहारी झाल्टे, वय ४४ वर्षे, धंदा शेती, रा. आलापुर, ता. कन्नड जि. औरंगाबाद २) संगीता आबासाहेब निघोटे, वय ४२ वर्षे, धंदा घरकाम, रा. पिंपळगाव, ता. वैजापुर जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

अर्ज - Bombay Regulation Act 1827 चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअथी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ आर.एम. नरोटे यांचे मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ व २ हे वरील ठिकाणचे रहीवाशी असुन अर्जदार क्र. १ व २ हे आपसात सख्खे भाऊ-बहीन आहे. अर्जदार क्र. १ व २ यांचे वडील नामे रामहारी सर्जेहराव झाल्टे हे होते ते दिनांक १५/०९/२०२५ रोजी मौजे आलापुर ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्र. १ व २ यांची आई नामे यमुनाबाई रामहारी झाल्टे या होत्या त्या दिनांक ३०/०६/२०२१ रोजी मौजे आलापुर ता. कन्नड येथे मयत झालेल्या आहे दोन्ही मयतांचा अंत्यविधी मौजे आलापुर ता. कन्नड येथे झालेला आहे. त्यांचे अर्जदार क्र. १ व २ हे वारस आहे, सोबत दोन्ही मयतांचे मृत्यु प्रमाणपत्र दाखल करीत आहे. अर्जदार क्र. १ व २ यांना मयत रामहारी सर्जेराव झाल्टे यांचे वारस प्रमाणपत्र हे शासकिय तसेच निमशासकिय, तलाठी, जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात देण्यासाठी, तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच विविध योजनेचा लाभघेण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, करीता वारस प्रमाणपत्राची मागणी अर्जदार क्र. १ व २ हे करीत आहे. अर्जदार क्र. १ व २ हे गृप ग्रामपंचायत कार्यालय आलापुर/केसापुर येथे दिनांक २८/१०/२०२५ रोजी वारस प्रमाणपत्राची मागणी केली असता त्यांनी वारस प्रमाणपत्र दिले नाही म्हणुन दिनांक २८/१०/२०२५ रोजी अर्जास कारण घडले आहे, अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी इतर कोणत्याही न्यायालयात अर्ज केलेला नाही. अर्जदार क्र. १ व २ यांच्या व्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही, अर्जदार क्र. १ व २ हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक ०३/११/२०२५

आदेशावरुन

क. लिपिक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही. डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांकः ५३१/२०२५ पु. तारीख १७/१२/२०२५

अर्जदार : १- सुरेश पांडुरंग केदारे. वय ५० वर्ष, धंदा शेती, रा.मु. पळशी खुर्द, पो. पळशी बु. ता. कन्नड जि. औरंगाबाद २- हरी पांडुरंग केदारे. वय ५३ वर्षे, धंदा शेती, रा.मु. पळशी खुर्द. पो. पळशी बु. ता. कन्नड, जि. औरंगाबाद ३- बाळू पांडुरंग केदारे, वय ४४ वर्षे, धंदा शेती, रा.मु. पळशी खुर्द, पो. पळशी बु. ता. कन्नड, जि. औरंगाबाद ४- शोभाबाई भ्र. भाऊसाहेब घुगे, वय ४९ वर्षे, धंदा घरकाम, रा.मु. देवपुळ, पो.वासडी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद ५- मैनाबाई भ्र. पांडुरंग केदारे, वय ८१ वर्षे, धंदा घरकाम. रा.मु. पळशी खुर्द, पो. पळशी बु. ता. कन्नड, जि. औरंगाबाद

-विरुध्द-

गैरअर्जदार :- निरंक

अर्ज - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे हेअरशिप सर्टीफिकेट मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ यु. ए. वारे यांचे मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्रमांक १ ते ४ हे आपसात भाऊ बहिण असून अर्जदार क्रमांक ५ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्रमांक १ ते ४ चे वडील व अर्जदार क्रमांक ५ चे पती नामे पांडुरंग त्रिंबक केदारे हे दिनांक १७/०२/२०११ रोजी पळशी. खुर्द ता. कन्नड येथे मयत झाले आहे. तसेच मयत पांडुरंग त्रिंबक केदारे यांचे आई-वडिल यापूर्वीच मयत झाले आहे. सोबत ग्राम पंचायत कार्यालय पळशी खुर्द, ता. कन्नड यांचे कडील मृत्यु प्रमाणपत्र अर्जा सोबत दाखल केले आहे. मयतांच्या नावे भविष्यात शासकीय निमशासकीय मिळणारे फायदे तसेच मयताच्या नावाने असलेल्या नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला नोंद घेणेसाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे. सबब सदरील अर्ज करणेस कारण घडले आहे. अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारां शिवाय मयतांना कोणीही ईतर वारस नाही. तसेच अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी वारस कार्यवाही करणेसाठी तलाठी कार्यालय, ग्राम पंचायत कार्यालय इत्यादी ठिकाणी आवश्यक असल्याने वारस प्रमाण पत्राची अर्जदार हे मागणी करीत आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की. सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक ०५/११/२०२५

आदेशावरुन

क. लिपिक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्याखालय, क, स्वर, कन्नड

## मुलीच्या जन्माचे स्वागत करणारे गाव जरंडी



तभा.वृत्तसेवा

सोयगाव, दि.५ नोव्हेंबर : मुलगा,मुलगी एक समान असेही कितीही म्हटले जात असले तरी काही ठिकाणी अजूनही मुलीबाबत भेद केला जातो.पण हा भेदभाव कायमचा दूर व्हावा,मुलाप्रमाणेच मुलीच्या जन्माचे स्वागत व्हावे,मुलगाच हवा ही मानसिकता बदलावी,मुलीच्या जन्मानंतर कुटुंबात तिचेही स्वागत व्हावे यासाठी सोयगाव तालुक्यातील जरंडी हे गाव गेल्या चार दोन वर्षांपासून प्रयत्न करीत आहे.एखाद्या कुटुंबात पहिली मुलगी जन्मास आल्यास त्या कुटुंबाला १५०० रुपये ग्रामपंचायततर्फे दिले जाते.एवढेच नव्हे तर तिच्या आई-वडिलांचा कार्यक्रम आयोजित करून सत्कार केला जातो. त्यामुळे मुलीच्या जन्माचे स्वागत करणारे गाव अशी ओळख या गावाची तालुक्यात होऊ लागली आहे.

ग्रामपंचायतच्या माध्यमातूनही गाव विकास साधून.अनेक लोकाभिमुख योजनाही ग्रामपंचायत व लोकसहभागातून साध्य केल्या आहेत.परंतु लोकांच्या कल्याणासाठी आणि ग्रामपंचायतच्या वतीने गावकऱ्यांत एक सामाजिक सलोखा निर्माण करता यावा.त्या दिशेने जरंडी ग्रामपंचायतचे सरपंच स्वाती पाटील,उपसरपंच संजय पाटील,वंदना ताई पाटील,नीलिमा पवार व ग्रामपंचायत अधिकारी सुनील मंगरुळे यांच्या प्रेरणेतून विविध लोकोपयोगी योजना ग्रामपंचायत राबवीत आहे.

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२५/मशाका/जमाबंदी- १/ जन्म-मृत्यु नोंद/सिआर-२७२

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड

दिनांक ०३/११/२०२५

अर्जदार : मुरलीधर काशिनाथ सोनवणे रा.टाकळी अं. ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय टाकळी अं. ता. कन्नड ता. कन्नड जि. छ.संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ / ॲड. डी. एम. राहणे मार्फत / स्वतः अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगीचे जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा मुलगी संजना मुरलीधर सोनवणे चा जन्म दिनांक २३-०८-२००८ रोजी टाकळी अं. ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगी चा जन्म दिनांक २३-०८-२००८ रोजी टाकळी अं. ता. कन्नड / ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म/मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा मुलगी संजना मुरलीधर सोनवणे यांचा जन्म दिनांक २३-०८-२००८ रोजी टाकळी अं. ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक ०८-१२-२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक २३-०८-२००८ रोजी टाकळी अं. ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक ...../११/२०२५ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२५/मशाका/जमाबंदी- १/ जन्म-मृत्यु नोंद/सिआर-२७१

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड

दिनांक ०३/११/२०२५

अर्जदार : मुरलीधर काशिनाथ सोनवणे रा.टाकळी अं. ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय टाकळी अं. ता. कन्नड / ता. कन्नड जि. छ.संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ / ॲड. डी. एम. राहणे मार्फत / स्वतः अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगाचे जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा मुलगा अभिषेक मुरलीधर सोनवणे चा जन्म दिनांक २४-०५-२००६ रोजी टाकळी अं. ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगा चा जन्म दिनांक २४-०५-२००६ रोजी टाकळी अं. ता. कन्नड / ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म/मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा मुलगा अभिषेक मुरलीधर सोनत्रणे यांचा जन्म दिनांक २४-०५-२००६ रोजी टाकळी अं. ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक ०८-१२-२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक २४-०५-२००६ रोजी टाकळी अं. ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक ......./११/२०२५ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

## जाहिर प्रकटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.२९०/ २०२५

१/- कृष्णा विष्णू मिसाळ, वय ३३ वर्ष, धंदा शेती, रा. आमखेडा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर.

विरुद्ध

निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सुनिल गिरी, रा.सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. नयत विष्णू गंगाराम मिसाळ यांचा दिनांक ०२.०९.२०२५ रोजी मौजे आमखेडा, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर, येथे मृत्यु झालेला असुन त्याच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ है वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. हे मयत विष्णू गंगाराम मिसाळ यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारें प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक ५/११/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता. १७/१२/२०२५

आदेशावरुन

क. लिपीक सहा. अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

# केंद्रीय पथकाचा बीड जिल्हा दौरा अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ नोव्हेंबर**

अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे बीड जिल्ह्यात झालेल्या मोठ्या नुकसानीची पाहणी केंद्रीय पथकाने आज (५ नोव्हेंबर) केली. पथकात एसव्हीएसपी शर्मा, विशाल पांडे यांचा समावेश होता.

पथकाने विविध गावांमधील नुकसानीची पाहणी करत शेतकऱ्यांशी संवाद साधला आणि नुकसानीचा अंदाज घेतला. पथकाच्या दौऱ्यात नोंदवलेल्या नुकसानीच्या प्रकारानुसार, अनेक ठिकाणी शेतीचे आणि मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे.

दौऱ्याची सुरुवात बीड तालुक्यातील लिंबा रुई येथून झाली, जिथे शेती, पीक आणि जमीन खरडून जाणे, तसेच विहिरी गाळाने भरणे अशा स्वरूपाचे नुकसान आढळले. शिरूर कासार तालुक्यातील येवलवाडी येथे पूल आणि रस्ता वाहून गेल्यामुळे दळणवळणाचे मोठे नुकसान झाले आहे. कारेगाव (ता. शिरूर), घाटपिंपरी, देवळाली (ता. आष्टी)येथे देखील जमीन खरडून जाणे आणि शेती पिकाचे मोठे नुकसान झाल्याची नोंद घेण्यात आली. घाटापिंप्री येथे जमीन खरडून जाण्याचे तर देवळाली येथे फळबाग नुकसानीचे प्रमाण मोठे असल्याचे पथकाच्या निदर्शनास आले.

पाहणी दौऱ्या दरम्यान उपविभागीय अधिकारी कविता जाधव, वसीमा शेख,



तहसीलदार चंद्रकांत शेळके, वैशाली पाटील, सुरेश घोळवे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे आदींसह सर्व विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पथकाने आज बीड, आष्टी आणि शिरूर कासार तालुक्यांतील अतिवृष्टीग्रस्त भागांना भेट देत गावांमध्ये शेतजमिनीवरील गाळ, रस्त्यांवरील भगदाडे, नाले-ओढ्यांचे तुटलेले बांध, तसेच घरांची पडझड, विद्युत पुरवठा नुकसान आदी प्रकार पाहिले. पथकातील अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी संवादही साधला.

राज्यातील खरीप हंगाम २०२५ मध्ये अतिवृष्टी, पूरस्थिती आणि नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे मूल्यमापन करण्यासाठी हे पथक जिल्ह्यात आले होते. जिल्ह्यात झालेल्या नुकसानीमध्ये शेतजमीन वाहून जाणे, धरणांचे पाणी ओसंडून वाहणे, दगावलेली जनावरे, घर व रस्ते यांचे नुकसान या सर्व बाबींची माहिती सकाळी शासकीय विश्रामगृह येथे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , जिल्हा अधीक्षक सुभाष साळवे यांनी केंद्रीय पथकास सविस्तर दिली .

जिल्ह्यात मोठ्याप्रमाणात नुकसान

जिल्ह्यातील ८ लाख ६ हजार शेतकऱ्यांचे सुमारे ७ लाख १३ हजार हेक्टर क्षेत्र पावसाने बाधित झाले असून, आतापर्यंत ५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली आहे तर ४४५ कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम वितरित करण्यात आली आहे . अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात १ ,००० पेक्षा अधिक जनावरांचे प्राण गेले, १,३१३ घरांचे संपूर्ण किंवा अंशतः नुकसान झाले आणि ७,४७२ सार्वजनिक मालमत्तांचे नुकसान झाल्याचे जिल्हा अहवालात नमूद आहे .सार्वजनिक मालमत्तांना देखील मोठी झळ बसली आहे. बांधकाम विभागाचे रस्ते आणि पुलांचे, महावितरणचे खांब व वीजवाहिन्यांचे तर महामार्ग, शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, अंगणवाडी व ग्रामपातळीवरील पायाभूत सुविधा या सर्वांचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले आहे.

# आज बालाजी भगवान शेष वाहन शोभायात्रा



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ नोव्हेंबर**

बालाजी मंदिर संस्थान बीड येथे सुरू असलेल्या ब्रम्होत्सवाच्या निमित्ताने आज (गुरुवार, दि. ०६ नोव्हेंबर २०२५) रोजी बालाजी भगवानांचे शेष वाहन शोभायात्रा मोठ्या उत्साहात निघणार आहे.

ही शोभायात्रा सायंकाळी ७:३० वाजता निघणार असून, रात्री ९:०० वाजता आरती होईल. आरतीनंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या धार्मिक सोहळ्याचा सर्व भक्तांनी लाभ घ्यावा, असे बालाजी मंदिर संस्थान बीड व ब्रम्होत्सव समिती यांनी केले आहे.

## ब्रह्माकुमारीज बीड यांच्या द्वारे 'स्वास्थ्य, समृद्धि आणि खुशीचे रहस्य' विशेष कार्यक्रम

**समाजसेवेत कार्यरत ९० महानुभावांचा सन्मान**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ नोव्हेंबर**



प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, आंतरराष्ट्रीय आध्यात्मिक संस्था असून आजतागायत समाजात आध्यात्मिक जागृती, नैतिक मूल्यांचा प्रसार आणि तणावमुक्त जीवनासाठी कार्यरत आहे. ही संस्था २१ प्रभागांद्वारे (ऊशरीीं-ाशपीीं) कार्यरत आहे, ज्यामध्ये समाज सेवा प्रभाग हा एक भाग आहे. ब्रह्माकुमारीज बीड सेवाकेंद्र यांच्या वतीने स्वास्थ्य, समृद्धि आणि खुशीचे रहस्य या विषयावर भव्य आध्यात्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात समाजसेवेत योगदान देणाऱ्या ९० महानुभावांचा सन्मान करण्यात येणार आहे.कार्यक्रमाचे मुख्य वक्ते राजयोगी बी.के. प्रो. ई. व्ही. गिरीश (मुंबई) असून ते स्वास्थ्य, समृद्धी आणि आनंद यामधील आध्यात्मिक संबंध स्पष्ट करतील. हा कार्यक्रम बुधवार, ५ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत, सम्राट लॉन्स, उत्तम नगर, कॉलनी रोड, बीड येथे भव्य स्वरूपात पार पडणार आहे होणार आहे.या सोहळ्यास अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. त्यात मा. श्री. अंबादासजी दानवे (विरोधी पक्ष नेते, विधान परिषद), मा. श्री. बजरंग बप्पा सोनवणे (खासदार, बीड), मा. श्री. संदीप क्षीरसागर (आमदार, बीड), मा. श्री. विवेक जॉन्सन (जिल्हाधिकारी, बीड), मा. श्री. नवनीत कावत (पोलीस अधीक्षक, बीड), मा. श्री. जयदत्त अण्णा क्षीरसागर (माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य) आणि डॉ. ईशा अग्रवाल (मिस इंडिया, अभिनेत्री, मुंबई) यांचा समावेश आहे.या कार्यक्रमाचे आयोजन संस्थेच्या समाज सेवा प्रभागाच्या माध्यमातून करण्यात आले असून, या उपक्रमाचा उद्देश समाजसेवकांना प्रोत्साहन देणे आणि सर्वांसाठी अंतरिक शांती, आरोग्य व आनंदाचा संदेश पोहोचवणे हा आहे.

# खा.सोनवणेंनी लक्ष घातले अन् सोयाबीन खरेदीबाबत निघाले आदेश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ नोव्हेंबर**

यावर्षी बीड जिल्ह्यात अतिवृष्टी झाली. यामुळे शेतातील पिके मातीत मिसळली. यातूनही सोयाबीनसारखी पिके काही प्रमाणात हाती लागली आहेत, परंतु शासनाने अद्याप खरेदी केंद्रे सुरू केलेली नाहीत. यामुळे शेतकरी अडचणी सापडलेला असून शेतकऱ्यांचे तातडीने कापूस केंद्र सुरू करावेत, असे काळजीचे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी पणन मंत्री जयकुमार रावल यांना दि.२८ ऑक्टोबर रोजी दिले होते. यानंतर सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने सोयाबीन, मुग, उडीद पिकांची हमीभावाने खरेदी करण्याबाबत प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश काढले आहेत.

बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सोयाबीनचे क्षेत्र आहे. सदरील सोयाबीनची काढणी, मळणी झालेली असून आता शेतकऱ्यांना हमीभावाप्रमाणे दर मिळाला पाहिजे, यासाठी सोयाबीन खरेदी केंद्र सुरू असणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेवून खा.बजरंग सोनवणे यांनी दि.२८ ऑक्टोबर रोजी पणन मंत्री जयकुमार रावल यांना पत्र दिले होते. या पत्रात म्हटले होते, बीड जिल्ह्यातील बहूतांश शेतकरी वर्ग हा सोयाबीन उत्पादक आहे. सदर हंगामात पावसाचे प्रमाण अनियमित असूनही शेतकऱ्यांनी मोठ्या कष्ठाने सोयाबीन पीक घेतले असून सद्या बाजारभावात घसरण सुरू आहे. यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचे योग्य दराने (टरढ) विक्री करण्यासाठी शासनाने खरेदी केंद्रे सुरू करावीत, असे म्हटले होते. खा.बजरंग सोनवणे हे राज्यभरात शेतकरीपुत्र म्हणून ओळखले जातात. ते कायम शेतकऱ्यांच्या विषयावर पोटतिडकीने संसदेतही देखील प्रश्न मांडतात. जिल्ह्यातील शेतकरी जेव्हा जेव्हा अडचणीत असतात, तेव्हा ते सर्वात अगोदर त्याठिकाणी धावून जात असतात, असा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा अनुभव आहे. जिल्ह्यात मागील महिन्यात अतिवृष्टी झाली. यामुळे शेतीचे आणि पिकांचेही अतोनात नुकसान झालेले आहे. यातूनही जे सोयाबीन हाती लागले आहे, त्याला योग्य दर मिळावा, यासाठी खरेदी केंद्र सुरू करण्याची मागणी केली होती. यानंतर सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने हंगाम २०२५-२६ मध्ये सोयाबीन, मुग, उडिद पिकांची हमीभावाने खरेदी प्रक्रिया राबविण्याकरीता शासनाने मंजूरी दिली आहे. त्यानूसार हमीभाव योजनेंतर्गत दि.३० ऑक्टोबर २०२५ पासून दि.३१ डिसेंबर २०२५पर्यंत शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी व दि.१५ नोव्हेंबरपासून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनूसार पुढील ९० दिवसांसाठी खरेदी करण्याचे करण्याचे आदेश दिले आहेत.




देशाचे लोह पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवसानिमित्त परळी भारतीय जनता पक्षाच्या वतीने आयोजित 'एकता दौड' (रन फॉर युनिटी) उत्साहात संपन्न झाली.

# श्री संत मन्मथस्वामी भक्त कपिलधारहून परळीच्या प्रभू वैद्यनाथाकडे





## वीरशैव लिंगायत समाज व श्री मन्मथस्वामी सेवा संघ यांच्या वतीने हजारो भाविकांना खिचडी प्रसाद वाटप

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.५ नोव्हेंबर**

श्री क्षेत्र कपिलधार येथील श्री संत शिरोमणी मन्मथस्वामींच्या संजीवन समाधीचे दर्शन घेवून आपआपल्या गावी परतणार्या वीरशैव लिंगायत बांधवांची पाऊले बुधवार दिनांक पाच नोव्हेंबर रोजी परळीतील बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेले श्री क्षेत्र वैद्यनाथ प्रभूंच्या दर्शनासाठी वळत असून परळीत यावे श्रीं चे दर्शन घ्यावे असे समिकरणच आता रूढ झाले आहे. एकीकडे भाविकांची गर्दी वाढत असतांना त्यांना आपल्याला घडेल त्या श्रद्धेतून त्यांच्यासाठी खिचडी, चहा, पाणी व अन्य अन्न पदार्थाचा महाप्रसादही परळीतील वीरशैव लिंगायत समाजाच्या श्री मन्मथ स्वामी सेवा संघाचे सर्व पदाधिकारी, व सदस्य गेल्या १८ वर्षापासून करीत आहेत. श्री व सौ भाग्यवंत आप्पा यांच्या हस्ते श्रींचे पूजन करण्यात आले.

श्री संत श्री संत मन्मथ स्वामी सेवा संघाचे शिवराजआप्पा बोटूळे रघुनाथ आप्पा भाग्यवंत व उज्वला भाग्यवंत यांच्या हस्ते पूजा करण्यात आली.शिवराज आप्पा बोटुळे, रामकिशन आप्पा साखरे, सोमनाथ आप्पा ओपळे, प्रकाश धोकटे, बालाजी सेलुकर, रघुनाथ आप्पा भाग्यवंत, संदीप हालगे, महादेव मोडीवाले, शिवाजी बुद्रे व सहकाऱ्यांच्या पुढाकाराने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. श्रीक्षेत्र कपिलधारहुन दर्शन घेऊन परत येणार्या भाविकांसाठी बुधवार दिनांक ५ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजल्यापासून येथील श्री संत गुरुलिंग स्वामी मठ संस्थान बेलवाडीमध्ये येथे वीरशैव लिंगायत समाजाच्या श्री मन्मथ स्वामी सेवा संघाच्या वतीने खिचडी प्रसादाचा कार्यक्रम दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी ठेवण्यात आला. श्री मन्मथ स्वामींच्या यात्रेत सहभागी झालेल्या भाविकांची पाऊले आता आपआपल्या घराकडे वळत असतांना श्री क्षेत्र परळी येथे वैद्यनाथ प्रभूंच्या दर्शनाकडेही वळाली आहेत.

आज दिवसभर भाविक मोठ्या संख्येने परळीत दाखल झाले आहेत. मागील १८ वर्षापासून ही परंपरा परळीमध्ये वीरशैव समाज व श्री मन्मथ स्वामी सेवा संघ हे जपत आहेत. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून वीरशैव महासभेचे बीड जिल्हा अध्यक्ष दत्ताप्पा इटके गुरुजी, ॲड. मनोजआप्पा संकाये, पत्रकार श्री संजय खाकरे, संतोष जुजगर, संपादक बालाजी ढगे आदी उपस्थित होते.

### बेलवाडी परिसराला आले जत्रेचे स्वरूप

श्रीक्षेत्र कपिलधार येथील श्री संत मन्मथ स्वामी यांच्या पवित्र समाधी स्थळाचे दर्शन घेऊन आंध्रप्रदेश कर्नाटक, तामिळनाडू व महाराष्ट्रातील विविध भागातून आलेले हजारो भाविक भक्तांनी आज बुधवारी परळी येथील बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेले प्रभुवैद्यनाथाचे दर्शन घेतले. परळीत आलेल्या भाविकांची महाप्रसादाची व्यवस्था वीरशैव लिंगायत समाज, श्री मन्मथ स्वामी सेवा संघ यांच्या वतीने करण्यात आली होती. महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी हजारो भावीक भक्तांनी गर्दी केल्याचे दिसून आले. दरम्यान बेलवाडी परिसरात बेल, फुल, नारळ आदी प्रसादालयाची दुकाने मोठ्या संख्येने घातली गेली होती त्यामुळे वैजनाथ मंदिर परिसराला जणू काही जत्रेचे स्वरूप आल्याचे दिसून आले.

# जिल्हास्तरीय तंबाखू नियंत्रण कार्यशाळा बीड येथे संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ नोव्हेंबर**

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हा व तालुका स्तरावरील महत्त्वाच्या अधिकाऱ्यांसाठी 'District Block Level Key Officials Orientation on NTCP COTP--2003' या विषयावर एक महत्त्वपूर्ण कार्यशाळा बीड येथे आयोजित करण्यात आली होती.



जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय बीड आणि मराठवाडा ग्रामीण विकास संस्था (MGVS) छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात पार पडली.

मार्गदर्शक अधिकाऱ्यांची उपस्थिती

या कार्यशाळेला मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय तंबाखू नियंत्रण समन्वय समिती श्री. विवेक जॉन्सन सर, मा. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत सर, मा. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ सर, तसेच मा. निवासी वैद्यकीय अधिकारी (बा. सं.) डॉ. एल. आर. तांदळे सर यांचे मार्गदर्शन लाभले.

मार्गदर्शन आणि विषय

कार्यक्रमात श्री. अप्पासाहेब उगले, संचालक, MGVS यांनी अधिकाऱ्यांशी संवाद साधला. त्यांनी जिल्हा व तालुका स्तरावरील समन्वय समितीची रचना, सदस्यांच्या जबाबदाऱ्या, तंबाखू नियंत्रण कायदा COTP--2003 आणि WHO-FCTC -rticle ५.३ यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सखोल माहिती देत मार्गदर्शन केले.

अधिकारी आणि मान्यवर उपस्थित

या कार्यशाळेला सर्व वैद्यकीय अधीक्षक, सर्व तालुका आरोग्य अधिकारी, तसेच पोलीस उपअधीक्षक श्री उमाशंकर कस्तुरे सर, डॉ. सतेंद डबडगावकर, डॉ. अभिजित भालेकर, डॉ. अशोक मते, डॉ. निकिता गायकवाड, श्री. नागनाथ भडकुंबे, श्री. सुरेश दामोधर, श्री. श्रीकांत उजागिरे आदी मान्यवर अधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अशोक मते यांनी केले, तर समन्वय व आयोजनाची जबाबदारी जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्षाने यशस्वीरित्या पार पाडली. या कार्यशाळेमुळे तंबाखू नियंत्रणाच्या अंमलबजावणीला जिल्हा व तालुका स्तरावर अधिक बळकटी मिळणार आहे.

# पदवीधर मतदार नोंदणी करण्याकरिता कालावधी वाढवून देण्यात यावा

## महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद व अखिल भारतीय शैक्षिक महासंघ ची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ नोव्हेंबर**

छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदार संघ निवडणूक-२०२६ करिता मतदार नोंदणी दिनांक ३०-०९-२०२५ ते ०६-११-२०२५ हा कालावधी दिलेला आहे, परंतु मराठवाडा विभागात एकूण आठ जिल्हे व ७६ तालुके असून हा मतदार संघ फार मोटा आहे, पदवीधर मतदार हा शहरी भागासह ग्रामीण भाग व वाडी-तांड्यासह दुर्गम भागात विभागला गेलेला आहे. या नोंदणी दरम्यान मराठवाडा विभागात होत असलेल्या अतिवृष्टी मुळे बहुतेक पदवीधरांना नोंदणी करता आली नाही.

तसेच दिपावली सणाच्या दिर्घकालीन सुट्ट्या मुळे बहुतेक मतदार कुटुंबासह बाहेरगावी प्रवासात असल्याने नोंदणी करु शकले नाहीत, त्यामुळे नोंदणी करण्याकरिता अतिशय अल्प कालावधी मिळाला व नोंदणी अतिशय कमी झाल्याचे समजते, करिता आपणास विनंती करण्यात येते की, पदवीधर मतदार नोंदणी करण्याकरिता अजून कालावधी वाढवून देण्यात यावा, ही विनंती अशा प्रकारचे जिल्हाधिकारी बीड यांना महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद बीड वतीने निवेदन देण्यात आले व वरील मागणी भगवान चाटे जिल्हा अध्यक्ष महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, बीड पदाधिकारी प्रा. बाळासाहेब साळवे विभागीय अध्यक्ष महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, मराठवाडा विभाग नंदकिशोर झरीकर शशिकांत पसारकर , प्रा डॉ गणेश आडगांवकर प्रा डॉ लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर ज्योती महाजन, प्रा डॉ रुपाली कुलकर्णी श्री. गणेश वाघ, राजाराम जमजाळ, कमलाकर झोडगे अविनाश भवर दशरथ गीते, राकेश मोरे ,नवनाथ खेडकर विष्णु मिसाळ श्री. बापुराव घुले पदाधिकारी सभासद यांनी केली आहे



## अग्रलेख...

# सत्याचे नवे प्रयोग...

सत्य आणि असत्य यांमध्ये एक अत्यंत धूसर अशी अदृश्य रेषा असते आणि तशीच रेषा सत्य आणि सत्ता यांमध्येही असते. सत्याची महती सांगणारे असंख्य दाखले समाजजीवनात पिढ्यान्‌पिढ्यांपासून दिले जात असतात आणि सत्याचे महत्त्व मनामनांवर बिंबविणाऱ्या कथाही सांगितल्या जातात. पण, सत्य पचविणे सोपे नसते. कदाचित त्यामुळेच सत्याची चाड असलेल्यांनाही असत्याचा आसरा घ्यावा लागला तर त्याची टोचणी लागून राहते. असे म्हणतात की, सत्याची झळाळी सातत्यपूर्ण असते. मात्र, राजकारणात असत्यच अधिक झळकवले जाते. एखाद्या असत्यावर कितीही प्रखर प्रकाशझोत टाकला तरी त्यामुळे त्याला सत्याची झळाळी येत नाही. पण, त्यामुळे उजळलेले असत्यदेखील सत्य भासू लागते. कोणत्याही असत्याचा लोकांच्या मनावर सातत्याने मारा केला, तर असत्यदेखील सत्य वाटू लागते, असे राजकारणात मानले जाते. किंबहुना, असत्य हेच राजकारणातले सत्य असते. कदाचित त्यामुळेच राजकारणी व्यक्तीच्या सत्यवचनावरही माणसे लगेचच विश्वास ठेवत नसावीत. राजकारणी लोक असत्य का बोलतात, यावर काही बुद्धिमंतांनी खूप सखोल विचारमंथनही केले आहे. राजकीय नेते अनेकदा त्यांच्या व्यक्तिगत फायद्यासाठी किंवा अन्य काही कारणांसाठीदेखील जनतेशी खोटे बोलतात, असे सिद्धसुद्धा झालेले आहे. अर्थात, प्रतिस्पर्ध्यास गोंधळात टाकणे आणि जनतेस संभ्रमित करून त्याद्वारे राजकीय लाभ मिळविणे हाच त्यांचा उद्देश असतो. 'राजकीय नेत्यांचे खोटे बोलणे' या विषयावर जॉन मियरशेमर नावाच्या एका लेखकाने सुमारे दीड दशकांपूर्वी एक पुस्तक लिहिले. आंतरराष्ट्रीय राजकारणात खोटे बोलण्याच्या सवयींवर त्याने या पुस्तकात प्रकाशझोत टाकला आहे. त्याच्या अभ्यासानुसार, राजकीय नेते जनतेला खोटे सांगतात, खोटी माहिती देतात आणि अशी खोटी माहिती अधिकाधिक चर्चेत राहावी यासाठी ते खोट्यावर खोट्यांची मालिका रचत राहतात. सत्य आणि असत्य यांमध्ये हादेखील एक महत्त्वाचा भेद असतो. सत्यामध्ये सातत्य असते. एकदा ते सांगितले गेले की, ते शाश्वतपणे तसेच राहते. असत्यामध्ये मात्र असे सातत्य नसते. उलट एक असत्य सांगितले गेले की, तेच सत्य आहे, हे पटवून देण्यासाठी अनेक असत्य बाबींचा आश्रय घ्यावा लागतो. म्हणूनच सत्य चप्पल चढवून घराबाहेर पडेपर्यंत एखादे असत्य गावभर फिरूनदेखील आलेले असते, असे म्हणतात. चर्चेत खोटेपणाचे महत्त्व वाढविणे या नीतीला राजकारणातच मोठे महत्त्व असते. खोटे पसरविणे ही राजकीय रणनीती मानली जाते, त्यामुळे राजकारणात सत्यापेक्षा असत्याला अधिक महत्त्व आणि प्रतिष्ठा दिली जाते. एखादाच कोणीतरी आपल्या सत्याच्या प्रयोगांची निर्भीड कबुली देतो आणि सत्याचे शाश्वत महत्त्व जाणून घेण्यासाठी आयुष्यभर धडपडत राहतो. सर्वांना ते साधता येत नाहीच; उलट असत्याचा आश्रय घेतल्याने रणनीती अधिक यशस्वी ठरते, असेच राजकारणात मानले जाते. त्यामुळे 'सत्याचे प्रयोग' करणारा एखादाच कुणी महात्मा ठरतो आणि सातत्याने असत्याची रणनीती आखणारे राजकारण मात्र या माहात्म्याच्या सत्याच्या नावाने असत्याचा गवगवा करू लागते.

अलिकडे 'फॅक्ट चेक' नावाचे एक आभासी यंत्र आणि तंत्र उपलब्ध झाल्यापासून सत्य आणि असत्य यांतील भेदाचा छडा लावणे सोपे झाले असले, तरी त्यामुळे राजकारणातील असत्याचे महत्त्व अजिबात कमी झालेले नाही. उलट कोणते नेते आपल्या राजकीय कारकीर्दीत किती वेळा असत्य बोलले, याचा हिशेब ठेवणे सोपे झाले आणि त्यानुसार त्याच्या असत्यकथनाच्या राजकीय परिणामांची चर्चा होऊ लागली. 'राजकीय नेत्यांच्या असत्य बोलण्याच्या नीतीमागील सत्य' या नावाने प्रकाशित झालेल्या त्या बहुचर्चित पुस्तकात लेखक जॉन मियरशेमर यांनी तर नेत्यांच्या खोटे बोलण्याच्या नीतीचे अप्रत्यक्ष समर्थनही केले आहे. नेत्यांचे खोटे बोलणे हे अप्रत्यक्षपणे त्यांच्या राजकारणासाठी हितावेच असते, असे हा लेखक मानतो. अमेरिकेने १९४० च्या दशकात ग्रीर नावाच्या एका युद्धनौकेबाबत असा प्रकार केल्याचे आढळते. ४ सप्टेंबर १९४१ रोजी एका जर्मन पाणबुडीने ग्रीरवर गोळीबार केला आणि बचावाचा बहाणा करून अमेरिकेने युद्धात उडी घेतली. या प्रकरणात अध्यक्ष फ्रँकलिन रुझवेल्ट यांनी राष्ट्रहिताचा विचार करून खोट्याचा आश्रय घेतला, असे या लेखकास वाटते. कोणतेही खोटे बोलणे प्रभावी ठरविण्यासाठी लोकांचा विश्वास संपादन करावा लागतो आणि त्यात यश मिळाले की खोटे बोलणे सोपे होते व तेच लोकांना खरे वाटू लागते. राजकारणातील असत्याला अनेक पैलू असतात. काही असत्यांचे परिणाम नकारात्मक होऊ शकतात आणि त्यातून फसवणुकीची संस्कृती फोफावू शकते. भीती निर्माण करणारे असत्य, धोरणात्मक बाबींच्या हितासाठी वापरले जाणारे असत्य, उदारमतवादी असत्य असे राजकारणातील असत्याचे वर्गीकरण अलिकडे उघड झालेले आहे. जे नेते असत्याचा आश्रय घेतात, त्यांच्या या कृतीचे विश्लेषण फॅक्ट चेकमुळे सोपे झाले आहे. अमेरिकेचे विद्यमान अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सन २०१६ ते २०२१ या पाच वर्षांच्या काळात ३० हजार ५७३ वेळा असत्य किंवा लोकांची दिशाभूल करणारे वक्तव्य अथवा वेगवेगळे दावे केल्याचा निष्कर्ष वॉशिंग्टन पोस्ट या वृत्तपत्राने फॅक्ट चेकच्या आधारे केला होता आणि ट्रुथओमीटर नावाच्या साधनाने त्यास पुष्टी दिली होती. ट्रम्प यांनी या काळात केलेल्या वक्तव्यांपैकी सुमारे ७० टक्के वक्तव्ये अर्धसत्य, असत्य, चुकीची किंवा पूर्णतः खोटी होती, असे या पडताळणीत आढळले होते. आपल्या देशातील काही नेतेदेखील असत्य वक्तव्यनीतीचा अनेकदा वापर करत असल्याचे दिसून आले. मुंबईतील बॉम्बस्फोटांच्या भयावह काळात तेराव्या बॉम्बस्फोटाविषयी शरद पवार यांनी केलेले वक्तव्य हा याच नीतीचा प्रकार होता. काही नेत्यांच्या असत्यनीतीला एका वैशिष्ट्याचा मुलामादेखील असतो. अलिकडे तर असत्याचा प्रभावी वापर करण्याची नीती व त्यालाच सत्य म्हणून लोकांच्या माथी मारण्याची धडपड हा राजकीय स्वार्थाचा प्रकार राजकारणात लोकप्रिय होताना दिसतो. काही नेत्यांची वक्तव्ये दिशाभूल करणारी असल्याचे स्पष्ट झाले असले, तरी ती खोटी असल्याचे मात्र सिद्ध होऊ शकत नाही, हा असत्याचा राजकारणातील महिमा. महाराष्ट्रात आणि देशातही आजकाल मतदार याद्या, मतदान यंत्रे यांबाबत प्रचंड राजकीय गदारोळ सुरू आहे आणि बनावटगिरीचे दाखले देताना दररोज त्यामध्ये नवनव्या आकड्यांची भर पडत आहे. महाराष्ट्रात ९६ लाख मतदार खोटे असल्याचा आरोप खरा असल्याचे सिद्ध झाले नसले, तरी तो खोटा असल्याचा निष्कर्षही निघालेला नाही. त्यामुळे नेमके काय समजायचे, हा प्रश्नच आहे. राजकारणात सत्ता हे उद्दिष्ट असते आणि साधनही. नेते अनेकदा आपली प्रतिमा उजळ करण्यासाठी, त्यावर लोकप्रियतेचा मुलामा चढविण्यासाठी आणि आपल्या कार्याचे किंवा यशाचे अतिशयोक्त वर्णन करण्यासाठी तसेच विरोधकांना नामोहरम करण्यासाठी सत्याचा विकृत किंवा एकांगी उपयोग करतात, असे अनेक दाखले इतिहासात नोंदले गेले आहेत. लोक कोणती माहिती स्वीकारतात आणि कोणती माहिती नाकारतात, याचे नेमके विश्लेषण केल्यानंतर असत्याचा मारा किती प्रमाणात करावयाचा याचीही काही गणिते असतात. आपण जे बोलतो, ते लोकांना हवे आहे असे ठाऊक झाले की, लोकप्रिय ठरणाऱ्या असत्याचा भडीमार सुरू केला जातो. दुसरे असे की, आपल्या कृती आणि उक्तीमध्ये तफावत असल्याची जाणीव असली की अस्वस्थपणा येतो आणि असत्य कथनास योग्य व न्याय ठरविण्याचा आटापिटा सुरू केला जातो. कारण अशा प्रकरणांत सत्यापेक्षा भावनिकता अधिक महत्त्वाची मानली जात असते. निवडणुका, घोटाळे किंवा टीका यामध्ये जेव्हा त्वरित प्रतिक्रिया देण्याची गरज असते, तेव्हा आपली बाजू बळकट करणे एवढीच बाब महत्त्वाची ठरते, तेव्हा असत्याचाही ठोस आग्रही वापर केला जातो. कालांतराने ते असत्य उघडकीस आले, तरी लोकांची स्मृती अल्पकालीन असते, यावर राजकारण्यांचा विश्वास अधिक असतो. म्हणूनच सत्य आणि असत्याच्या या लपंडावात सत्य झाकण्यात यश येणाऱ्यालाच तात्कालिक विजय मिळण्याचा विश्वास असतो. सध्या तेच तर सुरू आहे!

## विशेष

# स्वदेशी अभियानातून वस्त्रोद्योगाला उभारी

**प्रा. सुखदेव बखळे**

केंद्र सरकारने देशभरात स्वदेशी मोहीम सुरू करण्याची घोषणा केली आहे. या मोहिमेचा उद्देश हातमाग, हस्तकला आणि घरगुती कापड उत्पादनांची मागणी वाढवणे हा आहे. विशेषतः शहरी तरुणांमध्ये आणि 'जनरेशन झेड' वर या अभियानाचा परिणाम झाला, तर भारतात देशांतर्गत उत्पादित कापडाची मागणी दरवर्षी ९-१० टक्क्यांनी वाढेल आणि २०३० पर्यंत ती २५० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचेल. वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या मते, २०२४ मध्ये भारताची कापड आणि वस्त्रोद्योग बाजारपेठ १७९ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचली होती. गेल्या वर्षी तिचा वार्षिक वाढीचा दर अंदाजे ७ टक्के होता. देशातील उत्पादित कापडाचा देशांतर्गत बाजारपेठेतील वाटा ५८ टक्के आहे आणि तो अंदाजे ८.१९ टक्क्यांनी वाढत आहे. परदेशातून आयात केलेल्या कपड्याचा वापर २१ टक्के असून वार्षिक ६.७९ टक्क्यांनी वाढत आहे. घरगुती कापड उत्पादनांची मागणी वाढविण्यासाठी तरुणांना आणि शहरी वर्गाला सहभागी करून घेण्याचे महत्त्व या आकडेवारीवरून स्पष्ट होते. भारतीय कापडांना तरुणांमध्ये अभिमान आणि शैलीचे प्रतीक बनवणे, हा स्वदेशी मोहिमेमागील प्राथमिक उद्देश आहे.

सरकारच्या ताज्या निवेदनानुसार स्वदेशी मोहीम उत्पादन-आधारित प्रोत्साहन योजना, 'पीएम मित्र पार्क' आणि 'एक जिल्हा एक उत्पादन उपक्रम' यासह विद्यमान कार्यक्रमांना पूरक ठरेल. ही मोहीम 'सोशल मीडिया', राज्यस्तरीय भागीदारी आणि जनजागृती कार्यक्रमांद्वारे तरुणांपर्यंत पोहोचेल. याव्यतिरिक्त जीएसटी दरांमध्ये झालेल्या बदलांमुळे देशांतर्गत आणि बिगर-देशांतर्गत वापर वाढेल. यामुळे देशात कापड आणि कपड्यांची मागणी वाढू शकते. मंत्रालयाने या मोहिमेचे केंद्रबिंदू म्हणून विशेषतः शहरी तरुणांना आणि 'जनरेशन झेड' पिढीला लक्ष्य केले आहे. भारतीय कापड परिधान करणे केवळ पारंपरिकच नाही, तर स्टायलिश आणि फॅशनेबल असू शकते हे त्यांना दाखवणे हा यामागील उद्देश आहे. स्वदेशी मोहिमेमुळे केवळ ग्राहकांना फायदा होणार नाही, तर लघु आणि मध्यम उद्योग तसेच हस्तकला उद्योगांना रोजगार आणि बाजारपेठेत प्रवेश वाढण्याची संधी मिळेल. अशा उपक्रमांमुळे केवळ कापड उद्योगाला चालना मिळणार नाही, तर स्वदेशी उत्पादनांची जागतिक मान्यता मजबूत होईल. एकंदरीत स्वदेशी मोहीम ही एक महत्त्वपूर्ण पायरी आहे, जी २०३० पर्यंत देशांतर्गत कापडाची मागणी २५० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढविण्यास मदत करेल.



भारताचा कापड उद्योग आता फक्त कपडे बनविण्यापुरता मर्यादित नाही, तर तो नवोपक्रम आणि शाश्वततेकडे एक मोठा बदल म्हणून पाहात आहे. पर्यावरणपूरक कापड, डिजिटल तंत्रज्ञान आणि पुनर्वापर वाढत आहे. त्याचा पर्यावरण रक्षणालाही फायदा होत आहे. कापड उद्योग आता नवीन तंत्रज्ञान आणि 'ग्रीन थॉट'सह भविष्याकडे वाटचाल करत आहे. नवोपक्रम उद्योगाचा चेहरामोहरा बदलत आहे. कापड उद्योग जुन्या पद्धतींपेक्षा पुढे जात आहे आणि स्मार्ट कापड आणि शाश्वत उत्पादन तंत्रांचा अवलंब करत आहे. फॅशन उद्योगावर वाढत्या पर्यावरणीय दबावामुळे, ब्रँड आता शाश्वत कापडांवर भर देत आहेत. पुनर्वापर केलेले पॉलिस्टर, सेंद्रिय कापूस आणि बांबू किंवा जूटसारखे नैसर्गिक तंतू नवीन पर्याय बनत आहेत. शिवाय, अनेक कंपन्या सर्क्युलर फॅशन मॉडेल स्वीकारत आहेत. ते जुन्या कपड्यांचे नवीन कपड्यांमध्ये पुनर्वापर करतात. केवळ पर्यावरणाचे रक्षण करत नाही, तर ग्राहकांना जबाबदार खरेदी करण्यास प्रेरित करतो.

भारत जगातील सर्वात मोठ्या कापड उत्पादकांपैकी एक असून शाश्वत कापड निर्मिती आणि व्यवहाराकडे वेगाने वळत आहे. सरकार 'मेक इन इंडिया' आणि 'टेक्सटाईल पार्क'सारख्या योजनांद्वारे हरित उत्पादनाला प्रोत्साहन देत आहे. निर्यात क्षेत्रातही शाश्वत कापडांची मागणी वाढत आहे. त्यामुळे भारताला मजबूत पाय रोवता येत आहेत. भविष्यात भारतीय कापड उद्योग आर्थिकदृष्ट्याच नव्हे, तर पर्यावरणीयदृष्ट्याही जागतिक स्तरावर आघाडीची भूमिका बजावण्यास सज्ज आहे. कापड उद्योगाचे भविष्य आता नवोपक्रम, शाश्वतता आणि तंत्रज्ञानाच्या नवीन अंतर्विरोधाशी जोडले आहे. हा बदल केवळ फॅशनची दिशा बदलत नाही, तर पृथ्वीचे भविष्यदेखील सुरक्षित करीत आहे. 'ग्रीन फॅशन'चा ट्रेंड वाढला आहे. परिणामी, निसर्गावर आधारित कपड्यांची मागणी ४३ टक्क्यांनी वाढली आहे. भारतासह पाच देशांनी नैसर्गिक साहित्यापासून बनवलेले कपडे वेगाने स्वीकारले आहेत. आंतरराष्ट्रीय अहवाल आणि अभ्यासातून दिसून आले आहे की, लोक आता 'ब्रँडेड ग्लिट्झ'पासून दूर जात असून सभोवतालच्या साहित्यांसह फॅशनची व्याख्या नव्याने लिहीत आहेत. जुने कपडे, ज्यूट, बांबू, पाने, पुनर्वापर केलेले कापड आणि नैसर्गिक रंगाच्या वापरावर भर दिला जात आहे. हा ट्रेंड केवळ पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने एक ठोस पाऊल नाही, तर रासायनिक कापड आणि मायक्रोप्लॅस्टिकने भरलेल्या कपड्यांना जागतिक प्रतिसाद बनत आहे.

संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम (यूएनईपी) आणि 'ग्लोबल फॅशन अजेंडा' यांच्या 'द स्टेट ऑफ सर्क्युलर फॅशन' या संयुक्त अहवालानुसार स्वीडन, फ्रान्स, जपान, कॅनडा आणि भारत हे सर्वात वेगाने शाश्वत किंवा निसर्गानुकूल फॅशन स्वीकारणारे आघाडीचे पाच देश आहेत. 'फॅशन थिअरी: द जर्नल ऑफ ड्रेस, बॉडी अँड कल्चर'मध्ये प्रकाशित अहवालात म्हटले आहे, की, २०१४ ते २०२४ या कालावधीत या देशांमध्ये निसर्गावर आधारित कापडांची (हिरवे कपडे) मागणी सरासरी ४३ टक्क्यांनी वाढली आहे. सर्वात लक्षणीय बदल स्वीडनमध्ये दिसून आला. तेथील 'एलेन मॅकआर्थर फाऊंडेशन'च्या आकडेवारीनुसार, २०१५ ते २०२४ दरम्यान पुनर्नवीनीकरण केलेल्या किंवा सेंद्रिय कपड्यांच्या विक्रीत ६१ टक्के वाढ झाली. 'इंटरनॅशनल जर्नल ऑफ सस्टेनेबल फॅशन अँड टेक्सटाईल्स'मध्ये प्रकाशित झालेल्या दुसऱ्या अहवालानुसार, नैसर्गिक संसाधनांचे पुनर्नवीनीकरण आणि कापडांचा पुनर्वापर यावर आधारित 'रिजनरेटिव्ह फॅशन' या मॉडेलने गेल्या पाच वर्षांमध्ये जागतिक शहरी फॅशन बाजारपेठेत लक्षणीय स्थान मिळविले आहे. स्टॉकहोम, पॅरिस, टोकियो, न्यूयॉर्क, सेऊल, मुंबई, सिडनी, बर्लिन, ॲमस्टरडॅम, टोरंटो, सिंगापूर आणि मेलबर्न या १२ प्रमुख शहरांमध्ये केलेल्या सर्वेक्षणात आढळून आले की, अंदाजे ३८ टक्के ग्राहक आता फक्त पुनर्नवीनीकरण केलेले किंवा नैसर्गिक स्रोतांपासून बनवलेले कपडे खरेदी करण्यास प्राधान्य देतात. जुन्या वस्तूंचा पुनर्वापर करणे हा एक फॅशन ट्रेंड बनला आहे. अहवालानुसार अलिकडच्या काळात 'अपसायकलिंग', जुन्या किंवा टाकून दिलेल्या वस्तूंचे पुनर्वापर करणे हा एक फॅशन ट्रेंड बनला आहे. पॅरिस, मिलान आणि टोकियो येथील फॅशन शोमध्ये, डिझायनर्स आता जुन्या जीन्स, उरलेल्या धाग्यापासून आणि कापडाच्या तुकड्यांपासून नवीन कपडे तयार करत आहेत. भारतात दिल्ली, जयपूर आणि मुंबईमधील तरुण डिझायनर्स नैसर्गिक रंग, खादी, हातमाग यांच्या माध्यमातून जुने कापड वापरून नवे कपडे तयार करत आहेत. या सर्वांचा परिणाम प्रतिकूल परिस्थितीतही भारतीय वस्त्रोद्योगाला सावरण्यास मदतकारक होत आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**गिरीश शेरेकर**

# जन्म-मृत्यू दाखल्यांच्या गोरखधंद्याला वेसण

बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय प्रमाणपत्र व दाखले मिळविल्याची प्रकरणे नवीन नाहीत. पण, जन्म व मृत्यू दाखले मिळविण्यासाठी बनावट कागदपत्रे दिली जातील, याची कल्पनाही कोणी केली नव्हती. ज्या व्यक्तीची नोंदच कुठे सापडत नाही आहे, अशा व्यक्तीला जन्माचा दाखला पाहिजे असेल तर आवश्यक कागदपत्रांसह जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करावा लागत होता. संपूर्ण शहानिशा करून प्रक्रियेनंतर दाखला दिला जात होता. पूर्वीच्या प्रचलित नियमामध्ये शासनाने २०२३ मध्ये बदल केला. त्यानुसार तहसीलदारांकडे अर्ज करण्याची मुभा देण्यात आली. पुढे तहसीलदारांनी हे काम नायब तहसीलदारांकडे सोपविले. या सुधारणेचा फायदा घेऊन काही महाभागांनी २०२३ ते जानेवारी २०२५ या काळात मोठ्या प्रमाणात तहसील कार्यालयांमध्ये अर्ज करून दाखले मिळवून घेतले. यातील काही दाखले बनावट असल्याचे सर्वप्रथम मालेगाव, अमरावतीत लक्षात आले. शासनाला त्याची माहिती मिळाली. भाजपाचे नेते व माजी खासदार किरीट सोमय्या यांनी या प्रकरणात काळजीपूर्वक लक्ष घातले. विदर्भातल्या अमरावती, यवतमाळ, अकोला या जिल्हास्थानांसह अचलपूर, अंजनगाव सुर्जी, दारव्हा, अकोट या तालुकास्थानांवर त्यांनी दौरे केले. संबंधित अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन त्यांना जाब विचारण्याचे काम त्यांनी केले. राज्यातल्या अन्य भागात त्यांचे दौरे झाले, काही ठिकाणी सुरू आहेत. त्यांचे परिणाम आता समोर येत आहे.

घोळ लक्षात आल्यावर २५ जानेवारी २०२५ रोजी शासनाने 'जीआर' काढून २०२३ ते २०२५ या काळात देण्यात आलेले सर्व जन्म-मृत्यू प्रमाणपत्र रद्द केले. त्याचाच आधार घेऊन किरीट सोमय्या दर महिन्यात अमरावतीत आले. अन्य ठिकाणीही गेले. प्रत्येक ठिकाणी ते पुरावे दाखवून अधिकाऱ्यांशी बोलतात. झालेल्या चर्चेची माहिती माध्यमांना देतात. त्यांचा दबावच इतका वाढला होता की, अधिकाऱ्यांकडे चौकशी करून कारवाई करण्यापलीकडे पर्यायच उरला नव्हता. किरीट सोमय्या हा माणूस मुळातच अभ्यासू आहे. जे काम आपल्याला वरिष्ठांनी दिले आहे, ते यशस्वी कसे करायचे, याचे उत्तम उदाहरण ते आहेत. जन्म व मृत्यू प्रमाणपत्र प्रकरणात त्यांनी डोळ्यात तेल घालून काम केले. २०२३ ते जानेवारी २०२५ या काळात अमरावती तहसीलमधून जन्म-मृत्यू प्रमाणपत्राचे २ हजार ८९६ अर्ज मंजूर झाले होते. त्यापैकी सुमारे १८०० दाखले हे मनपाच्या हद्दीत देण्यात आले होते. ते रद्द करण्यात आल्यावर संबंधित यंत्रणेकडे प्रमाणपत्र परत करण्याचे आदेशसुद्धा देण्यात आले होते. मनपा हद्दीत या आदेशाचे पालन करून सुमारे ११०० जणांनी प्रमाणपत्रे परत केली. उर्वरित ७०० जणांनी अजूनही दाखले मनपाकडे परत केले नाही. त्यांचा शोध मनपाच्या पथकाने घेतला. त्यात १५५ जण दिलेल्या पत्त्यांवर मिळाले नाही तर ३४९ जणांचे पत्तेच बरोबर नाहीत. त्यामुळे मनपाने अशा ५०४ जणांविरुद्ध तक्रार दिली. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. यापूर्वी अंजनगाव सुर्जी, अमरावतीच्या गाडगेनगर पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल झाले आहे. दारव्हा नगरपालिकेने ५७२ प्रमाणपत्रे रद्द केली आहेत. मालेगावातील ९४६ प्रमाणपत्रे रद्द करण्याची मागणी जोरात होत आहे.

छत्रपती संभाजी नगर, मुंबईतल्या गोवंडी भागासह अन्य ठिकाणी तातडीने बैठका घेऊन चौकशी सुरू झाली आहे. उपरोक्त पद्धतीनेच या ठिकाणी कारवाई होऊन बनावट प्रमाणपत्रे रद्द होण्याची शक्यता वाढली आहे. राज्यात जी बनावट प्रमाणपत्रे तयार झाली, त्यात बांगलादेशी व रोहिंग्यांची संख्या जास्त असण्याचा अंदाज आहे. सोमय्या यांचेही ते म्हणणे आहे. आता गुन्हे दाखल होत असल्याने तपासात सर्व काही समोर येणार आहे. फडणवीस सरकारला हा गोरखधंदा वेळीच लक्षात आल्यामुळे आदेश काढून वेसण घालण्यात आली आणि कारवाईदेखील सुरू आहे. भविष्यात असे प्रकार घडणार नाही, याची काळजी सरकारला घ्यावी लागणार आहे. बनावट कागदपत्रे तयार करून प्रमाणपत्रे मिळवून देणारी एखादी टोळी राज्यात सक्रिय असण्याचा संशय अनेकांना आहे. पोलिसांनी त्या दिशेने तपास करायला हवा. राज्याच्या व देशाच्या सुरक्षेसाठी ते अत्यंत आवश्यक आहे.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# श्रीगीता - दैवासुरसंपद्विभागयोग

**प्रा. दिलीप जोशी**

श्रीमद्भगवद्गीतेचा १६ वा अध्याय 'दैवासुरसंपद्विभागयोग' म्हणून परिचित आहे. या अध्यायात भगवंतांनी दैवी गुण आणि आसुरी गुण यांचा विचार केला असावा. विशेष म्हणजे या दोन्ही गुणांना संपत्ती म्हणून संबोधित केले आहे. दैवी संपत्ती आणि आसुरी संपत्ती यावर विचार मांडला आहे. या अध्यायाय भगवंतांनी दैवी गुणांची आणि आसुरी गुणांची यादीच केली आहे. ती यादी वाचली की आपण कुठल्या श्रेणीत आहोत दैवी की आसुरी? हे आपले आपल्यालाच लक्षात येईल. त्यानुसार आपल्याला सुधारणा करता येईल.

'अचूक प्रयत्न तो देवो, चुकणे दैत्य मानिजे-' अचूक प्रयत्नांना दैवी गुण आणि चुकण्याला दैत्य म्हटले आहे. म्हणजे दैवी गुणांचे प्राबल्य ठेवणे आणि आसुरी गुणांचे दौर्बल्य आपल्याला प्रयत्नपूर्वक करणे शक्य आहे. ते आपण केले पाहिजे. त्यासाठी दैवी गुण कोणते आणि आसुरी गुण कोणते? हे माहीत असणे जरूरी आहे. म्हणून भगवंतांनी सुरुवातीलाच दैवी गुणांची यादीच आपल्याला दिली.

श्रीभगवानुवाच- 'अभयं सत्त्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः ।
दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् ॥'

निर्भयता, शुद्ध अंतःकरण, ज्ञानी, योगी, दानी, इंद्रियदमन करू शकणारा, यज्ञानुष्ठानी, वेद अध्ययन करणारा, तपस्वी, सरळ स्वभावाचा म्हणजे दैवी संपत्ती असणारा मनुष्य होय.

'अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शान्तिरपैशुनम् ।
दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं ह्रीरचापलम् ॥'

अहिंसक, सत्यवादी, क्रोधावर नियंत्रण असणारा, त्यागी, कर्म संन्यस्त, शांत, कोणाचीही निंदा न करणारा, जीवदया करणारा, मार्दव असलेला, कोणाच्याही व्यर्थ उखाळ्यापाखाळ्या न करणारा म्हणजे दैवी गुणी मनुष्य होय.

'तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहोनातिमानिता ।
भवन्ति सम्पदं दैवीमभिजातस्य भारत ॥'

तेजस्वी, क्षमाशील, धैर्यशील, अंतर्बाह्य शुचिर्भूत, शत्रुभाव नसणारा ही सर्व लक्षणे दैवी पुरुषाची आहेत. जवळ जवळ २६ लक्षणांची यादी भगवंताने पहिल्या तीन श्लोकात सांगितली आहे. आता आपण कसे वागू नये यासाठी आपल्याला आसुरी लक्षणांची यादीही भगवंत देतात.

'दम्भो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च ।
अज्ञानं चाभिजातस्य पार्थ सम्पदमासुरीम् ॥'

भगवंत सांगतात आसुरी गुण असलेल्या माणसात दंभ, दर्प, अभिमान, क्रोध, कठोर वचनी आणि अज्ञान ठासून भरलेले असते.

'प्रवृत्तिं च निवृत्तिं च जना न विदुरासुराः ।
न शौचं नापि चाचारो न सत्यं तेषु विद्यते ॥'

असुरी स्वभावाचे लोक प्रवृत्ती, निवृत्ती जाणत नाहीत. शुचिर्भूतता, आचार-विचार त्यांच्या जवळ नसतो. ते सदैव असत्य भाषण करतात.

'असत्यमप्रतिष्ठं ते जगदाहुरनीश्वरम् ।
अपरस्परसम्भूतं किमन्यत्कामहैतुकम् ॥'

आसुरी संपत्ती धारक लोक अधिष्ठानरहित असतात. त्यांचा ईश्वरावर विश्वास नसतो. आपला जन्म स्त्री-पुरुष संयोगातून झाला हे त्यांच्या मनात सदैव असल्यामुळे कामवासना प्रबळ असते.

'एतां दृष्टिमवष्टभ्य नष्टात्मानोऽल्पबुद्धयः ।
प्रभवन्त्युग्रकर्माणः क्षयाय जगतोऽहिताः ॥'

आसुरी वृत्तीचे लोक बुद्धिभ्रष्ट, अत्यल्प बुद्धी, क्रूरकर्मे, सर्वांचे अहित करणारे, इतरांच्या दुःखात आनंदी होणारे, विनाशकारी असतात. दंभ, मद आणि अहंकाराने युक्त असतात. अविवेकी आणि सदैव पापाचरण करणारे असतात. आसुरी वृत्तीचे लोक कायम चिंताग्रस्त आणि सदैव विषयात रममान असतात.

'आशापाशशतैर्बद्धाः कामक्रोधपरायणाः ।
ईहन्ते कामभोगार्थमन्यायेनार्थसञ्चयान् ॥'

अनेक आशा पाश बनून बांधून ठेवतात. विषयभोगपूर्तीसाठी ते वाममार्गाने अर्थ कमावतात. मीच बलवान, मीच कर्ता, मीच भोगणारा आणि कर्ता-करविताही मीच त्यामुळे मीच फक्त सुखी अशी दृढधारणा त्याची असते. याच अज्ञानात तो पूर्ण लिप्त असतो. त्यामुळे त्याच्यात आसुरी गुणांचे प्राबल्य असते. भगवंत पुढे आसुरी वृत्तीच्या लोकांचे वर्णन करताना सांगतात की, ही माणसे मी आज हे कमावले, उद्या ते कमावणार, आज इतके धन कमावले, उद्या अजून कमावणार. आज याला मारले, उद्या त्याला मारणार हा भाव सतत ठेवतात.

'अहङ्कारं बलं दर्पं कामं क्रोधं च संश्रिताः ।
मामात्मपरदेहेषु प्रद्विषन्तोऽभ्यसूयकाः ॥'

अहंकार, बल, दर्प आणि क्रोधाच्या अधीन होतात आणि माझ्यासारखे कोणीच नाही. या घमेंडीत उन्मत्त होऊन शास्त्रविरोधी वर्तन करतात. भगवंत म्हणतात की, हे लोक माझा म्हणजे परमेश्वराचा विरोध करतात.

'आसुरीं योनिमापन्ना मूढा जन्मनि जन्मनि ।
मामप्राप्यैव कौन्तेय ततो यान्त्यधमां गतिम् ॥'

त्यामुळे अर्जुना, अशा नराधमांना पुन्हा पुन्हा नरकप्राप्ती व्हावी म्हणून त्यांना मी पुन्हा पुन्हा आसुरी योनीत टाकतो.

'त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ।
कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ॥'

म्हणून मानवाने काम, क्रोध आणि लोभ ही नरकाची द्वारे आहेत, हे लक्षात घेऊन या तिन्हीचा त्याग केला पाहिजे. या तिन्हीचा त्याग म्हणजे आत्मकल्याण होय. याउलट जो या विषयात कामनेने प्रेरित होतो त्याला मोक्षप्राप्ती केवळ अशक्य आहे.

'तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ।
ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि ॥'

अर्जुना! हे शास्त्र प्रमाण मानून शास्त्रविहित कर्म तू कर! हा भगवंताचा आदेश आहे. मला तर श्रीमद्भगवद्गीतेच्या सर्व अध्यायात १६ वा अध्याय मनुष्यनिर्माणाची गुरुकिल्ली वाटते. पुरुषोत्तम व्हायचे तर भगवंतांनी या अध्यायात सांगितलेली दैवी गुणांची यादी पाहावी. त्यातील कोणते गुण सहज अंगीकारू शकतो ते पाहून प्राधान्यक्रम ठरवावा. एकेक दैवी गुण अंगीकारत जावा.

भगवंतांनी आसुरी गुणांची यादीही दिली. त्या अवगुणांचा त्याग आपल्याला करायचा आहे. जे ताबडतोब त्यागता येतात ते प्रथम त्यागावे. अवगुणांचा त्याग करण्याचा प्राधान्यक्रम ठरवावा लागेल. हळूहळू सर्व अवगुणांचा त्याग करण्याचा अचूक प्रयत्न करावा. 'आपुली आपण करा सोडवणूक' हा मार्ग म्हणजे स्वयंअध्ययन आणि स्वयंमूल्यमापन होय. आपल्याला आपल्यातील गुणात्मक बदल समजतोच; पण माणूस म्हणून तुमच्यात झालेले बदल इतरांनाही उमगू लागतात. दैवी शक्तीची वाढ आणि आसुरी शक्ती खुंटविण्यासाठी भगवंताने या दोन संपत्ती अत्यंत साध्या आणि सोप्या भाषेत सांगितल्या आहेत. 'नर करणी करे तो नर का नारायण होये' यातील 'करणी' म्हणजे दैवीसंपत्तीचा अंगीकार आणि आसुरी संपत्तीचा त्याग होय. या अध्यायाचे सार हेच आहे. म्हणून हा दैवासुरसंपाद्विभाग योग म्हणून ओळखला जातो.

९८२२२६२७३५

## आजचे संघगीत-३३

बुधवार, ५ नोव्हेंबर २०२५

### दिसू लागला जवळी मंगल देशाचा वैभवकाल

दिसू लागला जवळी मंगल देशाचा वैभवकाल ।
उत्साहाने एकत्वाच्या मार्गावर करिता चाल ॥धृ.॥

व्यक्तित्वाच्या उल्लंघुनिया साऱ्या आकुंचित सीमा
विशाल हृदयी स्थापन केली समाजपुरुषाची प्रतिमा
कर्तृत्वाचे चंदन झिजवुनि उटी चर्चिली प्रेमाने
फुले सुगंधित सद्भावांची वाहियली पदि नियमाने
भक्तीचा लाविला दीप हा हृदयमंदिरी तेजाळ ॥१॥

वैर न कोणाशीही धरिता वागु सदा अभिमानाने
कधी न वाकू शक्तीपुढती सौख्याने फुलवू सदने
जगू जगाला देउनि जगवू चिरवांछित ही माणुसकी
जिच्यापुढे नतमस्तक होतिल साम्राज्ये अवघी परकी
आकांक्षा ही स्फुरण देतसे तशीच देइल चिरकाल ॥२॥

कंटकमय जरि मार्ग असे हा अचूक जवळचा ऐक्याचा
असामान्य नेतृत्व लाभले ये संतत प्रत्यय याचा
दैन्य विघटना दिसे सभोती मनात सलते हे शल्य
ते काढाया यत्न करावे यातच जीवनसाफल्य
या निठेने पडता पाउल घालील विजयश्री माळ ॥३॥

### चटका लावणारी एक्झिट

अभिनयाच्या विविध कंगोऱ्यातून अंगीकारलेल्या भूमिकेला रसिक प्रेक्षकांच्या केवळ पसंतीसच नव्हे तर लक्षवेधी अशा भूमिका साकारून नाट्य, चित्रपटसृष्टी आणि मालिका यातून आनंद देणाऱ्या अभिनेत्री दयाताई डोंगरे यांचे अकस्मात जाणं मनाला चटका लावून गेलं. जीव ओतून काम करण्याची हातोटी, दमदार आवाजातील वैशिष्ट्यपूर्ण स्वच्छ, सुस्पष्ट, संवादफेक, सहज, सुंदर, नैसर्गिक मुद्राभिनय ही त्यांची खास आयुधे होती. त्यातूनच त्या आपल्या वैशिष्ट्यपूर्ण अभिनयाची छाप उमटवीत. करारी बाणा, खाष्ट सासू अशा विविधांगी भूमिकांसाठी त्या सुपरिचित होत्या. हिंदीतही आपल्या अभिनयाची छाप तेवढ्यात ताकतीने त्यांनी उमटवली. अनेक मालिका, नाटके, चित्रपटांमधून महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखा साकारत त्यांनी आपल्या अभिनयाचे विविधांगी कंगोरे पेश करून जो आनंद दिला तो कायम रसिक मनावर राहणार आहे. अनोखी अभिनय शैली आणि संवादफेकीच्या कौशल्यावर कलाक्षेत्रात वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या दयाताई डोंगरे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**विश्वनाथ पंडित**/९५८८४५०४४२

## वाचक पत्रे

### एनएसईवरील सायबर हल्ले चिंताजनक

देशातील नॅशनल स्टॉक एक्सचेंज म्हणजे एनएसई हा सर्वांत मोठा शेअर बाजार आहे. परंतु, एनएसईवर दररोज अंदाजे सतरा कोटी सायबर हल्ले होतात. या सततच्या डिजिटल धोक्यांपासून बाजाराचे संरक्षण करण्यासाठी, एनएसईकडे सायबर योद्ध्यांची एक टीम आहे. अलिकडेच झालेल्या ऑपरेशन सिंदूर या डीडीओएस सिम्युलेशन चाचणीत एएनएसईवर एका दिवसात जवळपास चाळीस कोटी सायबर हल्ले झालेत. मात्र प्रगत तंत्रज्ञान, सुरक्षा प्रणाली आणि दक्ष कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांमुळे सायबर हल्लेखोरांना कोणतेही नुकसान करता आले नाही. एनएसईला दररोज असंख्य सायबर हल्ल्यांचा सामना करावा लागतो. एनएसईच्या सायबर सुरक्षा टीमकडे अत्याधुनिक सॉफ्टवेअर, सतत मॉनिटरिंग सिस्टिम आणि दोन प्रमुख सुरक्षा केंद्राद्वारे सतत निरीक्षणाची व्यवस्था आहे. या केंद्रामधील तांत्रिक पथके वित्तीय बाजाराच्या पायाभूत सुविधांवर होणाऱ्या मोठ्या प्रमाणातील हल्ल्यांना तोंड देण्यासाठी सतत सक्रिय असतात. त्यासाठी पेनिट्रेशन टेस्टिंग अनिवार्य केले आहे. तसेच सर्व ट्रेडिंग सदस्यांना नियमित सायबर सुरक्षा ऑडिट सादर करणे बंधनकारक असते. एनएसईने ई-मेल, बाह्य डेटा ट्रान्सफर, पेन ड्राईव्ह आणि डीडीओएस हल्ल्यांपासून संरक्षणासाठी विशेष प्रोटोकॉल लागू केले आहेत. कोणतीही संशयास्पद हालचाल दिसताच त्वरित अलर्ट आणि पॉप -अप नोटिफिकेशन जारी केले जातात. डीडीओएस हल्ल्यांमुळे सर्व्हरवर एकाचवेळी अनेक स्रोतांकडून ट्रॅफिक वाढवला जातो. ज्यामुळे प्रणाली कोसळू शकते आणि कायदेशीर वापरकर्त्यांना सेवा मिळत नाही. अशा परिस्थितीमुळे शेअर बाजाराच्या अखंड कार्यक्षमतेला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. सुरक्षा वाढवण्यासाठी एनएसईकडे चेन्नई येथे पूर्णपणे स्वयंचलित बॅकअप सिस्टिम आहे, जी मुख्य प्रणालीत बिघाड झाल्यास त्वरित सक्रिय केली जाऊ शकते. ही प्रणाली अत्यल्प मानवी हस्तक्षेपाने त्रुटी दुरुस्त करण्यास सक्षम आहे. वाढत्या जागतिक परस्परसंबंधामुळे सायबर हल्ल्यांचा धोका अधिक गंभीर ठरू शकतो. तरीही एनएसईची सक्षम सायबर टीम भारतीय वित्तीय बाजाराचे डिजिटल शिल्ड म्हणून सज्ज आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या दक्षता जनजागृती सप्ताहास प्रारंभ

**परभणी,/प्रतिनिधी :** दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी लाच लुचपत प्रतिबंधक विभागातर्फे २७ ऑक्टोंबर ते २ नोव्हेंबर या दरम्यान दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात येणार असून दक्षता आपली सामुदायिक जबाबदारी या संकल्पनेतून या सप्ताहात या खात्याद्वारे उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

सोमवार २७ ऑक्टोंबर रोजी या सप्ताहास प्रारंभ करण्यात आला. सर्व सरकारी, निमसरकारी कार्यालयात भ्रष्टाचार निर्मूलनाबाबत शपथ घेवून मुख्यमंत्री यांचा संदेश वाचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. तसेच गर्दीच्या ठिकाणी, पोस्टर्स, बॅनर्सद्वारे जनजागृती सुरु करण्यात आली. बुधवारी संपूर्ण जिल्ह्यात ग्रामीण रुग्णालय, भूमिअभिलेख कार्यालय, पंचायत समिती, पोलिस ठाणे, न्यायालय, बांधकाम विभागाचे कार्यालय, वीज वितरण कंपनी कार्यालय यासह बाजार, बसस्थानक आदी सार्वजनिक ठिकाणी भ्रष्टाचार निर्मूलना संदर्भात पोस्टर्स व बॅनर लावण्यात आले. त्याद्वारे लाच देणे अथवा लाच देणे हा गुन्हा आहे, या आशयाचे फलक नागरीकांचे लक्ष वेधून घेत होते.

दरम्यान, लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक, टोल फ्री क्रमांक, ई-मेल आयडी वगैरे गोष्टींचीही जनजागृती या निमित्ताने केली जाणार आहे. लाच मागणाऱ्या लोकसेवकाविरुध्द तक्रार असल्यास नागरीकांनी तात्काळ लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे संपर्क करावा, असे आवाहन पोलिस उपअधिक्षक महेश पाटणकर यांनी केले आहे.

या स्नेहमिलन सोहळ्यास महेश कुलकर्णी, सतीश ईप्पर, नागेश जोशी, शिरीष चक्कवार, अश्विन कारंजकर, राजेश वटाणे, प्रदीप राठोड, सय्यद जुनेद, विकास वाव्हळ, गणेश महाजन, गणेश कदम, कृष्णा लोखंडे, मन्मथ टाले, निजाम काझी, विवेक मुक्कावार, श्रीरंग खांडेकर, जगदीश लाहोरे, गजानन आकोशे, रवी राऊत, श्रीकांत चव्हाण, संतोष हळदे, गणेश पोटेकर, सचिन गायकवाड आदी माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिंतूर व बाहेरगावावरून दिवाळीनिमित्त आलेल्या सर्व मित्रांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. वीस वर्षांनंतर झालेली ही भेट सर्वांच्या मनात कायमस्वरूपी आठवण बनून राहिली.

### रन फॉर युनिटी कार्यक्रमात तालुक्यातील जनतेने सहभागी व्हा -पो.नि. खटाने

**पालम,/प्रतिनिधी :** सरदार वल्लभाई पटेल यांची १५० व्या जयंती निमित्त हा कार्यक्रम शुक्रवारी दि. ३१ आक्टोबर रोजी पालम पोलीस स्टेशनने आयोजित केला आहे.या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट राष्ट्रीय एकता आणि एकतेची भावना वाढवणे हा आहे.सदरील कार्यक्रमासाठी पालम तालुक्यातील सर्व जनतेने शुक्रवारी सकाळी ६ वाजता पालम पोलीस स्टेशन येथे हजर राहून रन फॉर युनिटीमधे सहभागी होत एकता आणि एकतेची भावना साजरी करण्याचे आवाहन पोलिस निरीक्षक शेषराव खटाणे यांनी केले आहे.

### पूर्णेत आज मतदार यादी प्रसिध्द होणार- मुख्याधिकारी डॉ.उत्कर्ष गुट्टे यांची माहिती

**पूर्णा,/प्रतिनिधी :** नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या प्रारब्ध मतदार यादीवर आलेल्या सर्व आक्षेप अर्जाची पूर्णा तहसील कार्यालयात दोन दिवस सुनावणी घेण्यात आली असून याचा संपूर्ण अहवाल उपविभागीय अधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आला आहे ३१ ऑक्टोबर रोजी मतदार यादी प्रसिद्ध होणार असल्याची माहिती पूर्णा नगर परिषद मुख्याधिकारी डॉ. उत्कर्ष गुट्टे यांनी सांगितले.

पूर्णा नगर परिषदेच्या सार्वजनिक निवडणुकीसाठी नगरपालिका प्रशासनाने नगरपालिका हद्दीतील मतदारांची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली होती त्यानंतर गावातील विविध नागरिकांनी या मतदार यादीवर आक्षेप अर्ज दाखल केले होते यामध्ये एकूण १८९२ नागरिकांनी आक्षेप दाखल झाले होते यामध्ये सर्वात जास्त आक्षेप प्रभाग ९ मध्ये दाखल झाले होते या सर्व आक्षेपासाठी ची सुनवणी पूर्णा तहसील कार्यालयामध्ये २६ व २८ ऑक्टोबर रोजी घेण्यात आली असून यानंतर त्याचा संपूर्ण अहवाल उपविभागीय अधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आला असून ३१ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार असल्याची माहिती मुख्याधिकारी यांनी सांगितली.

### श्री सहस्त्रार्जुन महाराज जयंती निमित्त देवी मंदिर जीर्णोद्धार व भव्य सभागृह भूमिपूजन



**मानवत,/प्रतिनिधी-** श्री सो स क्षत्रिय समाज दक्षिण मुखी हनुमान मंदिर पंच मंडळ, मानवत येथे श्री. सहस्त्रार्जुन महाराज जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त मानवत नगरीचे विकास पुरुष डॉ. अंकुश लाड यांच्या पुढाकाराने रंगर गल्ली येथील देवी मंदिर जीर्णोद्धार आणि भव्य सभागृह बांधकामासाठी एक कोटी रुपयाचा आमदार राजेश दादा विटेकर यांच्यामार्फत निधी मंजूर करून घेतला असून माननीय आमदार राजेश दादा विटेकर यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. तत्पूर्वी मान्यवरांचे औक्षण करण्यात आले आणि समाजाच्या वतीने मान्यवरांचा भव्य सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना डॉक्टर श्री अंकुश भाऊ लाड यांनी एक वर्षाचे आत सभागृहाचे बांधकाम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. यानंतर प्रमुख पाहुणे मा. आमदार श्री. राजेशदादा विटेकर यांनी मानवतमध्ये विविध विकासात्मक योजना आणणार असून मानवत मध्ये भव्य असे क्रीडा संकुल उभारण्यात येणार असल्याचे जाहीर केले. तसेच उभा महादेव मंदिर विकासासाठी देखील योजना प्रस्तावित असल्याचे सांगितले.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

**तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.**

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

**०४. पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# भितीपोटीच जिल्हा परिषदेऐवजी पालिका निवडणूका : माजी आमदार दुर्राणी

**मोहन धारासूरकर**
**परभणी/प्रतिनिधी-** जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूकीत ग्रामीण भागातील सर्वसामान्य शेतकऱ्यांचा तीव्र रोष मतपेटीद्वारे व्यक्त होईल या भितीपोटीच सत्तारुढ महायुती सरकारने जिल्हा परिषद, पंचायत समिती ऐवजी पालिका निवडणूकीचा कार्यक्रम पहिल्या टप्प्यातून जाहीर केला आहे, अशी टीका जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा माजी आमदार बाबाजानी दुर्राणी यांनी दैनिक तरुण भारतशी बोलतांना केली.



जिल्ह्यासह राज्यातील नगरपालिकांच्या निवडणूकीचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने जाहीर केल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाध्यक्ष दुर्राणी यांनी दै.तरुण भारतशी बोलतांना प्रतिक्रिया व्यक्त करतेवेळी जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणूका जाहीर होतील, हे आपणास अपेक्षित होते. परंतु, या ऐवजी नगरपालिकांच्या निवडणूकीचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने जाहीर करीत विरोधी पक्षांना निश्चितच आश्चर्याचा धक्का दिला आहे, असे नमूद केले.

जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूकीत संपूर्ण राज्यातील ग्रामीण भागातील सर्वसामान्य शेतकरी, शेतमजूराचा सरकार विरोधातील तीव्र रोष व्यक्त होईल, या भितीपोटीच पहिल्या टप्प्यात नगरपालिकांच्या निवडणूकांचा कार्यक्रम जाहीर झाला आहे, असे ते म्हणाले. नगरपालिका निवडणूका लढविण्यास महाविकास आघाडी सज्ज आहे. काही ठिकाणी समविचारी पक्षाबरोबर तर काही ठिकाणी स्वबळावर निवडणूका लढवू, असे ते म्हणाले. शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, वंचित बहुजन आघाडी तसेच राष्ट्रीय समाज पक्षाबरोबरसुध्दा निवडणूका लढविण्यासंदर्भात विचार विनिमय सुरु आहे, असे ते म्हणाले.



### पालकमंत्री साकोरे बोर्डीकर यांच्या शिफारशीवरून चौधरी यांची निराधार समितीवर नियुक्ती

**जिंतूर,/प्रतिनिधी-** महाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्री तथा परभणीच्या पालकमंत्री सौ. मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांच्या शिफारशीवरून बोरीचे रहिवाशी श्री. गजानन चौधरी यांची जिंतूर तालुका संजय गांधी निराधार योजनेच्या समितीवर नियुक्ती झाली आहे.

पालकमंत्री सौ मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांनी श्री गजानन चौधरी यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन ही नियुक्ती केल्याची समजते. गेल्या अनेक वर्षापासून विविध प्रकारच्या सामाजिक कार्यात श्री चौधरी यांचे योगदान आहे. बोरीच्या ग्रामीण रुग्णालयात त्यांनी कोरोना काळात कोरोना पॉझिटिव्ह नागरिकांचा नियमित योग वर्ग घेतला होता. तसेच इतर उल्लेखनीय कार्य केले होते. अशा कार्यांमुळेच श्री. चौधरी यांचे समाजातील गरजू व सर्वसाधारण नागरिकांशी एक भावनिक नाते निर्माण झाले आहे. त्यांच्या या कार्याची मंत्रि महोदयांनी दखल घेतल्याने या निर्णयाचे सर्वत्र स्वागत होताना दिसत आहे.

**भाजपाचे लोकसभा निवडणूक प्रमुख आदरणीय मा.आ. रामप्रसादजी बोर्डीकर, राज्यमंत्री तथा पालकमंत्री नामदार सौ. मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांनी दाखवलेला विश्वास समाधानकारक कार्य करून पूर्ण करणार तसेच डॉ. पंडितराव दराडे व गोविंदराव थिटे यांच्या नेतृत्वाखाली गरजू नागरिकांना योजनेचा पूर्णपणे लाभ मिळवून देण्याचा प्रमाणिक प्रयत्न करणार असल्याचे श्री गजानन चौधरी यांनी सांगितले.**

### राज्यमंत्री साकोरे यांच्या शिफारशीवरून डॉ.पंडितराव दराडे यांची संजय गांधी निराधार शासकीय समिती अध्यक्ष पदी निवड




**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर तालुक्यातील लिंबाळा गावची सुपुत्र डॉक्टर पंडितराव दराडे यांची जिंतूर संजय गांधी निराधार शासकीय समितीवर अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे त्यांच्या नियुक्तीचे आदेश परभणी जिल्हा अधिकारी यांनी त्यांना देण्यात आले. राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांचे अत्यंत विश्वासू असलेले डॉक्टर पंडितराव दराडे यांची संजय गांधी निराधार समितीवर निवड करण्यात आली आहे. डॉक्टर पंडित तरडे हे मागील वीस ते पंचवीस वर्षापासून रामप्रसाद बोर्डीकर यांच्या सोबत असून काम केले तसेच नगरपरिषद जिंतूर चे ते नगराध्यक्ष, नगरसेवक होते. त्यांचे ग्रामीण भागातील जनतेशी मोठा संपर्क आहे व तसेच भाजपाचे . याचबरोबर जिंतूर सेलू विधानसभा मतदारसंघात त्यांनी बोर्डीकर कुटुंबासोबत राहून मेघनाताई यांना प्रचंड मताधिक्याने निवडून आणण्यासाठी जीवाची पर्वा न करता त्यांनी जोमाने काम केले त्यांच्या कार्याची दखल घेत पालकमंत्री यांनी त्यांची निवड केली आहे. त्यांच्या निवडीचे जिंतूर शहरांमध्ये भाजप कार्यकर्ते व नागरिकांनी आतिशबाजी करत स्वागत केले.




**परभणी- महाराष्ट्राची राजधानी मुंबई येथे आज शिवसेना प्रमुख हिंदुहृदयसम्राट श्रीमान बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांच्या आशीर्वादाने तसेच महाराष्ट्राची दिल्लीतली बुलंद तोफ व कर्तुत्ववान नेतृत्व मा.खा.श्रीकांतजी एकनाथराव शिंदे,शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रामदासभाई कदम, माजी मंत्री अर्जुनजी खोतकर, विधान परिषदेचे आमदार हेमंतजी पाटील, जिल्हाप्रमुख आनंदजी भरोसे,माजी खासदार सुरेशजी जाधव, उपजिल्हाप्रमुख मानिकजी फोढे या सर्वांच्या उपस्थितीत आज शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला.**

### सुमन मधूकरराव रायपत्रीवार यांचे निधन



**जिंतूर/प्रतिनिधी -** सुमन रायपत्रीवार यांचे निधन झाले. जिंतूरातील सुमन मधुकरराव रायपत्रीवार वय ७८ दिनांक ५/११/२०२५ रोजी पहाटे २.४५ वाजता राहत्या घरी आमदार कॉलनी येथे देव अज्ञा झाली. वैखुंठधाम जिंतूर येथे अंत्यविधी करण्यात आला. त्यांच्या पश्चात ३ मुले, १ मुलगी सुना नातवंड असा परिवार आहे. गजानन रायपत्रीवार, निलेश रायपत्रीवार, पत्रकार सचिन रायपत्रीवार, यांच्या त्या मातोश्री होत्या. अंत्यविधी साठी गावातील प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार, नेते उपस्थित होते. दरम्यान त्यांच्या जाण्याने पंचक्रोशीत शोककळा पसरली असून ईश्वर त्यांच्या आत्महत्या शांती देवो.

### कपिधारा पायी दिंडीचे सोनपेठात स्वागत



**सोनपेठ,/प्रतिनिधी :** श्री संत मन्मथ स्वामी यांच्या दर्शनासाठी जाणाऱ्या वसमत ते कपीलधारा या पायी दिंडीचे गुरुवारी सोनपेठात आगमन झाले. यावेळी शहरातील लिंगायत समाज बांधव व नागरीकांच्या वतीने दिंडीचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. दिंडीचा मुक्काम सोनपेठ शहरातील महालिंगेश्वर विद्यालयात झाला. यावेळी ग्रामीण रुग्णालय सोनपेठ च्या वतीने दिंडीतील भाविकांच्या आरोग्य तपासणीसाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले. आरोग्य शिबिरात सहभागी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ विठ्ठल कराड, डॉ.मन्मथ महाजन यांनी भाविकांची तपासणी केली. यावेळी ग्रामीण रुग्णालयातील कर्मचारी स्वप्नील राठोड, श्रीमती वैशाली गाडे, सारिका चाटे, स्वरूप चव्हाण, सोमनाथ गलांडे, आशुतोष डुबे, राजेभाऊ दातार, प्रज्ञा गायकवाड यांनी परिश्रम घेतले. या शिबिरामध्ये दिंडीतील २०५ रुग्णांनाची आरोग्य तपासणी करून औषधोपचार देण्यात आले.

### जिल्हयात रुग्णायात रुग्णांची मोठी वाढ

**परभणी/प्रतिनिधी -** जिल्हयात गेल्या काही दिवसापासून ऊन, रिमझिम पाऊस आणि बोचरी थंडी असा वातावरणाचा लहरी पणा जाणवत आहे. त्यामुळे नागरिक, लहान मुले, वयोवृध्द नागरिक, गंभीर आजाराचे रुग्ण यांना या वातावरणाचा मोठा त्रास होत आहे. त्यामुळे या वातावरणात सध्या आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य खात्याने केले आहे.

## गणेशराव रोकडे यांच्या भाजपा पक्ष प्रवेशामुळे नवसंजीवनी

**शांतीलाल शर्मा**
**पालम,/प्रतिनिधी :** पालम माजी जिल्हा परिषद सदस्य कृषी सभापती तथा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक गणेशराव रोकडे यांनी केलेल्या भाजपा प्रवेशामुळे पक्षाला नव संजीवनी मिळाली असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या काही दिवसाच्या अगोदरच होऊ घातलेल्या आहेत. यामुळे राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष गणेशराव रोकडे यांनी रासपा या पक्षाला सोडचिट्टी देत नुकतंच भाजपा पक्षामध्ये प्रवेश केल्याने या पक्षातील कार्यकर्त्यांना नव संजीवनी मिळाले असून तालुक्यातील आगामी होणाऱ्या जिप प स होऊ घातलेल्या तसेच ग्रा प पंचायात निवडणुका या परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री राज्यमंत्री मेघना दीदी बोर्डीकर यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र लढविणार असून त्या विजयी खेचून आणणार असल्याचे मत नुकतंच भाजपामध्ये प्रवेश झालेले गणेशराव रोकडे यांनी कार्यक्रमात कार्यकर्त्यांना संवाद साधताना व्यक्त केले. तालुक्यातील भाजप पदधिकाऱ्यावर व कार्यक्रत्यावर यापुढे कसलाही अन्याय होणार नसुन त्यांना बळ देण्याचे काम पालकमंत्री मेघना दीदी बोर्डीकर साकोरे यांच्या माध्यमातून केले जाणार असल्याचेही बोलताना व्यक्त केले.



रावूर जि.प गण सर्व साधारण महिला प्रवर्ग आरक्षीत झाला असुन माझी अर्धगिणी मंगलाताई गणेशराव रोकडे या मतदार संघातून निवडणुक लढविणार असून रावराजुर मतदारसंघ पिजुन काढला असून याच मतदार संघात डिग्रस बंधारा असुन याच डिग्रस बंधाऱ्याच्या पाणी लढ साठी स्वःतावर गुन्हे दाखल करून न्याय मागितला.परंतु आता मी सत्तेत आलो असून मी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या माध्यामतून पाणी लढा यासाठी यश आणाणार असुन या रावराजूर सर्कलचा सर्वगीन विकासाठी कंठीबद्द राहुन या निवडणुकीत कार्यकर्त्यांना मागील काळी तसेच पक्षाने केलेल्या कामाची पावती म्हणून ही निवडणूक लढविणार असल्याचेही गणेशराव (दादा) रोकडे यांनी बोलताना सांगितले.

## सर्व नगरपालिकांवर भाजपाचाच झेंडा फडकवू : काही ठिकाणी स्वबळावर, काही ठिकाणी युतीतून निवडणूक लढवू : ज्येष्ठ नेते सुरेश वरपुडकर यांची माहिती

**परभणी,/प्रतिनिधी-** सर्व नगरपालिकांवर भाजपाचाच झेंडा फडकवू : काही ठिकाणी स्वबळावर, काही ठिकाणी युतीतून निवडणूक लढवू : ज्येष्ठ नेते सुरेश वरपुडकर यांची माहिती देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील सर्व नगरपालिकांच्या निवडणूका सर्व शक्तीनिशी लढविल्या जातील, व सर्व नगरपालिकांवर भारतीय जनता पार्टीचाच झेंडा फडकेल, असा विश्वास भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री सुरेश वरपुडकर यांनी व्यक्त केला.

नगरपालिकांच्या निवडणूकांचा कार्यक्रम जाहीर झाल्याच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नेते वरपुडकर यांनी दिलासाशी बोलतांना या राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका टप्प्या टप्प्याने जाहीर होतील, हे अपेक्षितच होते. पहिल्या टप्प्यात नगरपालिका, या पुढील टप्प्यात जिल्हा परिषद पंचायत समितीचा निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर होईल, कदाचित या निवडणूकीच्या धामधुमीतच तो कार्यक्रम जाहीर होईल, त्या पाठोपाठ महानगरपालिका निवणूकांचा कार्यक्रम जाहीर होईल, अशी अपेक्षा व्यक्त करीत वरपुडकर यांनी या शहरी असो,



ग्रामीण भागातील सर्वसामान्य मतदार हा सातत्याने महायुतीच्या पाठीशी भक्कमपणे उभा राहीला आहे, त्याचे एकमेव कारण सर्वसामान्य मतदारांच्या पाठीशी महायुतीचे सरकारसुध्दा सातत्याने भक्कमपणे उभे राहीले आहे. त्यामुळेच ग्रामीण असो, शहरी मतदारांसमोर पक्ष केलेल्या विकास कामांसह महत्वपूर्ण धोरणात्मक निर्णय, तसेच पुढील ठप्प्यातील विकासात्मक कामांचा संकल्पनामा घेऊनच जाईल, असा विश्वास वरपुडकर यांनी व्यक्त केला.

या जिल्ह्यात नगरपालिका निवडणूकीत पक्ष महायुतीतील मित्रपक्षांसमवेत एकत्र लढण्या संदर्भात गांभीर्याने, प्राधान्याने पाऊले उचलली जातील, परंतु ज्या ठिकाणी युती अशक्य आहे त्या ठिकाणी पक्षाद्वारे स्वबळावर निवडणूक लढविली जाईल, असे वरपुडकर यांनी नमूद केले. या जिल्ह्यात बहुतांशी नगरपालिकेत स्वबळावर निवडणूका लढविण्या संदर्भातच सकृतदर्शनी चित्र दिसत आहे. परंतु, महायुतीतील सर्व नेतेमंडळी एकत्रितपणे निर्णय घेऊन पुढील पाऊल उचलतील, असे वरपुडकर यांनी म्हटले.

### निवृत्तीवेतन धारकांनी हयात प्रमाणपत्र दाखल करण्याचे आवाहन

**पूर्णा,/प्रतिनिधी-** पूर्णा तालुका कोषागार कार्यालयामार्फत निवृत्ती वेतन घेणाऱ्या निवृत्ती वेतनधारक, कुटुंब निवृत्तीवेतन धारकांनी ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत हयात असल्याचा दाखला सादर करावा, असे आवाहन तालुका कोषागार अधिकारी प्रकाश कोत्तावार यांनी केले आहे.

सर्व राज्य शासकीय निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनी आपले खाते असलेल्या बँकेच्या शाखेत जावून बँक अधिकाऱ्याच्या समक्ष हयात दाखल्याच्या यादीतील आपल्या नावासमोर स्वाक्षरी करावी. संकेतस्थळावर सुध्दा ऑनलाइन हयात दाखला सादर करता येईल. हयातीच्या प्रमाणपत्रावर बँक अधिकारी किंवा राजपत्रित अधिकाऱ्याच्या समक्ष स्वाक्षरी करून जिल्हा कोषागार कार्यालयात सादर करावे असे आवाहन कोषागार अधिकारी प्रकाश कोत्तावार यांनी केले आहे.

# कवडसे आशेचे

## आनंदाचे डोही

**अपर्णा कुळकर्णी** / ९४२१२१२४४८

**हर्ष उल्हासाचा घेऊन वसा,**
**जीवनी येतो आशेचा कवडसा...**
**अंधारलेल्या जीवन वाटेवर,**
**नकळत देतो मनाला दिलासा...**

असा दिलासा देऊन हे आशेचे कवडसे मनी आनंदी ठसे उमटवतात. कोणाला हव्या त्या शाखेला प्रवेश मिळत नाही तर, कोणाला मनासारखी नोकरी मिळत नाही असं काही ना काही जीवनात घडतं असतं. त्यामुळे, निराशेचे ढग त्यांच्याभोवती पिंगा घालू लागतात. पण, एक मार्ग बंद झाला म्हणजे सारे काही संपले असे नव्हे तर दुसरे काहीतरी चांगले आपल्या हाती येऊ शकेल, अशा सुयोग्य विचारांचा आशादायी कवडसा पुढे जाण्यास नवीन वाटा शोधण्यास प्रेरित करतो. नोकरी मिळत नाही म्हणून, जीवन वाया न घालवता आत्मनिर्भरतेचा मंत्र वेगळ्या वाटेने आळवता येतोच की ! हा विश्वास बळावतो. स्वतंत्र व्यवसाय सुरू करून आज कित्येक गृहिणी आपल्यातील गुणवत्ता सिद्ध करून अनेकांना रोजगार मिळवून देत आहेत. त्यांच्या मनात नव व्यवसायाच्या संकल्पनांचे कवडसे नर्तन करू लागले. स्वप्नांच्या मनोऱ्यास आशेची पालवी फुटून त्याला आनंदी बहर आला असं बघायला मिळतं. हे आशेचे कवडसे पकडून जीवनात आनंद मिळवता येतो. नैराश्यावर मात करता येते.

'कवडसे आशेचे, दरवाजे उघडतात यशाचे!' हरलेल्या, थकलेल्या मनाला नवी उमेद, उभारी देऊन फिनिक्स भरारी घेण्याची शक्ती त्यामुळेच मिळते. या कवडशांशी मैत्र दृढ करून पापणतीरावर ते जपून ठेवायला हवेत. होय ना! उद्याचा दिवस चांगला येणार, या आशेच्या कवडशांनी कित्येकांच्या जीवनयात्रेला बळ लाभतं. या आशेवरच तर जीवनाचा खेळ सुरू असतो. आजचा दिवस खाचखळग्यांतून चालताना ते सारं सहन करण्याची शक्ती लाभते.

अंतरीचा गाभारा प्रकाशपुंजाने तेजाळून गेला की, मनोदीप आनंदाने तेवतो. ही आनंदी अवस्थाच जीवनाला योग्य दिशा देते. आजच्या काळात खिडकी, दरवाजांना फटी नसतात. त्यामुळे कवडसे पकडण्याचा खेळ नवीन पिढीला खेळायला मिळतच नाही. याबाबतीत आपली पिढी खऱ्या अर्थाने भाग्यवान होती. प्रकाशाची तिरीप अंधाराला छेदत, उजेडाची ओवाळणी ओटीत घालत असते, हे बघत आपण मोठे झालो. म्हणून आशेचे कवडसे आत येण्यासाठी मनाची फट कायम उघडी ठेवायला हवी. मग निराशा जीवनाला ग्रासू शकत नाही. हे शिकविणारी अनेक प्रेरणादायी व्यक्तिमत्वं आपल्या अवतीभवती असतात. त्यांच्याकडे डोळसपणे बघता आले की, जीवनाचे सौंदर्य आकळू लागते.

रेल्वे अपघातात पाय आणि स्वप्नं तुटल्यानंतर अरुणिमा सिन्हासाठी एव्हरेस्ट सर करण्याचा आशादायी कवडसा वेदनांवर मात करणारा ठरला. तिची अरुणिमा आणि गरिमा वाढवून जीवनाला यशोशिखरावर नेण्यास सहाय्यक झाले हेच ते आशेचे कवडसे! काही तरी गमावल्यावर हार न मानता, अशी नेत्रदीपक



कर्तबगारी दाखवणारी अनेक उदाहरणे आपल्या आसपास घडतात. मात्र, ज्यांना हे आशादायक कवडसे धरून ठेवता येत नाहीत, गवसत नाहीत ते आयुष्याला कंटाळत दुःखी होतात तर कधी मृत्यूला कवटाळतात. मात्र, आशेचे कवडसे अलवार जपून ठेवणाऱ्यांना संघर्षाच्या वाटेवरही जीवन सुंदर आहे, असेच वाटते.

आशेचे कवडसे म्हणजे जणू मनाला निराश होण्यापासून रोखणारे सकारात्मकतेचे तारामंडळ होय. त्या दीप्तीने जीवन मार्ग चमचमता ठेवता येतो हा विश्वास नकळत निर्माण होतो. मनात आनंद लहरी फेर धरून नाचू लागतात. कार्यप्रवण होण्यास प्रेरणा आपली आपणच हातात हात देत पुढे जाण्यास सहाय्यक ठरते.

निराशेच्या अंधारात आशेचा किरण बनतो. हा अनुभव कधी ना कधी आपण सगळेच घेतो. कधी आशेचे कवडसे आपले आपण शोधून त्यानुसार मार्गक्रमण करायचे तर कधी आयुष्याच्या वाटेवर वळणावळणांवर अनेक सेवाव्रती आशेचे कवडसे चांदणचुऱ्यासम विखरून ठेवत कित्येकांच्या जीवनात नकळत हसू फुलवतात. हरू नका, थकू नका, तुमच्या आकांक्षा पूर्तीसाठी, तुमच्या जीवनवाटा उजळून प्रकाशमय करण्यासाठीच तर आम्ही आहोत, हा विश्वास देणारे काही असतात. निराश मनासाठी उत्साहाचा गोफ विणत कितीतरी जण आपल्या हाती आशेचा कवडसा घेऊन उभे आहेत. आशेचे हे कवडसे म्हणूनच तर प्रकाशदायी ठरतात.

मिट्ट काळोखात काव्यरूपी लेणे लेवून, शब्द सृजनगंधी आशेचे कवडसेच होतात ना! आपल्याच शब्दांच्या हळुवार फुंकरीने कवी दुःखाच्या डोहातून बाहेर पडतो तेव्हा मनाच्या एखाद्या कप्प्यात आशेचा गर्भ नूतन किरणांनी पोसला जातो अन् कविमन स्वप्नील आनंदी हिंदोळ्यावर झुलते. आशेच्या कवडशांची कौमुदी जीवनाला नवा अर्थ व स्थैर्य खचितच मिळवून देते. असे हे विविधरूपी कवडसे जीवन बागेतील आनंदी फुले फुलवीत जीवनाला आनंदगंध देतात. हे कवडसे कधी एखाद्या जीवनचरित्रातून गवसतात तर कधी ग्रंथातील एखाद्या वाक्याने तर कधी आपल्याच विचारप्रणालीतून ते अलगद ओंजळीत येतात. कधी वडिलधाऱ्यांच्या पाठीवरील आश्वासक हाताने अवचित जीवन उजळून टाकतात. एखादे सूचक चित्र, कलाकृती सुद्धा या निर्मितीस कारणीभूत ठरू शकते. एखादा अनपेक्षित मिळालेला पुरस्कार, सकारात्मक शब्दांची पेरणी, स्तुतिसुमने अशी कितीतरी कारणे देता येतील पण ते कवडसे पकडण्यासाठी मनोभूमी सजग असायला हवी म्हणजे जीवनाचा आनंदोत्सव होतो. आशेचे कवडसे पकडत पुढे जाताना जी अनुभूती येते ती खूप काही शिकवून जाते. ज्यांची जीवननिष्ठा प्रबळ आणि प्रखर असते त्यांना आशेचे कवडसेसुद्धा घट्ट पकडता येतात. आणि आनंदी जीवनगाणे गात इतरांसाठी आशेचे कवडसे होता येतं.

व्यापार उद्योगात फटका बसल्यावर त्यातून बाहेर पडण्याची प्रेरणा हे कवडसेच तर देतात. नापिकीमुळे खचलेला, दुष्काळाने कर्जबाजारी झालेला, मातीमोल भावाने दुःखी कष्टी झालेला शेतकरी पुन्हा हिरवे स्वप्न डोळ्यांत ठेवून अश्रू दूर सारून नव्या उमेदीने कामाला लागू शकतो. आशेचा हा कवडसा म्हणजे जणू तप्त काहिलीत गार वाऱ्याची झुळूक! रोजच्या जीवनांतही कधी उगाचच निरुत्साहामुळे झाकोळलेल्या, अंधारल्या क्षणी आशेचे छोटेसे फुलपाखरू भोवती भिरभिरू लागले की, नकळत आनंदाची लाट उचंबळून येते. त्या सप्तरंगी कवडशांना कधी केवड्याच्या गंधाची धुंदी असते तर कधी मोगऱ्याच्या! म्हणजे झाकोळलेले आभाळ सोसाट्याच्या वाऱ्याने निरभ्र व्हावे, तसे मन अवचित प्रसन्न होते. शांती समाधानाचे गीत मनी गुंजते. नव्या जोमाने आणि उत्साहाने आपण कामाला लागतो. आपल्यात कार्याची ऊर्मी निर्माण करू शकतो. या आशेच्या कवडशांच्या इवल्याशा प्रकाशझोताने चैतन्य सळसळू लागते. जीवनाची रंगत वाढते. ऊन पावसाच्या खेळात जसा इंद्रधनू डोकावतो तसा सुखदुःखाच्या प्रसंगी आशेचा कवडसा जीवनाचा तोल सावरत मन प्रफुल्लित ठेवतो. म्हणूनच म्हणावेसे वाटते,

***एक कवडसा आशेचा हळुवार,***
***धैर्य, स्थैर्य देऊन सावरतो मनाला...***
***प्रसन्न आनंदी तरंगांनी उजळतो,***
***निराशेने ग्रासलेल्या आयुष्याला...***

---

# रिंगा रिंगा रोझेस

**श्रेया सरनाईक**/ ८६००२७७८८८

काका गेल्यामुळे आपण एकदम श्रीमंत झालो आहोत, हे सत्य पचायला रूथला वेळ लागला. तिच्या हातून गळून पडलेलं पत्र मायकलने उचललं. त्या दोघांनाही खूप आश्चर्य वाटलं होतं. पुढचे दोन दिवस नुसते काथ्याकूट करण्यात गेले. मायकेलने त्या दोन-तीन दिवसांत एकदाही प्लँचेट रूम उघडली नाही. रूथने कुठेही जाऊ नये, असंच त्याला वाटत होते. अचानक मिळालेल्या श्रीमंतीत त्याला फार काही रस नव्हता. रुथचा स्वभाव जात्याच आळशी असल्याने एवढे पैसे मिळाल्यावरही ती काकांच्या इच्छा पूर्ण करू शकेल की नाही? या विषयी त्याला शंका होती.

आपण गेलो नाही तर काकांच्या अंतिम इच्छांना न्याय दिल्या जाणार नाही, असं रूथला वाटलं. मायकेलचं म्हणणं



होते की, दिलेल्या मुदतीच्या आत रूथ गेलीच नाही तर शेवटी कंटाळून वकील ती प्रॉपर्टी सरकार दरबारी जमा करून देईल.

सरकार तोच पैसा गोरगरिबांच्या कल्याणासाठी वापरेल. त्यामुळे रूथने त्या पैशांच्या मोहात अजिबात पडू नये, असं त्याला वाटत होतं. एकतर त्यांना वारस नव्हता व दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे त्या पैशामुळे त्या दोघांच्या नात्यात मोठे वितुष्ट येईल की काय? असे ही त्याला वाटत होती.

हे त्याने तिला बोलून दाखवले नाही. पण, असा आयता, सुखासुखी एवढा मोठा पैसा मिळाला तर कदाचित रूथ नोकरीवर लाथ मारेल व शहरात जाऊन राहण्याचा हट्ट करेल. त्याला याच लहान टुमदार गावात रहायचे होते. हवा तेवढा एकांत व मोकळा वेळ मिळत असे.

प्लँचेटशी संबंधित अनेक प्रयोग त्याला करायचे होते. ऑटो-रायटींग तंत्र अधिक विकसित करण्याची त्याची इच्छा होती. विटालिस नावाची एक अतिंद्रिय शक्ती या सृष्टीत सक्रीय आहे, यावर त्याचा विश्वास होता. पुढच्या तरुण पिढ्यांना या शक्तीविषयी माहिती देण्याची त्याची इच्छा होती. विटालिसच्या माध्यमातून सृष्टीची गूढ तत्वे ओळखता येतात, यावर त्याचा ठाम विश्वास होता. २-३ दिवस झाले घटना फारच विचित्र घडत आहेत, असं त्याला वाटलं. ते 'माय बेबी' प्रकरण त्याला नीट समजावून घ्यायचं होतं. त्यातच रुथचा कोणतातरी काका अचानक काय मरतो व तो संपत्ती हिला देऊन टाकतो, हे त्याला पटले नाहीच, आवडले तर अजिबात नाही. असली उठाठेव करण्यापेक्षा काकांनी रुथला जिवंतपणीच विश्वासात घ्यायला हवं होतं, असं त्याचं स्पष्ट मत त्याने रूथला बोलूनही दाखवले.

रुथ कमालीची उत्तेजित झाली होती. आपण तिथे दहा दिवसांच्या आत पोचायलाच हवे, हा जणू काही काकांचा आदेश आहे. तो पाळायलाच हवा, असे एकंदर तिच्या हालचालींवरून लक्षात येत होते. रूथने कॉकबोर्डवर नकाशा अडकवला. जाण्यासाठी प्रवास करण्याच्या हेतूने ती सगळी तयारी करत आहे, हे त्याच्या लक्षात आलं.

'तू पण चल ना मायकेल माझ्या बरोबर!'

'छे! माझे सर्व कार्यक्रम सुनिश्चित आहेत.'

'तू सुद्धा अजिबात जाऊ नकोस रूथ! मला हे सर्व काहीतरी गूढ वाटतेय.'

'मग ऐक, माझं पण ठरलंय. मी त्या वकिलाला भेटायला जाणार म्हणजे जाणार.'

'बायको हटटी असली की, फार असहाय्य वाटतं. असं माझे काही मित्र म्हणत असतात ते आज खरं वाटतेय.' 'आपण खूप श्रीमंत होणार आहोत मायकेल! फक्त वीस तासांचा प्रवास करून काही सह्या केल्या की झालो आपण श्रीमंत!' 'ही असली श्रीमंती खरंच इतकी महत्वाची आहे का रूथ? त्या रुटने तू जावं अशी माझी अजिबात इच्छा नाही.

'का पण? काय प्रॉब्लेम आहे?'

'त्या रुटवरचे एक स्टेशन ब्लडमूर आहे. याचे नाव ऐकले आहेस का तू कधी?'

'ब्लडमूर! किती विचित्र नाव! अर्थ काय रक्तरंजित?'

'हो. मी तुला तेच सांगायचा प्रयत्न करत आहे.' 'वाह, सुपर! तू एखादी सस्पेन्स थ्रिलर स्टोरीविषयी सांगत आहेस का मला? डरावनी भूतनी! हा हा हा!' ती हसत सुटली.

---

## अभिजात अमृत

**प्रा. सुनंदा पाटील**/ ८४२२०८९६६६

# कुर्यात् सदा मंगलम्

प्रबोधिनी एकादशी आणि तुलसी विवाहाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा ! हिंदू परंपरेमध्ये अनेक संस्कार सोहळे आहेत. यासाठी मराठी लोकांनी वेगवेगळी पद्य रचना करून ठेवलेली आहे आणि म्हणूनच ही मराठी 'अभिजात अमृत' आहे.

लोकसाहित्यामध्ये विविध ओव्यांद्वारे संपूर्ण लग्न विधीचं वर्णन केलं जातं, जे यापूर्वीच्या एका विभागात मी काही उदाहरणे देऊन सांगितलेलं आहे. पण, कितीही सांगितलं तरी दशांगुळे उरणारी आपली मराठी! मराठी काव्याचा ठेवा खूप मोठा आहे.

स्त्री-पुरुषांच्या जीवनातील विवाह संस्कार हा सोळा संस्कारांपैकी एक महत्त्वाचा संस्कार आहे. यात तर गाण्यांना किंवा पद्याला खूप महत्त्वाचं स्थान आहे. मातापित्यांच्या संमतीने होत असलेल्या, धार्मिक पद्धतीच्या विवाहप्रसंगी म्हटल्या जाणाऱ्या, नेमकं लग्न लागतं त्यावेळच्या पद्यरचनांना 'मंगलाष्टक' असं म्हणतात. मंगलाष्टकाची प्रथा विशेषकरून महाराष्ट्रीय समाजातच प्रचलित आहे. ही मंगलाष्टके म्हणून विवाह समारंभात वधूवरांवर फुले किंवा अक्षता वाहिल्या जातात आणि आशिर्वाद दिला जातो. हा या प्रथेचा एक भाग आहे.

मंगलाष्टकाचे मूळ विवाह प्रसंगी ज्येष्ठांनी वधूवरांना त्यांच्या दाम्पत्य जीवनासाठी द्यावयाच्या आशीर्वाचनात आहे. पारंपरिकरित्या मंगलाष्टके ही आठ असतात. विशिष्ट सुरात आणि आघातांमध्ये म्हणावयाची ही पद्य रचना आहे. तिच्या प्रत्येक चार ओळींचा चरण संपला की, वधू-वरांवर अक्षतांचा वर्षाव होतो. पूर्वी ही प्रत्येक रचना मराठी किंवा संस्कृतमध्ये असायची. पण सध्या अनेक ठिकाणी, वधू-वरांचे नातेवाईक किंवा निकटवर्तीय वेगवेगळ्या तऱ्हेने आणि हौशीने मंगलाष्टकं लिहितात आणि गातात. हा सुद्धा इव्हेंटचा एक भाग झाला आहे.

मंगलाष्टके शार्दुलविक्रीडीत वृत्तात असतात. या वृत्तात १९ अक्षरे असतात. ज्याचे गण 'मसजसततग' असे असून यती स्थान बारा आणि सात आहे.

**मासाजासतताग येत गण**
**हे शार्दूलविक्रीडित**
**बारानंतर येत जो**
**यति पहा सातास की जोडित**

ही या वृत्ताची ओळख आहे. पूर्वी लग्न



**मंगलाष्टकाचे मूळ विवाह प्रसंगी ज्येष्ठांनी वधूवरांना त्यांच्या दाम्पत्य जीवनासाठी द्यावयाच्या आशीर्वाचनात आहे. पारंपरिकरित्या मंगलाष्टके ही आठ असतात. विशिष्ट सुरात आणि आघातांमध्ये म्हणावयाची ही पद्य रचना आहे. तिच्या प्रत्येक चार ओळींचा चरण संपला की, वधू-वरांवर अक्षतांचा वर्षाव होतो. पूर्वी ही प्रत्येक रचना मराठी किंवा संस्कृतमध्ये असायची. पण सध्या अनेक ठिकाणी, वधू-वरांचे नातेवाईक किंवा निकटवर्तीय वेगवेगळ्या तऱ्हेने आणि हौशीने मंगलाष्टकं लिहितात आणि गातात. हा सुद्धा इव्हेंटचा एक भाग झाला आहे.**

लावणारे गुरुजी मंगलाष्टके संस्कृतमध्ये म्हणत. प्रथम मंगलाष्टक हे गणपतीचं असतं. या ओळी आपल्या ओळखीच्या आहेत.

***स्वस्ती श्री गणनायकं गजमुखं,***
***मोरेश्वरं सिद्धिदम् ।***
***बल्लाळो मुरुडम्***
***विनायकमतम् चिंतामणी स्थेवरम ॥***
***लेण्याद्री गिरिजात्मजं***
***सुवरदं विघ्नेश्वरं ओझरम् ।***
***ग्रामो रांजण संस्थितम्***
***गणपती कुर्यात् सदा मंगलम् ॥***
***तसेच,***
***लक्ष्मी कौस्तुभ***
***पारिजातक सुरा, धन्वंतरीश्चंद्रमा***
***किंवा***
***गंगा सिंधू सरस्वतीच***
***यमुना गोदावरी नर्मदा...***

आपल्याला ही ठाऊक आहेत. यात रामरक्षेतील काही श्लोक किंवा इतर श्लोकांचाही समावेश केला जाई. मराठीतील हे मंगलाष्क बघा.

राजा भीमक रुक्मिणीस
नयनी देखोनी चिंता करी
ही कन्या सगुणावरा नृपवरा कोणास म्या देईजे

***आता एक विचार कृष्ण नवरा***
***त्यासी समर्पू म्हणे***
***रुक्मा पुत्र वडील त्यास पुसणे***
***कुर्यात सदा मंगलम् ॥***

मंगलाष्कातील शेवटचे चरण तेव्हाही आणि आताही,

तदेव लग्नं सुदिनं तदेव, ताराबलं चंद्रबलं तदेव...याने होते.

मंगलाष्ट्राकांचा विषय निघालाच म्हणून सांगते की, पूर्वीच्या कवींनी ज्या अन्योक्ती लिहून ठेवल्या आहेत त्यात, अनेक रचना शार्दुलविक्रीडीत याच वृत्तात आहे. खऱ्या लग्नात नाही पण, शाळकरी वयात बाहुलीच्या लग्नात आम्ही ती पदे मंगलाष्टक म्हणून म्हटलेली आहेत. मयुरान्योक्ती, वृक्षान्योक्ती ही त्याची काही उदाहरणे आहेत.

आज वृत्तात उत्तम लिहीणारे कवी लग्न-मौंजीची मंगलाष्के लिहून देतात. यात ८ पैकी प्रथम मंगलाष्क गणपतीचे/कुलदैवतांचे असते. नंतर तिथी, मुहूर्त, वार यांचा उल्लेख असतो. पुढे वधुवरांची, त्यांच्या आईबाबांची क्वचित निकटवर्तियांचीही नावे असतात. नंतरची मंगलाष्के ही कल्पनांचा छान फुलोरा असतो. मी आजवर अनेक लग्न-मौंजीची मंगलाष्के लिहिलीत.

***सोन्याच्या शुभपाउली***
***हसत ही येईल लक्ष्मी घरी ।***
***पाहूनी वरमाय धन्य हिजला***
***संतोषली अंतरी ॥***
***वैदेही जशी शोभते***
***रघुवरा कृष्णा तशी रुक्मिणी ।***
***सावित्री सती पार्वती***
***तुजसवे कुर्यात् सदा मंगलम् ॥***

अशा प्रकारच्या मंगलाष्कांनी विवाहविधी साजरे होतात. आज प्रबोधिनी एकादशी आहे. उद्यापासून तुलसी विवाह सुरू होत आहेत. त्यासाठीही मंगलाष्के आपण म्हणणारच आहोत. अभिजात मराठीचा मंगलाष्के हा भाग बघितल्यानंतर, विवाह विधीतला किंवा जरा वेगळा असा 'विहिण' हा एक काव्याचा प्रकार आहे. ज्यात मुलीची आई 'आपल्या मुलीला सांभाळून घ्यावं' अशी विनंती मुलाच्या आईला करते, तीच विहिण! त्याचवेळी उत्तरदाखल मुलाची आईसुद्धा गाणी म्हणते ती सुद्धा विहीणच! साधारणपणे विहिणीच्या पंगतीत ही गाणी गायली जातात. अर्थातच, दोन्ही विहिणींच्या वतीने इतरही स्त्रिया ही गाणी म्हणतात. प्रसंगी काही पुरुषही ही गाणी म्हणतात. ही सर्व गाणी भावगीताच्या अंगाने जाणारी असल्यामुळे त्याचा विशेष उहापोह या ठिकाणी करीत नाही. 'ओटीत घातली मुलगी विहिण बाई','जा मुली जा दिल्या घरी तू सुखी रहा','जा बाळे जा सुखे सासरी','दाटून कंठ येतो','निघाले आज तिकडच्या घरी','लिंबलोण उतरता अशी का झालीस गं बावरी' ही गाणी प्रचलित आहेत. मंगलाष्कांप्रमाणेच विहिणीसुद्धा उत्सवमूर्तींची नावे घालून वेगवेगळे कवी तयार करतात. मंडळी, विस्तारभयास्तव आज इथेच थांबते. मराठी काव्याचा असाच एक वेगळा विषय घेऊन पुन्हा भेटू या पुढील शनिवारी !

---

# राणी अवंतीबाई लोधी

**शुभांगी गान**/ ८६५७४२४०७१

**आझादी संग्राम की महिला, प्रथम शहिद ।**
**इतिहासों मे लिखित, प्रखर रही ताकीद ॥**
**गोरों से लोहा लिया, आझादी संग्राम में ।**
**भारत की विरांगना, प्रखर अवंती नाम है ॥**

जिच्या देश प्रेमाविषयी इतकं प्रखरतेने, इतक्या अभिमानाने लिहिलं जात ती १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामातील रामगडची राणी अवंतीबाई लोधी ही इतिहासाच्या पानावरची एक धगधगती ज्वाला! इंग्रजांशी लढा द्यायला तत्पर झालेल्या राणीच्या साहस, धाडस आणि शौर्याला तोड नाही.

दिनांक १६ ऑगस्ट १८३१ रोजी झुंजार सिंह आणि माता कृष्णाबाई यांच्या पोटी मनकेहणी जिल्हा शिवनी येथील एका जमीनदार कुटुंबात अवंतीचा जन्म झाला. स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात घराघरातून देशप्रेमाचे आणि स्वातंत्र्याच्या मागणीचे वारे वाहत होते. अशा वातावरणात जन्मलेल्या या कन्येने देश प्रेमाचा वसा घेतला होता. बालपणातच घोडेस्वारी आणि शस्त्रसंचलनाचे प्रशिक्षण तिने घेतले.

सन १८४९ ला तिचा विवाह रामगड वतनाचे राजा लक्ष्मण सिंह यांचा पुत्र विक्रमादित्य सिंह यांच्याशी झाला. पिता लक्ष्मण सिंह यांच्या निधनानंतर विक्रमादित्य राजा म्हणून सिंहासनावर विराजमान झाला पण, मुळातच प्रकृती फारशी चांगली नसल्याने राज्याचा कारभार राणी अवंतीबाई लोधी यांच्या हाती आला. यावेळी त्यांचे दोन पुत्र अमान सिंह आणि शेर सिंह अतिशय लहान होते. त्यामुळे संपूर्ण जबाबदारी राणीच्या खांद्यावर होती. अशा स्थितीत राज्य प्रशासन उत्तमरीत्या चालवून इंग्रजांनादेखील स्वसामर्थ्याची जाणीव करून दिली.

त्यावेळी भारतात लॉर्ड डलहौसीचे शासन होते. साम्राज्यवादाचा भोक्ता असलेल्या डलहौसीने राज्यविस्तार धोरण अवलंबिलं होतं. एक एक प्रांत अवैध घोषित करून त्यावर आपलं नियंत्रण प्रस्थापित करण्याची त्याची एकंदर



हडपनीती बघता सर्व वतनदार अत्यंत बेचैन होते. आपला प्रदेश कधी आणि कोणत्या नीतीनुसार बळकावला जाईल ? या दहशतीत प्रत्येक प्रांत भयभीत होता. ज्या प्रांतात उत्तराधिकारी योग्य नाही ती राज्य खालसा करण्याचं धोरण त्याने अवलंबलं होतं. यानुसार कानपूर, झाशी, नागपूर, सातारा, जयपूर, संबलपूर, उदयपूर आणि करौली इत्यादी संस्थाने खालसा केली होती.

नाबालिक पुत्र, राजा अयोग्य आणि एका राणीचा कारभार ही स्थिती बघता त्याने रामगड संस्थानाला कोर्ट ऑफ वॉर्ड्सच्या अंतर्गत आपल्या अधीन करून शासन प्रबंधासाठी शेख मोहम्मद आणि मोहम्मद अब्दुल्ला यांना रामगडला पाठवलं. पण, राणीने त्या दोघांनाही रामगढमधून हाकलून दिलं. वर्ष १८५५ च्या दरम्यान राजा विक्रमादित्यचा मृत्यू झाला.

लॉर्ड डलहौसीच्या हडप नीतीविरुद्ध सर्व राज्यांनी मिळून एक विशाल संमेलन आयोजित केलं. यात राजा शंकर शहा यांना या क्रांतीचा अध्यक्ष आणि प्रसार-प्रचाराचं कार्य राणीला सोपवण्यात आलं. प्रचारांतर्गत तिने एक पत्र आणि बांगड्या अनेक राजांना रवाना केल्या. त्या पत्रात तिने असं लिहिलं की, देशाची रक्षा करण्यासाठी एक तर युद्धात उतरा अन्यथा बांगड्या भरून घरी स्वस्थ बसा. आणखी एक तुम्हाला तुमच्या धर्माची शपथ आहे. विश्वासघात करू नका. तिच्या या वीरतेची साहसाची दखल घेत, अनेक जमीनदार राजे तिच्या संघर्षात सहभागी झाले. अनेक सभा-संमेलन घेऊन तिने क्रांतीची ज्योत पेटवली होती. वर्ष १८५७ च्या क्रांतीने संपूर्ण भारत पेटला होता. काही विश्वासघातकी लोकांनी केलेल्या विश्वासघातामुळे तिचे प्रमुख सहयोगी इंग्रजांद्वारा पकडून त्यांना फाशी दिल्या गेली. ती या दुःखाने पेटून उठली आणि तिने इंग्रजाविरुद्ध विद्रोह केला. मध्य भारताच्या क्रांतीची सूत्रं तिने आपल्या हातात घेतली आणि आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने घुगरी रामनगर, बीछिया इत्यादी प्रांत जिंकून घेतले.

यानंतर, मंडलावर आक्रमण करण्याचा निर्णय घेतला. या युद्धात इंग्रज सैन्य आणि क्रांतिकारकांच्या सैन्यात जबरदस्त युद्ध झालं. राणी आणि मंडला डिप्टी कमिशनर वॉडींग टन यांच्यातही जबरदस्त युद्ध झालं. त्याचा घोडा जखमी झाला. तोही मरणार पण, एका सैनिकाने त्याचे प्राण वाचवले आणि त्याने युद्धातून माघार घेतली.

पण, चिडलेला वॉडींग टन आपली मोठी फौज घेऊन त्याने रामगड किल्ल्यावर धावा बोलला. यात रेवा नरेशानी इंग्रजांना साथ दिली होती. राणीचं सैन्य इंग्रजांच्या तुलनेत अल्प होती. तरीही त्यांनी डटकर सामना केला. पण, परिस्थितीचं गांभीर्य ओळखून राणीने देवहारगड डोंगरांमध्ये आसरा घेतला. राणीने रामगड सोडल्याबरोबर इंग्रजांनी रामगड किल्ला संपूर्णपणे उध्वस्त केला. राणीच्या मागावर देवहारगड येथे पोहोचले आणि राणीला आत्मसमर्पणाचा आदेश दिला. पण, तिने इंग्रजांशी आपल्या छोट्याशा सैन्यानिशी अनेक दिवस मुकाबला केला. या युद्धात तिच्या डाव्या हाताला गोळी लागली बंदूक हातातून निसटली. परिस्थितीचं अवलोकन करताना तिच्या लक्षात आलं आता कठीण आहे. तिने एका सैनिकाच्या हातातून तलवार हिसकली आणि स्वतःला संपवलं. तिच्या दासीनेही त्याचं अनुकरण केलं.

अशी ही राणी जिने जाताना ही इंग्रज ऑफिसरला एक संदेश दिला. त्यात ती म्हणाली, ग्रामीण भागातील लोकांनी जो संघर्ष केला त्याचं कारण मी आहे. त्यांना मीच तुमच्या विरुद्ध भडकवलं होतं. ते लोक निर्दोष आहेत त्यांना कोणतही शासन करू नये, असं म्हणताना तिने कित्येकांचे प्राण आणि हाल वाचवले होते. २० मार्च १८५८ रोजी तिने आपल्या आयुष्याचा प्रवास संपवला.

---

## रानभाज्यांच्या जगात

**संगीता ठलाल**/७८२१८१६४८५

# पोषक गांगोरी

माणूस आपल्या आवडीनुसार कितीही पदार्थ बनवून खात असेल तरी त्याला कमीच आहे. उघड्यावर मिळणाऱ्या पदार्थांचा रंग एकदा मनमोहक दिसला की खाण्याचा मोह आवरत नाही. तसेच पदार्थ, पेय खाण्यापिण्याची सवय लागली की, आपल्या आरोग्याचासुद्धा विचार करत नाही आणि अशाच सवयीमुळे अनेक आजार होत असतात. एक

**गांगोरीचे वेल दिसायला मोहक असतात. साधारण कारल्याच्या पानांसारखी पानं असतात. गांगोरी आरोग्यासाठी लाभदायक असते व पोषक असते. ती जेव्हा मिळेल तेव्हा विशेषतः पावसाळ्यात २-३ वेळा तिची भाजी करून खायला हवी.**

गावरान भाजी आहे जिला झाडीबोलीत 'गांगोरी' या नावाने ओळखले जाते. ही भाजी खास करून पावसाळ्यात आणि गावखेड्यातच जास्त मिळते. हिवाळ्यात आणि उन्हाळ्यात ती भाजी जरड होते. या भाजीचे वेल कुंपणावर पसरतात.

गांगोरीचे वेल दिसायला मोहक असतात. साधारण कारल्याच्या पानांसारखी पानं असतात. गांगोरी आरोग्यासाठी लाभदायक असते व पोषक असते. ती जेव्हा मिळेल तेव्हा विशेषतः पावसाळ्यात २-३ वेळा तिची भाजी करून खायला हवी. गांगोरीची भाजी बनविण्याची पद्धत सोपी आहे. आधी त्या भाजीचे कोवळे लुसलुशीत डीरे तोडून घेतात. नंतर स्वच्छ धुवून घेतात. पाणी सुकल्यावर बारीक चिरून घेतात. एका पातेल्यात थोडे तेल टाकून लसणाच्या ३-४ पाकळ्या बारीक करून, बारीक चिरलेला कांदा टाकून खमंग फोडणी देतात. हिरवी मिरची किंवा सुकलेल्या लाल मिरच्या चिरून टाकतात. नंतर हळद, मीठ, एक लालबुंद टोमॅटो टाकून सर्व मिश्रण



एकत्र शिजवून घेतात. आता त्यात चिरलेली ही भाजी टाकतात आणि परतवून घेतात. पातेल्यावर झाकण ठेवून कमी आचेवर शिजवतात. पंधरा मिनिटात भाजी छान शिजते. पोळी, वरण-भात यासोबत ही भाजी खातात. भाजी शिजताना इतका खमंग वास सुटतो की, खाण्याचा मोह आवरत नाही. अशा दुर्मिळ व निसर्गाच्या सान्निध्यात राहून वाढणाऱ्या रानभाज्या, गावरान भाज्या आवर्जून खायला हव्यात.

## आठवणींच्या पारावर

मो. बा. देशपांडे/८३२९१९३५४२

# आपला तुपला...

चिं. वि.जोशींची लहानपणी वाचलेली एक मार्मिक कथा आठवते. खेड्यातील एक बाप नोकरीसाठी आपल्या तरुण मुलाला दोन पत्ते देऊन शहरात पाठवतो. एक असतो श्रीमंत नातेवाईकाचा आणि दुसरा मध्यमवर्गीय बालमित्राचा! आप्त छान गोडगोड बोलतात. इतर माहिती विचारतात पण, नोकरी म्हणताच हात वर करत म्हणतात, 'अरे, आमच्या हातात काहीच नाही !' नंतर तो वडिलांच्या बालमित्राकडे जातो. तो मित्र अगोदर इकडे न आल्याबद्दल सपाटून कानउघाडणी करतो. नंतर पोटभर जेवायला घालून त्याला सायकलवर बसवून, चार ठिकाणी फिरून ओळखीने एक नोकरी मिळवून देतो. या कथेचा काय बोध आहे? काही लोक भेंडीच्या भाजीसारखे बुळबुळीत बोलून कशातही गुंतत नाही. तर काही लोक इतरांसाठी प्रयत्न धावधाव आणि प्रसंगी पदरमोड करून काम फत्ते करून देतात.

आप्त स्वकीय आणि सुहृदांना आपण आपलं मानतो. सुहृद शब्दात शेजारी, सहकारी आणि मित्र अर्थातच समाविष्ट आहेत. आपण ज्यांना तुपले मानतो कधी कधी ते अंतर ठेवून वागतात. याउलट कधी अनोळखी सेवाभावी माणूस मोठी मदत करून जातो.

आई-वडील, भाऊ-बहिण याखेरीज मामा, काका, आत्या, मावशी, सून, जावई, सासू, व्याही अबब किती हा गोतावळा ! ही नातीगोती यापेक्षा अधिक खोल आणि गुंतागुंतीची होत जातात. आणि, गंमत म्हणजे ती तात्पुरती नसून जन्मभराला चिकटतात. जन्माला येताना नातीगोती घेऊन येणारा माणूस नाती जन्मभर तर जोपासतोच पण, लौकिकार्थाने अस्तित्व संपल्यावरही अगदी मृत्युपत्रातूनही नाती आणि वंशावळी शिल्लक उरतात.



सुमधुर नाती हा जीवनाचा महत्वपूर्ण दुवा आणि रस आहे. त्याखेरीजच का आपण जीवात जीव असेतोवर स्नेहरंग फिके पडू नये, याची काळजी घेतो. पण अनेकदा निव्वळ जन्माने प्राप्त नात्यांचाच आपण प्राधान्याने विचार का करतो? हा

**आई-वडील, भाऊ-बहीण याखेरीज मामा, काका, आत्या, मावशी, सून, जावई, सासू, व्याही अबब किती हा गोतावळा ! ही नातीगोती यापेक्षा अधिक खोल आणि गुंतागुंतीची होत जातात. आणि, गंमत म्हणजे ती तात्पुरती नसून जन्मभराला चिकटतात. जन्माला येताना नातीगोती घेऊन येणारा माणूस नाती जन्मभर तर जोपासतोच पण, लौकिकार्थाने अस्तित्व संपल्यावरही अगदी मृत्युपत्रातूनही नाती आणि वंशावळी शिल्लक उरतात.**

संकुचित कोतेपणा सार्वत्रिक का ? मित्र, शेजारी, सहकारी आणि मानलेली नाती सुद्धा जीवनात बरेचदा विशेष रंग आणताना दिसतात की नाही ? स्वार्थाची कुतरओढ हेच जगाचे नेटवर्क ! त्यातून व्यवहारी प्रेमाची जुगलबंदी जगात अहर्निश सुरू असते. जिथे नाळ गाडली आहे तिथे किंवा जन्मगावी अंत्यविधीची इच्छा लिहून ठेवणे हा केविलवाणा अट्टहास का? यापेक्षा कसलाच हिशेब खिजगणतीत न ठेवणारे कृमिकीटक बरे म्हणावे ! अनंतात विलीन झाल्यावर या देहाची माती मूळ मातीत म्हणजे पृथ्वितत्वातच विलीन होते, हेच उन्नत सत्य! अनोळखी परवडले पण 'आपल्या तुपल्यांपासून सावधान' हा सावध इशारा खूप काही सांगून जातो.

प्रत्येकाला त्यांच्या कामाचे आणि तोलामोलाचे लोकच आलेले बरे वाटतात. उगाच काम करणारे आणि मदत मागणारे लोक नको असतात. एखादा गावाकडचा गरीब पाहुणा अचानक आलाच तर हेटाळणी पदरी पडते. चहा-सरबत वगैरे विचारणं तर दूरच!

लोकं खरं काय ते ओळखून असतात. पण, उच्चभ्रू आपल्याच सोपस्कारी शैलीत पुरते बुडालेले असतात. म्हणजे निमंत्रण पत्रिकेवर पिवळ्या अक्षदा चिकटवून, शेजारी दोन्ही हात जोडलेलं चित्र! खाली तळटीप: येण्यासाठी निमंत्रण आहेच हो पण, काही कारणांनी शक्य नसल्यास फोनवर कळवणे म्हणजे, कॅटररला नेमक्या प्लेट्सची ऑर्डर देणे सोयीचे होईल!

एक गमतीदार किस्सा! दिवाळीत बंगलेवाल्या आपल्या तुपल्यांच्या घरी गेलो होतो. त्यांनी फराळ आणला, सोबत सुका मेवा पण होता. मग ते चहा आणायला आत गेले. एक पिस्ता खात होतो. तितक्यात माझी नजर समोरच्या कॅमेऱ्यावर गेली. चहा आला तेव्हा मी त्यांना विचारलं,'कॅमेरा कितीला घेतलात?' तर ते हसत म्हणाले,'डमी आहे तो! मी दिवाळीत नेहमी लावून घेतो म्हणून मी ड्राय फ्रुट पण भरपूर ठेवतो.'

***'छे छे मी केवळ चार पिस्ते खाल्ले.'***

***'नाही हो सहा खाल्ले.*** तुमचं गणित कच्चं दिसतंय. तुम्ही खा की हो मोजायचे कशाला?'

जीवनाचे सार आणि मर्म याहून कोणतं वेगळं आहे? आपल्या तुपल्यांची मानसिकता आणि तिचं व्यवस्थापन हा एक स्वतंत्र संशोधनाचा विषय ठरेल. पण, श्रीमंती बाण्याने या समस्येवर सहज मात करता येते. तरीच एक महान तत्ववेत्ते म्हणून गेले की, बरे झाले देवा! मित्रांची निर्मिती केलीस. नाहीतर नातेवाइकांच्या गदारोळात पार हरवून गेलो असतो. वरचे कथन हे या विचाराचा उर्ध्वर्यू म्हणजे आयकॉन आहे. मानपानाच्या वेळी पुढे सरसावणारे हे आप्त, अन्यवेळी हात आखडता आणि पाय माघारी का घेतात? लोकांना बिनखर्चाची सोय जिथेतिथे हवी असते. स्वावलंबन आणि आत्मनिर्भरता हाच उत्तम मार्ग आहे. म्हणून संतांनी सांगून ठेवलंय की,

***सोयरे गोत्रज, दहा दिवस संग***
***निधनाचा तो एक पांडुरंग***

## संघ हीच जीवनगाथा

सुरेखा काणे/९९६०० ५३५२१




रा ष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक होण्याआधी गोळवलकर गुरुजींनी संन्यासी बनण्यासाठी श्री रामकृष्ण परमहंस यांचे प्रत्यक्ष शिष्य स्वामी अखंडानंदजी यांच्याकडून ब्रह्मचर्याची दीक्षा घेतली होती. एक दिवस अचानक पूजनीय डॉक्टरांशी त्यांची भेट झाली. त्यांच्यातला संवाद असा...

**डॉक्टर** : आपण प्राध्यापक आहात ना?

**गुरुजी** : नाही, आता नाही. आता मी संन्यासी आहे.

**डॉक्टर** : मग आता काय करत आहात?

**गुरुजी** : साधना!

**डॉक्टर** : कशासाठी?

**गुरुजी** : मोक्षासाठी!

**डॉक्टर** : चांगला विचार आहे पण, आधी एका प्रश्नाचे उत्तर द्याल का?

**गुरुजी** : हो नक्की!

**डॉक्टर** : जर आज तुम्ही हजारो लोक नरककुंडात पडताहेत, असे पाहिले तर काय कराल?

**गुरुजी** : आधी मी नरकात जाणाऱ्यांना वाचवेल त्यानंतर मोक्षाचा विचार करेल.

**डॉक्टर** : तर मग आज भारत मातेची स्थिती अशीच आहे, स्वार्थी नरककुंडा सारखी! तिची चिंता कोणी करायची? तुम्ही मोक्ष सोडावा, असे मला वाटते.

**गुरुजी** : विचार करतो.

असे म्हणून ते परतले. पण, नंतर दोघांचीही वारंवार भेट होऊ लागली आणि जसे गुरुदेव रामकृष्ण परमहंसांनी स्वामी विवेकानंदांवर वरदहस्त ठेवला होता तसाच डॉक्टर हेडगेवार यांनी गुरुजींवर वरदहस्त ठेवला. पूजनीय डॉक्टरांना गोळवलकर गुरुजींची कुशाग्र बुद्धी, वाक्पटूता, कर्तृत्व शक्ती, दुसऱ्याला प्रभावित करण्याची क्षमता, भौतिक सुखोपभोगाप्रती उदासीनता आदि गुण आवडले होते. त्यांनी मनोमन ठरवलं, हाच खरा संघाचा आपल्या नंतरचा वारस! आणि, मग डॉक्टरांनी गुरुजींना आपल्याबरोबर नागपूर, भंडारा, उमरेड, रामटेक, अकोला आदि ठिकाणी झालेल्या संघवर्गावर सोबत नेले. डॉक्टरांनी त्यांना पंजाब, बंगाल, पुणे आणि मुंबईत पण संघाचे दर्शन घडवले. आमच्या राष्ट?ाचे सौभाग्य हेच की, डॉक्टर हेडगेवार हे गुरुजींसाठी आकर्षित करणारा जबरदस्त शक्तीचा लोहचुंबक ठरलं. डॉक्टरांच्या राष्ट?ीय कर्मयोगाकडे गुरुजी अधिकाधिक आकर्षित होऊ लागले आणि ते गतीने संघमय झाले.

**क्रमशः**

# घर...घर! (मध्यांक)




हॉ लमधली फायरप्लेस बेडरूम मधूनही वापरता येईल असं केलं तर?','मोठ्या ओट्यासाठी ओव्हन, गॅसटॉप त्या 'हेमिंग्वे' प्लॅनसारखे असे बसवले तर?','टबच्या जागी शॉवर घेतला तर?,' 'या 'एलियट' प्लॅनमध्ये 'मिलर'च्या प्लॅन-बी-चा जिना बसवला तर?'... अमेरिकेत बिल्डरकडच्या प्लॅनमधलेच घर निवडावे लागणार या वास्तवाला आम्ही अशाप्रकारे अनेक पर्यायांचे फाटे फोडत आमच्या मूळच्या एकमजली प्लॅनला दीडमजली बनवण्याची, 'हे कम ते' असे अनोखे स्थापत्य उदयास घालण्यासाठी चर्चेची अनेक गुऱ्हाळे चालवली होती. इतकेच नव्हे तर स्वतंत्र लॉट कुठे मिळतात, स्वतःच्या मर्जीचं घर बांधून घ्यायला किती खर्च येतो, गर्भश्रीमंत अमेरिकन लोकांनी तळ्याच्या काठी, टेकडीवर, लांबवर हिरवाई असणाऱ्या जागी बांधलेले मोठे प्रासाद या साऱ्या कुतूहलाच्या विश्वची सफर आम्ही मायाजालावर केलेली होती. कामगारांच्या संपामुळे बांधकाम लांबलेले तेव्हा मागचे हे सगळे आठवून आम्ही धमाल हसायचो. त्या साऱ्यातून पार पडून घर अगदी तयार टप्पात आलेले असताना 'पूरनियंत्रक रेषा' अर्थात 'फ्लड इझमेन्ट' एखाद्या यक्ष प्रश्नासारखी उपटली होती.

टोलरोडचा पास असल्यामुळे बिनदिक्कत ऑस्टिन शहर आणि परिसर आपल्या निसान आरमाडा गाडीतून मागचे जवळपास ५-६ महिने न थकता, न कंटाळता आम्हाला घेऊन फिरणारी आमची एजंट क्रिसी आमच्या पसंतीचं डील शोधून दिलं म्हणून समाधानी होती. सहा महिन्यांपूर्वी पुनर्विक्रीच्या घरांना भेटी देत असताना एका घराच्या मागे काही अंतरावरच विजेची ग्रीड (ट्रान्समिशन लाईन) होती. तिथे आमची क्रिसीसोबत भेट झाली होती. तिचे घर, खरेदी-विक्रीच्या बाजाराचे प्रचंड ज्ञान, मुद्देसूद आश्वासक बोलणे, व्यावसायिक चिकाटी पाहून आम्ही तिच्या ऑफिसला भेट दिली आणि तिला एजंट म्हणून नियुक्त केलं. क्रिसी कुटुंबवत्सल इटालियन अमेरिकन! तिचा नवराही रिएल्टर, त्यांची घरचीच कंपनी. एक मुलगा आणि आपल्या नातू-लेकाइतकंच सुनेचंही कौतुक असणारी तिची सासू! अनेक घरे फिरताना आम्हाला नक्की काय आवडेल याचा अचूक अंदाज बांधत क्रिसीने आम्हाला या नव्या घरबांधणी प्रकल्पाशी आणले होते. घर शोधणीच्या विविध टप्प्यांवर आम्हाला योग्य मार्गदर्शन करण्यात क्रिसी अव्वल ठरलेली होती. आता फ्लड इझमेन्टच्या तिढ्यात तिच्या संयम, कायदेशीर ज्ञान आणि व्यवहारनीतीचा कस लागणार होता. त्या अनिश्चिततेच्या काळात आमचा क्रिसीवर पूर्ण भरोसा होता.

दरम्यान, कौटुंबिक मदतीचा हात आणि लेकीच्या गर्भारपणाचे कौतुक यापायी झालेली आईची अमेरिकावारी ही दुसऱ्या अर्थाने वादळापूर्वीची शांतता होती, असं वाटायला निराळंच कारण घडलं. आईच्या अनुपस्थितीत त्यावेळी सोलापूरला गुंडांनी आमच्या एका कारखान्याची जागा बळकावण्याचे प्रकरण नुकतेच उघडकीस आले होते. पुढचे काही महिने पोलीस आयुक्त, फौजदारी अशा अनेक खटाटोपीत तिकडे जाणार होते आणि इकडे आमच्यासाठी 'कहानीमें टि?स्ट पे टि?स्ट'!

अनेक निवडसत्रातून साकारत असलेल्या

सायली मोकाटे-जोग/+१(८१८) ६२०-७११९

आमच्या घराच्या क्लोसिंगची वेळ जवळ आलेली असताना ऑक्टोबर महिन्याच्या मध्यांत आम्ही वेगळ्याच भागातले रिसेलचे घर बघत होतो. क्रिसी तिच्या नेहेमीच्या शिस्तीत त्या घराची चांगली बाजू, त्रुटी यांचं मूल्यमापन करत होती. आमची संध्याकाळ मायाजालावर पुन्हा नव्याने विक्रीस आलेल्या घरांच्या शोधात व्यतीत व्हायला लागली. यावेळी, मात्र उत्साहापेक्षा मनात तुलना जास्त व्हायची. एकार्थाने घर बांधणीच्या अनुभवाने आलेले शहाणपण आम्हाला उपयोगी पडत होते तरी हा सगळा खटाटोप करताना अंतिम निष्पत्ती काय असणार आहे?हा सवाल कायम होता. खरं म्हणजे तो वेळ आम्हाला पुढच्या खरेदीला, घराभोवतीच्या बागेच्या आलेखनाकरता (लँडस्केपिंग) वापरता आला असता. जास्तीची आळी बिल्डरकडूनच करून घेता आली असती. हौसेचा भाजीपाला लावण्याची सोय यासारखे इतरही छोटे-मोठे फेरफार एकात एक असे होऊन गेले असते. पण, अनिश्चिततेच्या घेऱ्यातलं आमचं हे गृहसंशोधन केवळ बिल्डरपुढे न झुकण्याच्या इराद्याने चालू ठेवावं लागलं होतं.

स्थानिक व्यवस्थापनाशी वाटाघाटीत वेळ न वाया घालवता त्यावेळी क्रिसीने तिचे सर्व लागेबांधे पणाला लावून घेत थेट कॅनडात बिल्डरच्या मुख्यालयाशी वार्तालाप करायला सुरुवात केली. तिच्या प्रयत्नांना काही दिवसांत उचित यश आले. फ्लड इसमेन्टची माहिती सुरुवातीलाच स्पष्ट न केल्याची बाब मान्य करत, बिल्डरच्या व्यवस्थापनाने दिलगिरी व्यक्त करत समरूप भरपाई देण्याची लवचिकता दाखवली. साल २०१२ मध्ये सहा-सात हजार डॉलरची रक्कम जी अन्यथा 'क्लोसिंग कॉस्ट' म्हणून गणली गेली असती ती संपूर्ण माफ करण्याचा त्यांनी वायदा केला.अमेरिकन व्यावसायिक गणितांचं एक अजब सूत्र असतं. त्याचा गाभा, रहस्य तुम्हाला गवसलं तर तुम्ही यशस्वी! आमच्या शेजारचा क्रमांक एकचा लॉट क्षेत्रफळात सर्वाधिक म्हणजे अगदी फ्लड इझमेन्ट सोडूनही प्रचंड उरेल इतका मोठा. ज्यादिवशी आम्ही ब्रांकाला (बिल्डरच्या व्यवस्थापिकेला) भेटलो नेमकं त्यादिवशी आमच्याकडे चेकबुक नव्हतं. पुढच्या २-४ दिवसांत गेलो तेव्हा तो लॉट बुक झाला, असं कळलं. त्यामुळे आम्ही घेतला तो क्रमांक दोन क्षेत्रफळाचा. आज मात्र मार्केटिंगचे तंत्र पाहिल्यावर आणि आमच्या त्या नवीन अमेरिकन शेजाऱ्याशी गप्पा झाल्यावर लक्षात येतं की, तो क्रमांक एकचा लॉट बिल्डरचा सर्वात मोठा हाऊस प्लॅन घेणाऱ्या ग्राहकास दिला जावा, ही काटकोर दक्षता ब्रांकाने घेतली असावी.

सांगायचं मुद्दा काय तर फ्लड इझमेन्टपायी १५०० स्क्वेअर फूट जागा सोडूनही आमच्याही घराचे मागचे अंगण तसे पुरेसे मोठे असणार होते. नव्याने घर शोधत फिरण्याऐवजी आम्ही स्थिर होऊन आयुष्यात येणाऱ्या नव्या पर्वासाठी सज्ज होणार होतो तेव्हा आम्हीही दिलगिरीसोबत माफ होणारी क्लोसिंग कॉस्ट हा 'तह' मान्य केला. आता आणखी कोणतेही पर्याय न धुंडाळता 'घर ताब्यात घेणं' ही औपचारिकता उरली असतानाही शिथिल न पडता इन्स्पेक्शन, मालकी (टायटल), गृहकर्ज (लोन), वारंटी इत्यादी सर्व बाबींची डोळ्यांत तेल घालून पूर्तता केली आणि मगच सुखाचा निःश्वास टाकला. घरघर नाट्यरंगामुळे दाखल झालेला मध्यांक ओलांडून आता आम्ही खऱ्या अर्थाने उत्तरार्धाकडे वळत होतो.

## संगीतिका

संगीता तांबोळी/ ९८२२७३९४९३

# ज्योत से ज्योत जगाते चलो...

नु कतीच दिवाळी पार पडली. प्रत्येकाच्या मनात अजूनही दिवाळीच्या आठवणी रेंगाळत आहेत. हर्ष, उल्हास याची पर्वणी असते दिवाळी म्हणजे! कुटुंबातील प्रत्येक नात्याचा सन्मान करणारा हा सण! या निमित्ताने नात्यांची बंधनं घट्ट होतात. अशी दिवाळी मग वर्षानुवर्षे मनात साजरी होत राहते. आठवांची ज्योत मनात कायम तेवते.

दीपोत्सवात आपण पणत्या लावतो, तेव्हा प्रत्येक वेळी मनात हेच गाणं रेंगाळतं. पणतीला पणती पेटवत नेली की, दिव्यांची एक माळ, एक रांग तयार होते! अन् दिव्यांचा हा प्रकाश अमावास्येच्या काळोखालादेखील नाहीसा करतो आणि त्या अंधाऱ्या रात्रीचे, एका तेजोमय प्रकाशपर्वामध्ये रूपांतर होतं. हिच प्रकाश पर्वाची ज्योत जर मनामनात तेवत ठेवली तर, मनातील अंधःकार पण नष्ट होईल.

***'ज्योत से ज्योत जगाते चलो, प्रेम की गंगा बहाते चलो...***
***राह में आये जो दीन दुःखी, सब को गले से लगाते चलो...'***

१९६४ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'संत ज्ञानेश्वर' या चित्रपटातील हे गीत! भरत व्यास लिखित आणि लक्ष्मीकांत प्यारेलाल यांनी संगीतबद्ध केलेलं हे गीत, मानवतेचा संदेश देणारं! अखिल विश्वातील मानवासाठी पसायदान मागणारे ज्ञानेश्वर! हाच वारसा पुढे नेण्याची प्रत्येक मानवाची जबाबदारी आहे, हा विचार या गाण्यातून मनात झिरपतो. प्रेमाची, सहकार्याची, मानवतेची ज्योत आहे मनामनात तेवलेली, हिच महत्त्वाची आणि हिच कायम राखायला हवी. जातीपातींची बंधनं तोडून, आपण 'भारतीय' म्हणून खंबीरपणे देशासाठी उभं राहिलं पाहिजे. ही प्रेमाची गंगा प्रवाहित ठेवण्याचा विडा आपण उचलला पाहिजे.

**'जिसका न कोई संगी साथी, ईश्वर है रखवाला**
**जो निर्धन है, जो निर्बल है, वो है प्रभू का प्यारा**
**प्यार के मोती लुटाते चलो, प्रेम की गंगा बहाते चलो'**

आयुष्यात ज्यांच्या आशा-आकांक्षांना धक्का बसलाय. काही कारणांमुळे आयुष्य उध्वस्त झाले आहे, त्यांना आयुष्यात पुन्हा उभे राहण्यासाठी आपण आधार द्यायला हवा. शक्य असेल तसा आर्थिक, मानसिक...जसा जमेल तसा! पुढे केलेला सहकार्याचा एक हात, कदाचित एखाद्याचं संपूर्ण आयुष्य सावरू शकेल.

***'बंद करो मत, द्वार दया का***



***दे दो कुछ तो सहारा, दीप दया का जलाते चलो***
***प्रेम की गंगा बहाते चलो...***

किती यथार्थ वर्णन आहे हे! हा मनांतील दीप कायम तेवत राहायला हवा ज्यामुळे वाईट विचाररुपी अंधःकार नक्कीच नाहीसा होईल. या गाण्यातली शेवटची ओळ तर खूपच जास्त महत्त्वाची आहे.

***'धरती को स्वर्ग बनाते चलो...'***
***आपण सारे देशवासी जेव्हा***

हातात हात गुंफून, देशासाठी एकत्रिपणे उभे राहू आणि याची सुरुवात प्रत्येकानं स्वतःपासून करावी. चांगल्या गोष्टींचा पुरस्कार केला की, मदतीचे अनेक हात समोर येतात, हा अनुभव आपल्या गाठीशी आहेच. फक्त मनातली ही देशप्रेमाची, सहकार्याची ज्योत कायम तेवत ठेवा अन् शक्य झालं तर,'ज्योत से ज्योत जगते चलो...' प्रमाणे आणखीही ज्योती प्रज्वलित करा...कायम!

# स्त्री शिक्षणाचे संदर्भ मांडणारी 'भिजकी वही'



**मराठी कवितेला नवीन आयाम देणाऱ्या अरुण कोलटकरांचा जन्म १ नोव्हेंबर १९३२ रोजी कोल्हापूर येथे झाला. मुंबईच्या सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्?सचे पदवीधारक असलेले अरुण कोलटकर एक ग्राफिक्स डिझायनर व जाहिरात क्षेत्रातील यशस्वी कलादिग्दर्शक म्हणून जितके प्रसिद्ध होते त्याहीपेक्षा त्यांच्या कविता जास्त प्रसिद्ध होत्या असे म्हणावे लागेल. १९५०-१९६० च्या दशकांत त्यानी लिहिलेल्या कविता या मुंबईतील बोलीभाषेतील तसेच स्थानिक निर्वासित आणि गुन्हेगारी वस्तीतील जनजीवनावर भाष्य करणारे होत्या. २००४ मध्ये आलेल्या भिजकी वही या आंतरराष्ट्रीय पातळीवर स्त्री दुःखाचा वेध घेणाऱ्या तसेच, स्त्री जाणिवेतून जीवनाच्या विभिन्न घटकाकडे दृष्टिक्षेप टाकणाऱ्या कवितासंग्रहाला २००५ मध्ये साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला.**

किरण डोंगरदिवे /७५८८५६५५७६

जी वन विषयक भाष्य करणारे अरुण कोलटकर यांच्या भिजकी वही या स्त्रीविषयक काव्यसंग्रहामध्ये शैक्षणिक संदर्भ फार अभावाने वाचायला मिळाले तरी महत्वाचे आहेत असे वाटते. कोलटकरांची कविता ही नेहमीच वाचकांच्या मेंदूला आव्हान देते.'भिजकी वही' मधील प्रत्येक कविता म्हणजे एका स्त्रीचे स्वगत आहे. मात्र, ते स्त्रीपात्र वाचकांच्या परिचयाचे नसल्यामुळे त्याला नेमके काय म्हणायचे आहे तेच वाचकांना कळत नाही. 'लैला' या दीर्घ कवितेत मजनूच्या मनस्थितीचे वर्णन करताना, लैलाच्या विरहात वाळवंटात फिरणारा मजनू त्याच्या एकांतवासात कोणाकडून काय शिकत होता हे सांगताना कवी म्हणतात,

***लॅम आणि ये ही दोनच धुळाक्षर तो शिकला***
***आणि या नस्तलीक लिपित***
***ती दोनच अक्षर तो वाळूत किंवा***
***हवेत पुन्हा पुन्हा गिरवायचा***

याच कवितेत पुढे ज्या दगडावर मजनू डोके ठेवून झोपायचा तो दगड मजनूला 'लैलोपनिषद' उलगडून सांगायचा हा संदर्भही उल्लेखनीय ठरतो. शिवाय, याच कवितेत पुढे गणितीय संदर्भानुसार,

***लैलेला लैलेनं भागा***
***किंवा लैलेला लैलेनं गुणा***
***उत्तर एकच मिळतं लैला***
***लैलेतून लैला काढून घेतली***
***तर शिल्लक राहते लैला...***

या ओळीमधूनच जीवनातील विलक्षण समीकरण लैला आणि मजनूच्या परस्पर तादात्म्यतेची गणितीय समीकरणातून केलेली उकल आहे.

'अपाला' ही एक आणखी एका दीर्घ कवितेची शीर्षक नायिका! तसे पाहता 'भिजकी वही'मधील २९ दीर्घ कवितांपैकी १८ शीर्षक म्हणजे १८ काव्य नायिका आहेत तर, अपाला या कवितेत काव्यनायिकेचा बाप खगोलशास्त्राचा अभ्यासक आहे. चंद्रावरचे डाग कसे घालवता येतील याबाबत त्याचे संशोधन सुरू होते. मात्र, मुलीच्या संसाराला लागलेले ग्रहण आणि मुलीच्या तोंडावर कोडाचे डाग पडून तिचा विद्रूप झालेला चेहरा याबाबत तो पूर्णपणे दुर्लक्ष करतो. अकल्पित किंवा अनाकलनीय आपल्या अभ्यासातून मांडणारे लोक सर्वसामान्य बाबीकडे दुर्लक्ष करतात, याची जाणीवसुद्धा कवीने करून दिली.

कसांड्रा ही ट्रॉयच्या राजाची मुलगी, तिला ट्रॉय राज्यावर होणारा हल्ला आणि राज्याची होणारी वाताहात आणि प्रचंड नरसंहार याबाबत आपल्या सिद्ध शक्तीने पूर्वकल्पना असून ती त्याबाबत भविष्यवाणी करत आहे. आपल्याला हे कसे साध्य झाले हे सांगत असताना अपॉलो नावाच्या गुरुने आपल्याला ही सिद्धी शिकवली असे ती सांगते.

अरुण कोलटकर यांच्या 'मुक्तायक्का' या कवितेत गुरु शिष्य परंपरा ही अगदी संवेदनशील पातळीवर व्यक्त होते. मुक्तायक्का ही अजगण्णा याची धाकटी बहीण, या दोन बहिण भावांचे प्रेम आणि भावाच्या मृत्यूनंतर बहिणीने केलेला विलाप व्यक्त होत असताना

***अजगण्णा माझा भाऊ सख्खा, अजगण्णा माझा गुरु***
***महात्मा अजगरू, अजगण्णा माझा***

अशा शब्दातून व्यक्त करताना अजगण्णा हा एक अजगर आहे आणि तो त्याच्या बहिणीला एकटं सोडून निघून गेला मात्र जाण्यापूर्वी बहिणीला अमर करून गेला आणि विळखा घालून अन्न पचवणे इत्यादी शिकवणे देऊन गेला. अशा मिथक संकल्पनेतून गुरू-शिष्य आणि बहिण-भाऊ यांचे नाते यातून व्यक्त होते.

याच कवितेत जेव्हा सनातनी वृत्ती प्लुटो, ?रिस्टॉटल, युक्लीड अशा सर्व विचारवंतांना आणि शास्त्रज्ञांच्या विचारापेक्षा फक्त बायबल श्रेष्ठ आहे असा विचार मांडला जातो तेव्हा आपल्या धार्मिक परंपरांना धक्का लागतो असं पाहून सनातनी वृत्ती रानटी पद्धतीने या शिक्षणातज्ज्ञांचा आणि विचारवंतांचा द्वेष करतात असे आपल्या लक्षात येते.

अरुण कोलटकर यांनी जागतिक पातळीवरील उदाहरण देऊन विकसित समजल्या जाणाऱ्या देशातील स्त्रीला देण्याचा अधिकार नाही, अशी विचारसरणी अस्तित्वात होती हे ठळकपणे अधोरेखित केले आहे. 'हेलनची गुंतवळ' या कवितेतील हेलनची गुंतवळ अलेक्झांड्रियाच्या सुप्रसिद्ध ग्रंथसंग्रहालयात खिडकीतून प्रवेश मिळवतात आणि चोरून वाचन करतात. असे उल्लेख स्त्रियांना शिक्षणाचे स्वातंत्र्य नव्हते हे सांगण्यासाठी पुरेसे आहेत.

'सूझन' या कवितेच्या पहिल्या भागात म्हणजे एक मुलगी बर्गेन बेल्सेनचे फोटो पाहते. या शीर्षकांतर्गत शिक्षणाच्या संदर्भात येणारे अवतरण म्हणजे,

***सहज म्हणून सूझन पुस्तकांच्या दुकानात गेली***
***एक पुस्तक उघडलं तिनं आणि त्यातच हरवली ती***
***कुठं आहोत आपण लक्षात येईना तिच्या***
***हे काय आहे? क्षितिज? काटेरी तारांचं ?***

युगानुयुगे स्त्रियांना शिक्षणापासून आणि पुस्तकाच्या दुनियेपासून वंचित ठेवल्यावर एखादी स्त्री जेव्हा पुस्तकात स्वतःचे विश्व शोधत भान हरवते आणि या पुस्तकातून आपण क्षितिज गाठलं आहे की तारेच्या कुंपणात गुंतत आहोत, असा संभ्रम तिच्या मनात उभा राहतो. स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवणाऱ्या व्यवस्थेमुळे होणाऱ्या सामाजिक आणि मानसिक अस्थैर्यांच्या नोंदी अरुण कोलटकर अतिशय तरलतेने आणि स्वाभाविक शब्दातून मांडतात.स्त्रियांच्या शिक्षणाबाबत असलेल्या विषण्ण आणि दाहक परिस्थितीची जाणीव होते. स्त्रियांना चूल आणि मूल या मर्यादित ठेवत असतांना त्यांनी काय शिक्षण घेतले पाहिजे अशी या समाजाची धारणा आहे हे सांगत असताना कवी आपल्या एका नायिकेच्या माध्यमातून म्हणतात,

***कदाचित एखादा कुकिंग क्लास***
***जॉईन करावा लागला असता मला***

जवळपास प्रत्येक कवितेत स्त्रियांना केंद्रस्थानी ठेवल्यामुळे भिजकी वहीमधील अनेक शैक्षणिक संदर्भ स्त्री जीवनाशी निगडित असलेले दिसतात. मात्र,'किंकाळी'सारख्या एखाद्या कवितेतून युद्ध आणि दंगल यामुळे शिक्षण व्यवस्था कशी मोडकळीस येते, याचं वर्णन कवी करतात.'किंकाळी' ही कविता युद्धजन्य परिस्थितीचे कॅमेरा मधून चित्र टिपणारे पत्रकाराच्या नजरेतून आलेल्या कवितेसारखी वाटते. युद्धातील हल्लेखोर हल्ला करत असताना शाळकरी मुलांचा किंवा त्यांच्या जळणाऱ्या शाळेचा कधीही विचार करत नाही ही एक अस्वस्थ जाणीव कवींनी आपल्या कवितेतून वाचकांना करून करून दिली आहे. एकंदरीत भिजकी वही या साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कविता संग्रहामध्ये जागतिक स्तरावरील स्त्रियांच्या दुःखाचा उहापोह करताना विविध लोककथा, मिथक दाखले आणि उदाहरणे देत स्त्रियांच्या शिक्षणाच्या संदर्भातील पूर्वापार चालत आलेली आणि जागतिक स्तरावर जपली गेलेली निरसता, स्त्री शिक्षणा बद्दलचे औदासिन्य याबाबत आलेले संदर्भ अस्वस्थ करणारे आहेत. कोलटकरांच्या रचना विचार करण्यास बाध्य करतात. या प्रतिभावान कवीचे २५ सप्टेंबर २००४ रोजी निधन झाले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# जिल्ह्यातील १२ नगरपरिषदेसह एका नगरपंचायतीसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ नोव्हेंबर-**

नांदेड जिल्ह्यातील १२ नगरपरिषद व एका नगरपंचायतीच्या २६९ सदस्यांसाठी मंगळवार २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान तर बुधवार ३ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. नांदेड जिल्ह्यात एकूण १३ स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीचा कार्यक्रम काल ४ नोव्हेंबर रोजी राज्य निवडणूक आयोगाने घोषित केला असून या नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या कार्यक्षेत्रात कालपासून आचारसंहिता लागू झाली आहे, याबाबतची माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

नांदेड जिल्ह्यात नगरपरिषद देगलूर, नगरपरिषद भोकर, नगर परिषद धर्माबाद, नगरपरिषद किनवट, नगरपरिषद उमरी, नगरपरिषद हदगांव, नगरपरिषद मुखेड, नगरपरिषद कंधार, नगरपरिषद बिलोली, नगरपरिषद कुंडलवाडी, नगरपरिषद मुदखेड, नगरपरिषद लोहा, नगरपंचायत हिमायतनगर याठिकाणी सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील १२ नगरपरिषद व एका नगरपंचायतीच्या निवडणूक कार्यक्रमाच्या क्षेत्रात १ लाख ४७ हजार १६५ पुरुष तर १ लाख ५० हजार ८५८ स्त्री व इतर २० असे एकूण २ लाख ९८ हजार ४० मतदार आपल्या मतदानाचा हक्क ३५१ संभाव्य मतदान केंद्रावर बजावतील.

१२ नगरपरिषदांमध्ये नगरपरिषद देगलूर ही ब वर्गवारीची असून बाकी सर्व क वर्गवारीच्या नगरपरिषद व नगरपंचायत आहेत. या सर्व नगरपरिषद व नगरपंचायतीमध्ये एकूण प्रभाग संख्या १४१ आहे. या निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम जारी करण्याची तारीख ६ नोव्हेंबर २०२५ असून नामनिर्देशनपत्र दाखल करण्यास १० नोव्हेंबर २०२५ पासून सुरुवात होईल. नामनिर्देशपत्र दाखल करण्याची अंतिम तारीख १७ नोव्हेंबर २०२५ रोजी ३ वाजेपर्यत राहील. या कालावधीत येणाऱ्या रविवार या सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाहीत. नामनिर्देशनपत्रांची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी १८ नोव्हेंबर २०२५ रोजी होईल.

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध अपील नसलेल्या ठिकाणी २१ नोव्हेंबर २०२५ पर्यंत; तर अपील असलेल्या ठिकाणी २५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत नामनिर्देशनपत्रे मागे घेता येतील. निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी २६ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिध्द होईल.



मंगळवार २ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत मतदानाची वेळ असेल. मतमोजणी सर्व संबंधित ठिकाणी बुधवार ३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजल्यापासून सुरु होईल. निकाल जाहीर झाल्यानंतर नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या क्षेत्रापुरती आचारसंहिता संपुष्टात येईल.

**जात वैधता प्रमाणपत्राबाबत**

राखीव जागेवर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. परंतु जातवैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास त्यासाठी पडताळणी समितीकडे केलेल्या अर्जाची पोहोच पावती नामनिर्देशनपत्रासोबत सादर करण्याची मुभा आहे. तसेच नामनिर्देशन पत्रासोबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी निवडून आल्याच्या दिनांकापासून ६ महिण्याच्या आत शासनाच्या ३ नोव्हेंबर २०२५ च्या अध्यादेशाद्वारे तरतुद करण्यात आली आहे. त्यानुसार कार्यवाही करण्याचे तसेच उमेदवार निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून अधिनियमातील तरतुदीनुसार जातवैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल असे विहित केलेले हमीपत्र उमेदवारांने सादर करणे आवश्यक आहे.

**नामनिर्देशनाबाबत**

नामनिर्देशन स्विकारण्याची प्रक्रीया संगणक प्रणालीद्वारे राबविण्यात येत असल्याने नामनिर्देशन व शपथपत्र राज्य निवडणूक आयोगाकडील सॉफ्टवेअर द्वारेच भरणे आवश्यक आहे. निवडणूक लढवू इच्छीत असणाऱ्या उमेदवारांनी र्हीींिः//ारहरीशलशश्रशल.ळप संकेतस्थळावर स्वतः नोंदणी करावी व नामनिर्देशनपत्रामध्ये तसेच शपथपत्रामध्ये माहिती भरावी. त्याची प्रिंट घेवून त्यावर स्वाक्षरी करुन ते निवडणूक निर्णय अधिकऱ्यांकडे विहित वेळेत व विहित पध्दतीने दाखल करावे. अशा प्रकारे भरलेला व स्वाक्षरी केलेला नामनिर्देशन पत्राचा अर्ज नामनिर्देशनपत्र म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

**संभाव्य दुबार नावांबाबत दक्षता**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार यादीतील संभाव्य दुबार मतदाराच्या नावासमोर (✻✻) असे चिन्ह नमूद करण्यात आले आहे. असे मतदार कुठल्या मतदान केंद्रावर मतदान करणार आहेत, याबाबत त्यांना आवाहन करण्यात येईल. या आवाहनाला प्रतिसाद मिळाल्यानंतर अशा मतदारांकडून तो कोणत्या मतदान केंद्रावर मतदान करणार आहे, याबाबत विहित नमुन्यात अर्ज भरून घेतला जाईल. त्याने नमूद केलेले मतदान केंद्र वगळता त्यास उर्वरित कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान करता येणार नाही; परंतु प्रतिसाद न मिळाल्यास संभाव्य दुबार नाव असलेला मतदार मतदान केंद्रावर मतदानासाठी आल्यास त्याच्याकडून त्याने इतर कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान केले नसल्याबाबत किंवा करणार नसल्याचे विहित नमुन्यातील हमीपत्र लिहून घेण्यात येईल. त्याचबरोबर त्याची काटेकोरपणे ओळख पटल्यानंतरच त्याला संबंधित मतदान केंद्रावर मतदान करण्याची मुभा देण्यात येईल.

**आचारसंहिता**

निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून संबंधित नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या संपूर्ण क्षेत्रात आचारसंहिता लागू झाली असून ती निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यत अंमलात राहील. नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या कार्यक्षेत्रात ही आचारसंहिता लागू असली तरी अन्य ठिकाणीदेखील नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या मतदारांवर प्रभाव पाडणारी घोषणा किंवा कृती करता येणार नाही. नैसर्गिक आपत्तीबाबत करावयाच्या उपाययोजना किंवा मदतीसंदर्भात आचारसंहितेची आडकाठी असणार नाही. आचारसंहिता आणि कायदा व सुव्यवस्थेसंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ दोन स्वतंत्र आदेश निर्गमित केले आहेत.

**महत्वाच्या तारखा**

नामनिर्देशनपत्र दाखल करण्यास सुरुवात- १० नोव्हेंबर २०२५, नामनिर्देशनपत्रची दाखल करण्याची अंतिम मुदत- १७ नोव्हेंबर, नामनिर्देशनपत्रांची छाननी- १८ नोव्हेंबर, अपील नसलेल्या ठिकाणी नामनिदेशनपत्र माघारीची अंतिम मुदत - २१ नोव्हेंबर, अपील असलेल्या ठिकाणी नामनिदेशनपत्र माघारीची अंतिम मुदत- २५ नोव्हेंबर, मतदानाचा दिवस- ०२ डिसेंबर, मतमोजणीचा दिवस- ०३ डिसेंबर २०२५

## बजरंग दल संयोजक शंकर नाईनवाड यांना भाजपची उमेदवारी द्यावी

**मुखेड** -मुखेड नगर परिषद प्रभाग क्रमांक ७ मधून अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी भाजपकडून उमेदवारी द्यावी, अशी मागणी बजरंग दलाचे संयोजक शंकर नाईनवाड यांच्या समर्थकांकडून आ.डॉ. तुषार राठोड यांच्याकडे करण्यात आली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपात उमेदवारीसंदर्भात हालचाली वेगाने सुरू झाल्या असून, याच अनुषंगाने शंकर नाईनवाड यांनी आपल्या सहकार्यांसह आमदार डॉ. तुषार राठोड यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. या चर्चेत प्रभागातील जनतेच्या समस्या, विकास आराखडे तसेच पक्ष संघटनेच्या बळकटीसंदर्भात मुद्देसूद विचारविनिमय झाला. नाईनवाड यांनी भाजपाच्या विचारसरणीवर विश्वास व्यक्त केला आहे.



हिंदुत्ववादी संघटनांनी देखील नाईनवाड यांच्या उमेदवारीला पाठिंबा देत, पक्षाने त्यांना संधी द्यावी अशी मागणी केली आहे. दरम्यान, पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचे सांगण्यात येत असून, कार्यकर्त्यांमध्ये यामुळे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. आगामी निवडणुकीत शंकर नाईनवाड हे प्रभाग क्रमांक ७ मधून भाजपाचे प्रबळ दावेदार ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यावेळी मोठ्या संख्येने हिंदुत्ववादी संघटनेचे पदाधिकारी,कार्यकर्ते उपस्थित होते.

## विजयकुमार बेंबडे यलम समाजभूषण पुरस्काराने सन्मानित

**मुदखेड**-लातूर येथे यलम मित्र परिवाराच्या वतीने यलम समाज स्नेह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यात आला. त्यामध्ये शिक्षणक्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल नांदेड जिल्ह्यातील मुदखेड येथील सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूलचे मुख्याध्यापक विजयकुमार बेंबडे यांना यलम समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष अमोलकुमार पल्ले महाराज,माधवराव नारागुडे यांच्यासह अनेक मान्यवर मंचावर उपस्थित होते. विजयकुमार बेंबडे गेल्या २७ वर्षापासून शिक्षणाच्या क्षेत्रात ज्ञानदानाचे पवित्र कार्य अत्यंत सेवाभावी वृत्तीने करीत आहेत. शिक्षण, पर्यावरण, अंधश्रद्धा निर्मूलन,



विवेकजागर, वाचनालय चळवळ इत्यादी क्षेत्रातही ते सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून कार्यरत आहेत. आपल्या कार्यावरील निष्ठा, सेवाभाव,संघटन आणि समाजउत्थानाच्या विविध चळवळीत सक्रिय सहभाग बेंबडे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे ठळक विशेष आहेत. या त्यांच्या यशाबद्दल डॉ.जगदीश कदम, डॉ. कमलाकर चव्हाण, प्रा. नारायण शिंदे,नारायणराव गैणवाड,श्रीनिवास मस्के, डॉ. जितेंद्र पुल्ले,सनदी लेखापाल मनोहर आयलाने,राजकुमार मोरे, नागनाथ आकनगिरे, लिंगराम हंडरगुळे,बलभिम मद्रे, प्रा जितेद्र पुल्ले, सरआमच्या संस्थेचे अध्यक्ष केशव कदम, गोंविंद कालानी,माधवराव पचलिंग आंबेगावकर,यासह अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## खतगांवचा अधिराज ठरला यशाचा अधिराज; पहिल्याच प्रयत्नात सी.ए.!

**नायगाव** -तालुक्यातील खतगांव या छोट्याशा पण गुणी गावांचे नाव राज्यभर झळकवणारी आनंदवार्ता! इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया या देशातील प्रतिष्ठित संस्थेमार्फत घेण्यात आलेल्या सप्टेंबर २०२५ च्या चार्टर्ड अकाउंटंट 'सी.ए' परीक्षेत खतगांव येथील अधिराज अनंत पाटील.खतगांवकरने पहिल्याच प्रयत्नात यश संपादन करत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या परीक्षेत एकूण ५१,९५५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता, त्यापैकी १२,८११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, त्यामध्ये अधिराज यांचे नाव तेजाने झळकले आहे. या यशामुळे खतगांवसह शंकरनगर परिसरात आनंदाचे वातावरण पसरले आहे. अधिराज हे कै. मधुकरराव पाटील खतगांवकर यांचे माजी मंत्री तथा माजी खासदार भास्करराव पाटील खतगांवकर यांचे नातू तसेच डॉ. अनंत पाटील खतगांवकर यांचे सुपुत्र आहेत. कुटुंबातील शैक्षणिक परंपरेचा वारसा जपत, मेहनत, शिस्त आणि चिकाटी यांच्या जोरावर अधिराज यांनी हे यश मिळवले आहे. या यशाबद्दल गोदावरी मनार पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज, शंकरनगर चे प्राचार्य डी. पी. पांडे यांनी अधिराज यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. अधिराज यांचे हे यश आमच्या संस्थेसाठी अभिमानाचा क्षण आहे. त्यांनी दाखवलेल्या मेहनतीचा आदर्श इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, असे पब्लिक स्कूल चे प्राचार्य डी.पी.पाडेंय यांनी म्हटले आहे. अधिराज यांच्या या यशामुळे खतगांवासह संपूर्ण परिसरात अभिमानाचे वातावरण आहे. नातेवाईक, ग्रामस्थ, शिक्षक, मित्रपरिवार यांच्याकडून अधिराज यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. अधिराज ने या यशाचे श्रेय आपल्या पालकांच्या प्रेरणेला, व शिक्षकांच्या मार्गदर्शनाला आणि स्वतःच्या अथक परिश्रमांना दिले आहे. खतगांवचा हा तरुण अधिराज आता चार्टर्ड अकाउंटंट म्हणून उज्ज्वल कारकीर्दीस प्रारंभ करीत असून, त्याच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.




## दिलेल्या उमेदवारांना निवडून द्या,मी तुमचा गॅरेंटर राहीन : खा.अशोक चव्हाण

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ५ नोव्हेंबर-**

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका संदर्भात

धनेगाव सर्कलचे माजी जि प सदस्य मनोहर पाटील शिंदे यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना मी तुम्हाला असा उमेदवार देईन की तुमची तक्रार माझ्याकडे कधीच येणार नाही. या बाबीचा गॅरेंटर मी अशोक चव्हाण असणार आसे मत व्यक्त केले.

दक्षिण मतदार संघातील चार पंचायत समिती आणि आठ गण येथे येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका यामध्ये भाजपच्या उमेदवारांना बहुमताने निवडून द्या तुमचा कुठल्याही विकास कामांची तक्रार येऊ देणार नाही असे मत अशोकराव चव्हाण यांनी व्यक्त केले. यावेळी



पुढे बोलताना अशोकराव चव्हाण म्हणाले की धनेगाव गावाशी आत्मीयतेचे नाते असुन ते मी जपलेले आहे . धनेगाव सर्कल मधून कोणताही उमेदवार दिल्यास तो कमळ या उमेदवाराचा विजय होईल अशी ग्वाही माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी जनसंपर्क कार्यालय ऊध्दाटन प्रसंगी मत व्यक्त केले. यावेळी

माजी जि.प.सदस्य मनोहर पाटील शिंदे धनेगावकर यांच्या भव्य जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी भाजपा महानगर अध्यक्ष अमर भाऊ राजुरकर , माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाप्रसाद काकडे, युवा नेते संजय पाटील घोगरे,नांदेड दक्षिण विधानसभा प्रमुख डॉ.सचिन ऊमरेकर,सरचिटणीस शितल खंडील,सरपंच साहेबराव सेलुकर, पुंडलिक मस्के,माजी नगरसेवक संजय इंगेवाड, श्रीनिवास जाधव ,राजु पाटील काळे,रमेश तालीमकर,शेखगफुर,तातेराव ढवळे, भागवत शिंदे, शैलेंद्र ठाकूर, मारोती तळणे,चिमणाजी कदम,यांच्या सह बळीरामपुर,वाजेगाव,धनेगाव सर्कल मधील महिला युवक जेष्ठ नागरिक सह भाजपा पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या प्रसंगी अमर भाऊ राजुरकर यांच्यासह दक्षिण तालुका अध्यक्ष विश्वाभंर शिंदे,डॉ.सचिन ऊमरेकर व युवानेते संजय पाटील घोगरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे यांनी केले तर सूत्रसंचालन रमेश वाघमारे व दिगंबर शिंदे यांनी केले . हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी धान्यगाव नगरीचे सरपंच पिंटू पाटील शिंदे व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.

## भोकर तालूक्यातील ग्रामसेवकांचा भोंगळ कारभार

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. ५ नोव्हेंबर-**

नेमून दिलेल्या गावात ग्रामसेवक भेटी देत नसल्याने सर्व सामान्य जनतेची कामे वेळेत होत नसल्याच्या तक्रारी अनेकांच्या आहेत.

तालूक्यातील अनेक ग्रामसेवक कर्मचारी भोकर शहरात बसून कारभार पाहत आहेत मूख्यालयी राहत नाहीत परिणामी ग्रामीण भागातल्या सर्व सामान्य नागरीकासमोर अनेक समस्या निर्माण होत आहेत.नमूना नं.आठ जन्म मृत्यू प्रमाणपत्रासह विविध प्रमाणपत्र मिळविण्यासाठी सामान्य जनतेला भोकरला यावे लागत आहे.सदरील ग्रामसेवक हे नेमून दिलेल्या गावात नियमित येत नसल्यामूळे अनेकांना तर आपल्या गावचा ग्रामसेवक कोण आहे याची विचारणा करावी लागते.संबधित पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांचे नियंत्रण नसल्याचे दिसून येते भोकर पंचायत समिती ला आठवड्यातून एक वेळा ग्रामसेवक कर्मचारी अढळून येतात दौर्याच्या नावाखाली वयक्तिक कामाकडे अधिक लक्ष देत असल्याचे दिसून येते.सर्व सामान्य नागरीकांना ग्रामसेवक भेटत नाहीत गावातील रोजगार सेवक माहिती देत नाहीत विविध योजनेची माहिती ग्रामसेवकाकडून गावातल्या नागरीकांपर्यत मिळत नसल्यामूळे विविध योजनेपासून वंचित रहावे लागत आहे संबधित गटविकास अधिकारी व ग्रामसेवकांचे अर्थिक हितसंबध असल्यानेच ग्रामसेवक आपल्या मर्जीनूसार सेवा बजावत असल्याची चर्चा सर्वत्र आहे.वरिष्ठ अधिकार्यांनी याकडे लक्ष घालून कामचूकार ग्रामसेवकावर योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी मागणी जनतेतून होत आहे.

## सुभाषराव देशमुख यांच्या वतीने आयोजित महापंगतीचे हजारो दत्त भक्तांनी घेतला लाभ

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ५ नोव्हेंबर-**

हदगाव शहरातील जाज्वल तथा पंचक्रोशीत प्रसिद्ध असलेल्या श्री दत्तात्रेय संस्थान दत्तबर्डी येथील प्रसिद्ध मंदिरात ४१ किलो चांदीच्या मूर्तीचे प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर दि.५ नोव्हेंबर रोजी श्री दत्त भगवान चे निस्सीम भक्त तथा अपार श्रद्धा असलेले श्री सुभाष शुगर हडसनी, शिऊर साखर कारखाना लि. वाकोडी या दोन्ही कारखान्याचे चेअरमन सुभाषराव लालासाहेब देशमुख व कार्यकारी संचालक सुशील कुमार सुभाषराव देशमुख यांच्या वतीने महापंगतीचे आयोजन करण्यात आले होते ज्यात शिरा, पुरी, मसाला भात, भाजी याचा समावेश असून याचा हदगाव नगरीसह पंचक्रोशीतील हजारो दत्त भक्तांनी उपस्थित राहून महाप्रसादाचा आस्वाद घेतला.

हदगाव शहरालगत दत्तबर्डीच्या टेकडीवर श्री दत्तात्रय चे पुरातन मंदिर आहे. या मंदिराला शेकडो वर्षांची परंपरा आहे. दत्तात्रयांचे हे मोठे घर म्हणून ओळखले जाते. या मंदिरात अनेक वर्षांपूर्वी बनवलेली मूर्ती आहे या मूर्तीला बदलण्याची गरज असल्याचे सर्व भक्तगणांच्या आणि खुद्द श्री श्री १००८ महंत श्री गोपाळगिरी महाराजांच्या लक्षात आले त्यांनी



सर्व दत्त भक्तांची बैठक घेत ४१ किलो चांदीची मूर्ती बसवण्याचा संकल्प केला असून त्यास सर्व दत्त भक्तांनी सढळ हाताने देणगी दिली तर श्री दत्त भगवानचे निस्सीम भक्त श्री सुभाष शुगर व शिऊर साखर कारखाना याचे चेअरमन सुभाषराव लालासाहेब देशमुख व कार्यकारी संचालक सुशील कुमार देशमुख यांनी ही मूर्तीसाठी मोलाचा हातभार तर लावलाच पण प्राणप्रतिष्ठानंतर महापंगतीचे देखील आयोजन केले असून याचा लाभ हजारो दत्त भक्तांनी घेतला.

## कापूस वेचणीची लगबग सुरू, शेतमजुरांची टंचाई

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. ५ नोव्हेंबर-**

तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात यंदा पावसाने अक्षरशः थैमान घातले. सततच्या अतिवृष्टीमुळे शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. नदीपात्रालगतची शेतीतील माती सुद्धा वाहून गेली. सोयाबीन, मूग, उडीद यांसारखी पिके पूर्णपणे नष्ट झाली, तर थोड्याफार प्रमाणात केवळ कापूस एवढेच पीक वाचले. कापुस वेचणीची लगबग सुरू आहे. खरीप हंगामात निसर्गाशी संघर्ष तर आता कापुस वेचणीत शेतमजुरांची टंचाई निर्माण झाली आहे.

सध्या ग्रामीण भागात कापूस वेचणी सुरु असून शेतकऱ्यांना मजुरांची टंचाई भेडसावत आहे. सध्या कापूस वेचणी दर



आठ रुपये ते बारा रुपये प्रती किलो दर देऊनही पुरेसे मजुर मिळत नाहीत. काही गावात देगलूर शहरातील मजूर शेतीसाठी मागविले जात आहेत, त्यामुळे येण्या-जाण्यासाठी लागणाऱ्या प्रवास भाड्याचे अतिरिक्त ओझे शेतकऱ्यांवर पडत आहे. या परिस्थितीवर मात करण्यासाठी शेतकरी स्वतःच्या आख्या कुटुंबासह वेचणीसाठी राबताना दिसत आहेत.

दरम्यान, अजूनही अधूनमधून पावसाचे संकेत हवामान खात्याकडून दिले जात असल्याने शेतकरी पुन्हा चिंतेत आहे.

तरीही शेतकरी निसर्गाशी झुंज देत, परिस्थितीवर मात करण्याचा प्रयत्न करत आहे. त्यांच्या या चिकाटीला आणि जिद्दीला संपूर्ण समाजाचा सलामच म्हणावा लागेल!

## सुलोचनाबाई वाघमारे यांचे निधन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ नोव्हेंबर-**

शहरातील शोभा नगर येथील सुलोचनाबाई नथुराम वाघमारे यांचे आज दि. ५ नोव्हेंबर २०२५ रोजी अल्पशा आजाराने त्यांचे निधन झाले.



मृत्यू समयी त्या ६८ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातु असा मोठा परीवार आहे. सुलोचना वाघमारे यांच्या पार्थिव देहावर गोवर्धन घाट येथील स्मशान भुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## शाळेत प्लास्टिक आणि कचऱ्याची होळी

**नांदेड** - शाळेच्या पहिल्याच दिवशी लोहा तालुक्यातील जवळा देशमुख येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत चिमुकल्यांनी प्लास्टिक आणि कचऱ्याची होळी केली.

## कौठा गावाच्या विकासासाठी निधीची कमतरता भासणार नाही : आ. चिखलीकर

**तभा वृतसेवा**
**कंधार, दि. ५ नोव्हेंबर-**

कौठा गावाच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही. गावाच्या चारही दिशांनी रस्ते व दळणवळणाची सुविधा उभारली जात आहे. निधीसाठी कोणाच्या दारात जाण्याची गरज नाही; लागेल तेवढा निधी मी उपलब्ध करून देईन, असे आश्वासन आमदार प्रताप चिखलीकर यांनी दिले. ते कौठा येथे तीस कोटी रुपयांच्या विविध विकासकामांच्या शुभारंभप्रसंगी बोलत होते.

कंधार तालुक्यातील कौठा येथे धानोराकौठाशिरशीपेठवडज या रस्ता व पुलाच्या बांधकामाचा शुभारंभ आमदार चिखलीकर यांच्या हस्ते झाला. या



रस्त्याची मागणी अनेक वर्षांपासून येथील ग्रामस्थ तसेच धानोरा व शिरशी परिसरातील नागरिकांकडून होत होती. अखेर ही मागणी पूर्णत्वास येत असल्याने उपस्थित ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

चहा-बिस्कीट देणाऱ्यांनी विकास होत नाही; त्यासाठी खंबीर नेतृत्व लागते, असे आमदार चिखलीकर यांनी ठामपणे सांगितले. कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष शिवराज होटाळकर, माजी आमदार सुभाष साबणे यांनीही मनोगत व्यक्त केले. या वेळी प्रविण चिखलीकर, प्रणिता चिखलीकर, माधव पावडे, सुरेश राठोड किशन डफडे बाबूराव उमरगेकर कार्यकारी अभियाता सुमित पाटील निलेश गौर उपसभापती सुधाकर कौसले गटविकास अधिकारी महेश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी देगलूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार सुभाषराव साबणे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, बाबुराव देशमुख कौठेकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस पाटील चिखलीकर, माजी जिल्हा परिषद सदस्य सौ.प्रणितातार्ई देवरे चिखलीकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर कार्याध्यक्ष माधव पावडे, अशोकराव देशमुख कौठेकर, शंकरराव देशमुख कौठेकर, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष कन्हैया कदम, सुरेश राठोड, बाबुराव केंद्रे, डॉ.उत्तमराव सोनकांबळे, कंधार तालुकाध्यक्ष मनोहर पाटील भोसीकर, कंधार कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजय देशमुख, कौठा ग्रामपंचायतच्या सरपंच सौ.अर्चनाताई शिवकुमार देशमुख कौठेकर, कंधार पंचायत समितीचे गटविकास अधिकारी महेश पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता सुमित पाटील, कंधार नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष स्वप्निल पाटील लुंगारे, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष किशनराव डफळे कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सुधाकरराव कौसल्ये, मुखेड नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष गणपतराव गायकवाड, शंकरराव नाईक, प्रकाश तोटावाड, पप्पू देशमुख, कपिल देशमुख, प्रकाश हत्ते, एकनाथराव वाघमारे एडवोकेट जमील पठाण, साईनाथ पाटील कपाळे, साईनाथ कोळगिरे, मधुकरराव पाये, सुधाकरराव जाधव, मारोतराव कटकमवार, शिवाजी वाकोरे, बाळासाहेब पाटील शिंदे, राजेश पावडे, केशवराव कदम, बालाजी कल्याणकर, शंकरराव आगलावे, शिवराज पाटील जाधव, कंत्राटदार बी.आर.आंदे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.